वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला रविवार ता० ३ माहे आगष्ट सन १८७९ इसवी अंक ३०

वऱ्हाडसमाचाराची किंमत

	रु.
वर्षाचे अगाऊ	५
साल अखेर	७
किरकोळ अंकास	०१

डाक हाशील.

वर्षाचे अगाऊ	१८८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिसाबद्दल.

मराठी, १० ओळीचे आंत	१
१० ओळीपुढें दर ओळीस	०१८६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०३
,, दुसरे खेपेस	०२

नोटिस

घाशीखा वल्लद मदारखा रहाणार पारस तालुके बाळापुर यास संभाजी वल्लद रामाजी भगत रहाणार पारस याजकडून नोटिस देण्यांत येते कीं भुईकुंड खेड्यापैकीं सर्वे नंबर २७ एकर १३ गुंठे ८ आकार रूपये साहेब ०।४३ चें शेत आह्माकडे तुह्मी १९ रूपयांनां गहाण ठेवून आमचे ताब्यांत दिलें आहे व त्याची किस्तकारी आह्मी करीत आहो. व तुह्मी आमचे रूपयांची फेड अजून केली नसतां साल मजकूरचे पेऱ्यास तुह्मी आह्मास हरकत करीत आहा ह्मणून तुह्मांस ही मुद्दाम नोटिस दिली आहे, तर तुह्मी हरकत करूं नये. केल्यास आजूबाजूचे पिकाचे अंदाजानें तुह्मापासून पिकाचें भर नुकसान भरून घेतलें जाईल. या नोटिसीचा जबाब १५ दिवसांत पाठवावा न पाठविल्यास तुह्मावर दिवाणींत दावा करून खर्चसुद्धां भरून घेतला जाईल व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २७ जुलई सन १८७९ इ०

(सही) संभाजी वल्लद रामाजी भगत
दस्तुर खुद्द.

पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. आर्यावर्त कर्ते यांस— वि. वि. मागें कळविल्याप्रमाणें साधु यशवंतराय (देव मामलेदार) यांच्या दर्शनाची अति उत्कंठा प्राप्त झाल्यामुळें त्यांचा शोध करीत ते ज्या चा ांत उतरले होते, त्या ठिकाणीं गेलों. वाटेनेंही आमच्याप्रमाणें बहुत लोक त्यांच्या दर्शना करितां लगबगीनें जात होते, ते ज्या वेळीं राहिले होते तें ठिकाण नजीक आल्या बरोबर कैक आंधळे, पांगळे, थोटे, अतीथ, गोसावी, बैरागी वगैरे अनाथ लोकांचा मेळा दीर्घ स्वरानें " जय यशवंतराव महाराज की जय " असा वारंवार नाम घोष करीत होता तो देखावा व त्या निराश्रितांचा व भक्तांचा अशा प्रकारें पोटा करितां प्रेमळ भक्तीनें कंठशोष करून नामघोष चाललेला ऐकून एकदम अंत:करणानें अगोदर त्यांच्या दर्शनाची इच्छा प्रदर्शीत केली. चालीप्रमाणें त्या ठिकाणीं नारळांचीं, वर्फीचीं दुकानें लागलीं होतीं. तेथून आह्मी शक्तिनुरूप नारळ व पेढे घेऊन सा धुरायाजवळ गेलों तों तेथेंही अतिशय गर्दी, ते त्या ठिकाणीं निराश्रितांचा इच्छा पुरविण्यास तत्पर, व त्या अनाथ लोकांची नाना सबबी काढून याचना करण्याची गडबड यामुळें दर्शनच होणें मुष्कील असें वाटलें. परंतु ते घरांत गेल्यामुळें आह्मीही त्या ठिकाणीं जाऊन निर्चिंतपणें दर्शनाचा लाभ प्राप्त करून घेतला, व कांहींवेळ चमत्कार पहाण्याची इच्छा असल्यामुळें व तेथून लवकरच निघावेसेंही न वाटल्यामुळें तेथें कांहीं वेळ बसलों. यशवंत रायाची कीर्ति सर्वांस बहुत करून ऐकून माहीत आहे. तेव्हां त्याबद्दल विशेष सांगावेसें वाटत नाहीं. त्या पुण्य पुरूषाच्या परंपरा चाललेल्या चरित्रावर यशवंत महात्म ह्मणून एक पुस्तक झालें आहे त्याप्रमाणें पदें, कटाव अखेरीस कांहीं जणांनीं त्यास लावण्यांतही गाइलें आहे व बहुतेक लोकांस त्यांचें नांव व ऐकलेले दाखले ऐकून माहीत आहेत. साधुरायाची वृत्ति खरोखरच त्याप्रमाणें असून त्यांचा दानकृत्यावर विशेष भर असावासा वाटतो. परंतु सांगण्यास किंचित वाईट वाटतें कीं, त्यांच्या पदरीं जीं मनुष्यें आहेत तीं मन:पूर्वक प्रेमळ अंत:करणानें त्यांची सेवा करण्याकरितांच राहिलीं आहेत, कां अपमतलबानें पोटाकरितां आश्रयानें राहिलीं आहेत याचा संशय पडतो. खरोखर पाहिलें असतां रामदास स्वामीच्या वेळेस त्यांच्यापाशीं बहुत जेवतेगण चेल्यांचा मेळा जमला होता. परंतु अखेरीस प्रसंगीं एक कल्याण शिष्य खरा ठरला. याप्रमाणें हजारो उदाहरणें सांपडतील. तसा प्रकार येथें असला ह्मणून मोठें आश्चर्य नाहीं. असो या संबंधी आह्मीही जें पाहिलें व ऐकिलें तें पुढें कळवूं. कळावें. मुकाम मुंबई.

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य १ शके १८०१

फडके यास एका शिपायानें पकडलें काय!

गेले आठवड्यांत वासुदेव बळवंत फडके यास मे० ड्यानियल साहेब पुण्याचे पोलिस सुपिंटेंडेंट यांणीं पकडल्याविषयीं आह्मी लिहिलें आहे. व त्यांस सुगावा कसा लागला, ते हैदराबादेस कसे गेले व पुढें गनुरास जाऊन तेथून देवलनडगी या गावीं वासुदेवास धरलें कसें वगैरे सर्व हकीकत टाइम्स पत्राच्या आधारानें लिहिली ओह. पण आज तद्विरुध्द हकीकत आह्मास सोलापुरच्या कल्पतरूकर्त्या आमच्या बंधूकडून समजली आहे. ते ह्मणतात कीं, सोलापुरचे रेलवे स्टेशनावरून वासुदेवास पुण्याकडे नेतांनां आह्मी प्रत्यक्ष पाहिलें. त्यावेळीं त्याचे जवळ भिवा नावाचा शिपाई हजर होता व मींच त्यास धरिलें असें तो स्टेशनावर असलेल्या बतुत युरोपियन व नेटिव लोकांसमक्ष सांगत होता. व ती हकीकत आमच्या बंधूस खरी वाटत ओह. व त्यासच ३००० रूपये बक्षिस मिळणें योग्य आहे असें ते ह्मणतात. व टाइम्समधील हकीकत डानियल साहेबाची बहादुरी दाखविण्याकरितां कोणी तत्पक्षपाती मनुष्यानें लिहिली असावी असें अनुमान करितात. व थोरांनीं कांहीं केलें तरी शोभतेंच असें ह्मणून ते आपला लेख पुरा करितात. तेव्हां आतां या दोहोंत खरें कोणतें असेल तें असो. पहिली हकीकत आह्मी लिहिलीच आहे, आतां दुसरीही वाचकां पुढे ठेवितों. पण या शिपायानें ही हकीकत आपले बढाईसाठीं तिखट मीठ लावून सांगितली नसेल व बक्षिसाचे आशेनें तो यशाचा झेंडा आपल्याकडे ओढून घेत नसेल असेंही ह्मणवत नाहीं. आतां कदाचित त्याची हकीकत खरी असून तो अजीबाद मागें पडेल तर पुढील श्लोकाप्रमाणें झालें असें ह्मणावें लागेल.

श्लोक.

वाणी दरिद्रस्य शुभा हितापि
अर्थेन शब्देन च संयुतापि
न तिष्ठते वित्तवत: समीपे
भेरीनिनादो पहतेव वीणा. ॥ १ ॥

असो: भिवाची हकीकत अशी:—

वासुदेव बळवंत फडके हा फिरत फिरत कांहीं दिवस गाणगापुरास येऊन राहिला होता. हा तीर्थयात्रा करीत होता, किंवा खरोखर आजपर्यंत जे दरोडे पडले त्यांत होता याचा अद्याप खुलासा नाहीं. त्याचे नावाचा पुकारा झाल्यावरून व त्याचा पत्ता नसल्यावरून सरकारानें त्यास धरण्याचा सक्त प्रयत्न केला. ज्या आफिसांत फडके हा नोकर होता त्याच आफिसांतील १० रूपये पगाराचा एक भिवा नावाचा शिपाई ओह त्यानें त्यास मोठ्या मसलतीनें पडकला. भिवानें सरकारचा असा हुकूम घेतला होता कीं मी जिकडे जाईन व ज्या हद्दींत वासुदेव बळवंत फडके याचा पत्ता लागेल त्या हद्दीचे सरकाराकडून मी मागेन तितकी मदत मला मिळावी. त्या प्रमाणें सरकाराकडून आंतून सर्व तजवीज झालेली होतीच. नंतर भिवानें आपल्या सरकारची परवानगी आहे असें समजून पूर्वीचा वेष पालटला व ज्या प्रमाणें वाण्याचा गुरू एकादा जंगम असतो त्याप्रमाणें दाढी मिशी काढून भगव्या वस्त्रांचा स्वीकार केला व गळ्यांत एक मोठें थोर लिंग बांधिलें. असें केल्या नंतर त्यास वासुदेव हा गाणगापुरास आहे असा सुगावा लागला. त्यावरून तोही कांहीं दिवस गाणगापुरास त्याची पाळत राखित सदरच्या थाटानें फिरत होता. हे दोघेंही एकाच आफिसांत नोकर बहुत दिवस असल्यामुळें हाच वासुदेव बळवंत खरा अशी जेव्हां भिवाची खात्री झाली तेव्हां भिवानें निजाम सरकाराकडून २०० लोकांची मदत मागविली व ती मदतही येऊन भिवाचे विचारानें छपून होती. नंतर गेले रविवारीं वासुदेव बळवंत आपले बरोबर असलेले एका ब्राह्मणासह गाणगापुराहून निघाला. तो गाणगापुरापासून सुमारें सहा कोसांवर जाऊन रात्रौ रानांत एका देवालयांत निजला. या वेळीं वासुदेव हा हत्यारबंद होता. गाणगापुराहून वासुदेव निघाल्याची व कोणते रस्त्यानें कोठें गेला याची त्याचे पाळतीवर असलेल्ल भिवास तात्काळ खबर समजली. नंतर आलेले मदती सहीत भिवाही गाणगापुराहून त्याचे पाठोपाठ निघाला. इकडे वासुदेव हा रात्रौ अकरा वाजण्याचा समय पाहून जंगलांत बरोबरचे ब्राह्मणासह निर्भयपणानें निजला, परंतु त्याचे कालगतीमुळें यांनीं त्याचे जवळ जाऊन त्यास बरेच अंतरावर गराडा घातला व भिवा यानें आपली हाल चाल त्यास न कळूं देतां त्याचे जवळ जाऊन त्याचे हातालगत असलेली तरवार मुकाट्यानें उचलून घेतली. व गराडा घातलेल्ल लोकांस इशारा करून, कोण आहे? वासुदेव, ऊठ, सावध हो, ह्मणून भिवानें एकदम त्यास हाक मारली. तेव्हां वासुदेव उठून पाहतो तों जिकडे तिकडे भयंकर प्रकारचा देखावा त्याचे पाहण्यांत आला या वेळीं वासुदेवाच्या मनाची स्थिति कशी झाली असेल याचा विचार वाचकांनींच करावा- लागलींच त्याचीं सर्व गात्रें विगलित होऊन मोठ्या खिन्नतेनें उठून बसला. इतक्यांत सर्व लोक एकत्र होऊन त्यास पकडला. ज्या वेळीं पकडला त्या वेळीं उभयतांची चकमक झडली असावी. कारण वासुदेवाचे छातीवर एकवार आहे. पकडल्या नंतर त्याचे हातांत बेड्या घालून गुडुरचे रेलवे स्टेशनावर घेऊन आले. नंतर पुण्याचे प्रसिद्ध विजयी मे० ड्यानियल साहेब पो० सु० यांस वासुदेव पकडून आणलों आहे, आपण लौकर यावें ह्मणून भिवानें तार केली. अशा शूरत्वाची व आनंदाची तार पोंचतांच ड्यानियल साहेब हेही त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. मग वासुदेव बळवंत व त्याचा ब्राह्मण व हा बनलेला अय्या यांसह गेले मंगळवारीं सायंकाळीं सोलापुरचे रेलवे स्टेशनावर आले. या वेळचा वासुदेवाचा पोषाख, डोक्यास एक पटका, अंगांत एक बंडी व तिजवरून एक पैरण होती, तशीच एक तरवार, एक पिस्तुल व एक वाजविण्याचें शिंग होतें. वासुदेवानें दाढी व डोक्याचें केश वाढविले आहेत.

ज्या वेळीं त्यास एथें पाहिला त्यावेळीं कडेकोट बंदोबस्तांत तो होता तरी त्याचा चेहरा सतेज दिसत असून मोठ्या आनंदांत होता. त्याचे जवळ त्याचे बरोबरचा ब्राह्मण सन्निध बसलेला होता. व त्या प्रमाणेंच शूर विजयी

झालेले तरवार बहादर भिवाजी नाईक हेही पेढे बर्फी खात गप्पा मारीत मोठ्या मिजासीनें व ऐष आरामीनें बसलेले होते व तेच दिवशीं रात्रौ सर्व जण प्यासेंजर गाडींतून पुण्याकडे गेले.

चहाडी.

चहाडी ह्मणजे एकाची न सांगण्याजोगी गोष्ट दुसऱ्यास सांगणें. हा मोठा दुर्गुण आहे व या पासून जगांत मोठे प्रळय होतात. मित्रामित्रांत वाकडीं येतात, कुटुंबांत कलह लागतो, व जीवास जीव देणारे असेही गृहस्थ परस्पर शत्रू होतात, अशा उलाटापालटी करवळ चहाडखोराची दुष्ट जिभली हलून होतात सबब ही महाघातक चहाडीची सवय कोणासही लागली नाहीं तर फार बेर होईल. पण या कलियुगांतील जगांत तसें होणें परम दुर्घट आहे. सत्ययुगांत एका परटानें आपली जीभ हलविली तर परम नीतिनिपुण राजा रामचंद्रानें आपल्या प्रियपत्नीस अरण्यांत घालवून तिचे हाल केले. त्रेतायुगांत नारद महामुनीनीं जागोजाग कलह लाविले व त्यांचे काय काय परिणाम झाले हें नाटकांवरून व पुराण ग्रंथांवरून आपणास चांगलें ठाऊक आहे. तेव्हां आतांच्या काळांत तर चांगलें करतां चांगलें होण्याची पंचाईत, तेव्हां येथें दुर्वृत्तीनें चांगल्याची आशा करणें व्यर्थ आहे. अस्तु.

चहाडखोर ह्मणजे एकाची गोष्ट दुसऱ्यास सांगणारा याचे त्या करण्यांत बहुधा स्वहिताचा हेतु असतो, ह्मणजे ज्याचे जवळ चुगल्या सांगावयाच्या त्याची प्रीति संपादन करून त्यापासून आपलें कल्याण करून घ्यावयाचें असतें आणि कोणाकोणास ही खोड अहेतुकही जडते. चार मंडळी जमली असली ह्मणजे तेथें नानाप्रकारच्या गोष्टी निघतात त्या सहज कानावर येतात. आणि पुढें दुसऱ्या मंडळींत किंवा कोणा गृहस्थाकडे गेले. व बोलत बसले ह्मणजे निघतां निघतां ओघानें कांहीं गोष्टी निघाल्यास प्रथम टिकाणीं ऐकल्या प्रकाराचा उपयोग करावा असें त्यास वाटून तो बोलत सुटतो. पण यांतही त्यास जरी कांहीं अधिक वाटत नसलें तरी चहाडी होते. व समयविशेषीं प्रथमच्या मंडळींतील कोणी दुसऱ्या ठिकाणच्याचा स्नेही नसला किंवा सौरस्यांतील नसला ह्मणजे मजविषयीं अमका अमका असें असें बोलत होता काय! असें त्याच्या मनांत येऊन त्याविषयीं त्याचें मन लांगलेंच दूषित होतें. ह्मणजे नाशाचा प्रकार सुरूं झाला. केवळ अहेतुक चहाडीच्या योगानें असें होतें मग सहेतुकीचा प्रकार कोणते पल्ल्यास जाईल हें विचारावयास नको. त्या चहाडींत तर मग पदरमोड करणें, तिखटमीठ लावून गोष्ट बनावणें, आणि ज्या जवळ चहाडी सांगावयाची त्याची मर्जी आपल्यावर बहाल करून घेणें इतके हेतु असतात ह्मणून तेणेंकरून फारच अनर्थ घडतात. अरेरे! चहाडखोर उन्हा पाण्यानें घरें जाळतात ह्मणतात ती गोष्ट अशीच होय!

बरें चहाडीचे जर असे बाईट परिणाम आहेत तर ती सांगणाराचें कांहीं त्यापासून हित होत असेल काय? नाहीं. आह्मांस वाटतें खरोखर हित होत नसेल. लाघवी मनुष्य त्यापासून वारंवार चहाड्या ऐकावयास सापडाव्या ह्मणून त्याचा कांहीं द्रव्यानें फायदा करून देत असेल किंवा एकादें काम त्यास देत असेल पण तें तसें मन टिकाणार कोठून ! चहाडखोर माझी चहाडी दुसऱ्यासही सहज सांगू शकेल हा विचार त्याचे मनांत आला कीं याची पोळी संपली. व त्याप्रमाणें व्हावयाचेंच. कारण स्वभाव जो आहे तो आपला गुण करणारच. किंवा हे राजश्री चहाड खोर ठरले ह्मणजे कोणाजवळ गेले किंवा एकाद्या मंडळींत गेले ह्मणजे ते याच्या देखत बोलणेंच बंद करितात व साशंक असतात. मंडळींतून कित्येक निस्पृह तरी पडद्या पडद्यांतून वाक्शस्त्रानें त्याला घाव करितात मग तो अहेतुक चहाडखोर असला तर खजील होऊन निघून गेल्यावर पश्चात्ताप पावतो व पुढें कदाचित त्याची वृत्ती सुधारते आणि दुसऱ्या प्रकारचा असतो तो निगरगट्ट कांहीं उमज न पावतां तसाच राहतो पण तेणेंकरून लोक त्या देखत कांहीं गोष्ट बोलण्याचें बंद करित गेल्यामुळें त्याला चहाडी सांगण्याला कांहीं सामुग्री मिळत नाहीं मग त्यापासून आपला कांहीं उपयेाग होत नाहीं ह्मणून त्याचे पोशिंदेही त्याचा कंटाळा करितात. एवंच तो " अतोभ्रष्टस्ततो भ्रष्टः " असा होतो.

हा उपदेश मनुष्य मात्रांनीं ध्यानांत ठेवण्या सारखा आहे. आपण चहाडी कधी कोणाची सांगू नये. आपण कांहीं कोणाचे निरोपे नाहीं. किंवा कोणाचे हेर नाहीं. निरुपद्रवीक मौजेसाठीं कोणी मंडळी कांहीं बोलत बसली व आपण त्यांत असलों तर त्यांच्या कर्मणुकीचा कोणी भलता उपयोग करावा हें फार नीच कृत्य आहे व आमच्या मतें मोठें पातक आहे. " पराचा कावळा होतो" ह्मणतात पण तो कशानें होतो? असले प्राणी आपल्या दुष्ट जिव्हेचा निंद्य उपयेाग करितात ह्मणून होतो. शहाणा मनुष्य विचारानें त्या पराचा कावळा न होऊं देतां परच नाहींसा करितो. असे मनुष्य जगास पाहिजे आहेत. लावालावी करणारे प्राणी चांगले नव्हेत व हें जे समजतात ते त्याचा आदर करीत नाहींत. तर असेंच सर्वांनीं समजावें व सर्वत्र त्याचा अनादर होऊं द्यावा ह्मणजे ते शुद्धीवर आले तर येतील असें आमचें मत आहे. कोणा संबंधी कोणी सहज दोन शब्द बोलले तर ठेवीचे द्रव्याप्रमाणें हृदयांत सांठवून ठेवावे हा उत्तम मार्ग होय आणि तसें ज्यास न करवेल त्यानें आपले तें द्रव्य लोकांचे हातीं देऊन लुटवून नेल्या सारखें करण्यापेक्षां विसरून जावें ह्मणजे जागच्या जागीं नाहींसें होऊं द्यावें हा त्याहून उत्तम मार्ग होय.

चहाडखोराची दुष्ट संवय बंद करणें हें चहाड्या ऐकणारांच्या हातींही पुष्कळ आहे किंवा याहून अधिक ह्मटलें तर चहाडास उत्तेजन देणारे, चहाड्या ऐकणारे होत ह्मणून ते या कामीं चहाडोपेक्षां कमी दोषी नाहींत. थोर मनुष्यांनीं, शहाण्यानीं, मोठाल्या कामदारांनीं कोणास कानाशीं लागू देणें सर्वथैव वर्जावें हें त्यांस त्यांचे थोरवीचे संरक्षणार्थ मोठें भूषण आहे. त्यांनीं चहाडांचा एक दोनवार चांगली कान झाडणी केली व तो दुर्गुण टाकण्याविषयीं त्यास सांगितलें तर त्या मनुष्याचा व त्यांचे स्वतांचा मोठा नफा आहे. सरळ गोष्ट सरळ मार्गानें जेवढी आपणापुढें येते तेवढ्याचाच आपण विचार करावा. व आडमार्गानें हलक्या मनुष्यापासून समजलेल्या गोष्टी मनावर घेऊं नयेत व त्यांचा कांहीं उपयेाग करूं नये हें त्यांस मोठें भूषण आहे व असें ते करूं लागेल ह्मणजे चहाडांची आपोआप खोड मोडते सबब त्यांनींही हा उपदेश घ्यावा. असें आमचे त्यांस सांगणें आहे.

जूट व विलायती अंबाडी.

ह्या अफाट भूगोलामध्यें नाना प्रकारची झाडें वृक्ष पाषाणादिकरून आहेत. व त्यांचा उपयोगही वेगवेगळाले ठिकाणीं वेगवेगळाले प्रकारचा होतो. पण त्याची माहिती आपणास फारशी नाहीं. जे आळसी आहेत त्यानीं नवीन शोध करणें तर येकीकडेच पण पूर्वजाच्या शोधाची चलती राखणें हेंही त्यांकडून होत नाहीं. आलीकडे विद्येचा पूर्ण पणें प्रसार झालेल्या देशांतून व प्रसिद्ध राष्ट्रांतून विद्वान लोकांचें लक्ष नवीन शोधाकडे लागलें आहे. इतकेंच नव्हे तर त्यांचा प्रसार करण्याकडे पुष्कळ लागलेलें आहे. तेणेंकरूनें आज आमचेकडे " जूट व विलायती अंबाडी " याजबद्दल चाललेली वाटाघाट व शेवटचें श्रेय फलरूपानें प्राप्त झालें तें पाहून आमचे मनांत आमचे वाचकांस त्यासंबंधानें च्यार ओळी वाचण्याचा तसदी द्यावी असें आलें आहे.

जूट नावाचीं बंगाल्याकडे झाडें आहेत त्यांजपासून धागे निघतात. व त्यांचे गोणपाट वगैरे संरक्षणास भरड असें कापड कलकत्याकडून तयार होऊन इकडे येत असतें. हल्लीं त्याचेच धाग्याप्रमाणें व त्याचेच योग्यतेच्या उपयोगी धागे दुसरे एका जंगली झाडापासून उत्पन्न होतात असें बाहेर पडलें आहे. व त्याचा अनुभव घेऊन त्या जंगली झाडांची लागवड करण्याचे लोकांनींच काय पण खुद्द सरकारानेंही मनावर घेतलें आहे. व मुंबईसरकारानें ठरावही केला आहे कीं, ह्या झाडांची लागवड ठिकठिकाणीं होऊन त्याचा प्रसार व्हावा. व कदाचित उत्पन्न न झालें तर त्या जमीनीचा त्या वर्षाचा सारा माफ केला जाईल असेंही सरकारानें अभिवचन दिलें आहे.

ह्या झाडाचें नांव मराठींत नाहीं त्याला " विलायती अंबाडा" असें नवीन नांव दिलें आहे, पण नांव देणारांचे हेतूनें सदर्हू नांव जशीं दुसरीं नावें आहेत त्यांसारखें असलें पाहिजे. " विलायती धोत्रा " हा हिंदुस्थानी धोत्र्या जवळ जवळ असतो. त्याप्रमाणें हें झाड कांहीं थोडे अंबाडीचे झाडा सारखें असावें असें वाटतें. हीं झाडें मुंबईतील ओसाड जाग्यांत फार उगवत असतात. असें डा० ग्रे साहेब ह्मणतात. ह्या झाडांचे धाग्याचा नमुना मुंबई सरकाराकडे आला तो त्याणीं " चेंबर आफ कामर्स " या नावाच्या सभेकडे पाठविला. तेथें तो पसंत ठरल्याबद्दल लेख आहे तो असाः— " हे धागे जुटाच्या धाग्याप्रमाणें दिसतात इतकेंच नाहीं तर सर्व प्रकारें जुटाच्या उपयोगाप्रमाणें याचा उपयेाग होईल. " सन १८७५ सालापासून या जबद्दल चर्चा चालली आहे. व आजपर्यंत याचा प्रसारही मुंबई सरकारानें बराच केला आहे.

विलायती अंबाडी हें झाड आह्माला जरी तादृश माहित नाहीं तत्रापि आह्मांस वाटतें कीं, हीं झाडें वऱ्हाड प्रांतांतही असतीलं. जळगाव जामोद या पहाडांतून कांहीं शेतकरी लोक वाख निघणाऱ्या काड्या आणितात त्याचा वाखही रेशमाप्रमाणें मऊ असतो. तेंच हें झाड कदाचित असावें. तें कसेंही असो. पण ज्या अर्थी हा नवीन शोध लागलेला आहे. व त्याजपासून बराच फायदा होणार आहे तर आतां या कामास शेतकरी लोकांनीं साह्य केलें पाहिजे. व प्रत्येकानें या बियाचा अनुभव घेऊन पाहिला पाहिजे. आह्मांस खचित वाटतें कीं, या झाडांची लागवड करण्याचा प्रसार करणारानीं बी मिळण्याची सोय जिल्ह्यानिहाय केली किंवा निदान प्रांतानिहाय केली तर या उद्योगाला पुष्कळ लोक सहज लागतील व यापासून जर उपयोग झाला तर या वऱ्हाडांतच हजारो रूपयांच्या बोंड्या व गोणपाट खपतात तो सर्व पैसा वऱ्हाडांतच राहील आणि तोही एक क्षुद्रजातीच्या जंगली झाडापासून, तेव्हां ह्या फायद्यासारखा आणिक फायदा व्यवहारज्ञांस कोणता मोठा आहे! आह्मांस खचित वाटतें कीं, जर ह्या झाडांचे लागवडीचा प्रचार वऱ्हाडांत चालू झाला तर वऱ्हाडवासी लोकांस काय पण मजूरासही बराच फायदा होईल.

या प्रकरणीं सविस्तर माहितीचा लेख मुंबईच्या विक्टोरिया आणि अलबर्ट म्यूझियमचे सेक्रेटरी आणि क्युरेटर यांनीं आह्मांस पाठविला आहे तो आह्मी आभारपूर्वक नमूद्हे ण करितो. व त्यांतील माहिती अधिक तपशिलानें पुढील खेपेस आह्मी आपले वाचकांस कळविण्याचें कबूल करितों.

काबुलच्या लढाईत ज्यांनी उत्तम कामें केलीं व सरकारास चांगलें सहाय केलें त्यांस मानाच्या पदव्या सरकारांतून मिळाल्या त्यांची नावनिशी ग्याझेटांत प्रसिद्ध झाली आहे. मे. कावनगरी, ले० ज. स्टीवर्ट, ले० ज. सर स्याम ब्राऊन, ले. ज. माड, व मे. ज. विडलफ, राईट, आणि लमस्डन, यांस नाइट कम्पांडर आफ धि व्याथ केलें. तसेंच ११ गृहस्थांस कंप्यानियन आफ धि व्याथ केलें. त्यांत मि. लायल साहेब जे वऱ्हाडांत कामिशनर होते त्यांचें नाव प्रथम आहे. आनररी नाइट ग्रांड कम्पांडर आफ दि स्टार आफ इंडिया हा किताब खिलातच्या खानास दिला. व नाइट ग्रांड कम्पांडर आफ धि स्टार आफ इंडिया हा किताब नभाच्या राजास मिळाला.

काबुलास नेमिलेले रेसिडेंट मे. कावगनरी हे ता. २४ जुलै रोजीं पहाटेस काबुलास जाऊन दाखल झाले. त्यांचा अमीरानें बहुत सन्मान केला. शहराच्या अलीकडे ४ मैलावर ते गेले तों सरदार अबदुलखान हिराती व मुल्ला शहामहमद हे २ हत्ती व घोडेस्वार घेऊन त्यांच्या पेशवाईस गेले. नंतर कावगनरी साहेब हत्तीवर बसून दोहो बाजूनें घोडेस्वारांचा थाट चालवून शहरांत यावयास निघाले. शहराचे बाहेर पायदळाच्या ९ पलटणी, घो

डे स्वारांच्या पलटणी व २ तोफखाने त्यांच्या सलामीकरितां सज्ज होते. त्यानीं वाद्यें वाजवून व तोफा सोडून त्यांस लश्करी रीतीचा योग्य मान दिला. व स्वारी शहरांत शिरतांच थोरल्या तोफखान्यांतून १७ तोफांची सरबत्ती झाली. मौंज पहाण्याकरितां लोकसमुदाय फारच मिळाला होता व तो व्यवस्थाशीर होता. मुस्ताफी आणि दाउदशहा हे रेसिडेंट साहेबाचे रहाण्याचे ठिकाणीं जाऊन त्यांस भेटले. नंतर सहा वाजतां साहेब बहादुरांनीं अमीर साहेबांची भेट घेतली व व्हाइसराय साहेबांचें पत्र त्यांस दिलें. अमीर साहेबांनीं आदरपूर्वक त्यांची भेट घेऊन आपला संतोष दाखविला व व्हाइसराय साहेबांचें आणि चक्रवर्तिनी साहेबांचें व त्यांच्या मुलांलेकरांचें कुशळ विचारलें.

वऱ्हाड.

हवा सर्द झाली आहे. मधून मधून एक दोन दिवशीं पाऊस पडतो. नदीला पूर कि येक आले. गावांत ज्वराची सांथ आली आहे तेणेंकरून बहुत लोक आजारी आहेत. नारूचा आजारही अजून कित्येकांस आहे. याचा प्रसार याच वर्षीं एथें विशेष झाला. वर यावर रामबाण औषध अजून कांहीं कोणास मिळालें नाहीं.

रा. ब. नाना भाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर गुरुवारीं एथें येऊन शुक्रवारीं आपले कामावर रुजू झाले. मि. एटकिन साहेब आपले हायस्कुलाचे जागेवर परत आल्यानें रा. रा. रामचंद्र नारायण साधले हे रिकामे झाले. हे गृहस्थ हुशार व मेहनती आहेत यांस डायरेक्टर साहेब दुसरी एकादि जागा देतील.

मि. स्टिविन्सन साहेब पोलीस इन्स्पेक्टर पुण्याकडे वासुदेव बळवंत फडके याचे प्रकरणांत गेले आहेत त्यांचें काम पहाण्यास वर्गावर्गी केली आहे तींत रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी यांस अकोल्यास अर्किटग इन्स्पेक्टर नेमलें. याबद्दल आह्मांस संतोष वाटतो.

जुडिशियल कमिशनर साहेबाची स्वारी बुलढाण्याकडे सेशनासाठीं कालचे गाडीनें गेली.

उमरावतीची मंडळी तेथें एक प्रदर्शन करण्याच्या खटपटींत आहे. हा त्यांचा उद्योग स्तुत्य आहे.

मि. महमद मुबारकअल्ली दारव्होच तहशिलदार व रा. रा. सिताराम माणकेश्वर मूर्तिजापुरचे नायबतहशिलदार यांजवर जमादार यांनीं अब्रूचे नुकसानाबद्दल दावे केले आहेत त्यांची चौकशी डिपुटी कमिशनर मे. लाटण साहेब यांपुढें या आठवड्यांत चालली होती. त्यांत तीन तीन मुद्दे काढले आहेत ते अशा अर्थाचे आहेत कीं, त्यांस जमादार याची चौकशी करण्याचे अखत्यार होते किंवा नाहीं ? न्यायाधिकार नात्यानें सन १८५० चा आक्ट १८ प्रमाणें त्यांचा बचाव होतो किंवा नाहीं, व नुकसान देणें योग्य असल्यास किती द्यावें? या मुद्यांवर ६ वे तारखेपावेतो उभय पक्षकारानीं आंपआपला पुरावा हजर करावा म्हणून हुकूम झाले आहेत. पुढें कोणती तारीख नेमितात पहावें. जमादार तर्फे रा. रा. दिनकर गंगाधर भट हे मुंबईहून वकील आले होते.

इलिचपुर तालुक्यांतील वासणी गावच्या जहागिरदाराची व रयतेची मोठी मारामारी झाली. तिचा निकाल मे० मेकंजी साहेब डिपुटी कमिशनर यांणीं केला. आरोपी ७५ होते त्यांतील ९ असामींस सोडून दिलें. मुख्य चार असामींस दोन वर्षें सक्तमजुरी कैद व ५०० रुपये दंड केला, कांहींजणास एक एक महिना कैद व पन्नास पन्नास रुपये दंड केला. आणि निवळ मजूर पैशाचे लालचीनें गुन्ह्यांत शिरले त्यांस पांच पांच रुपये दंड केला असें समजतें.

रा. रा. सखाराम दत्तात्रय पेनशनर तहशिलदार बाळापुराहून गेले आठवड्यांत एथें आपले घरीं आले.

सुपिंटेंडिंग इंजिनियर मे० आलेकझांडर साहेब या आठवड्यांत एथें येऊन इंगोलीकडे जाणार आहेत असें समजतें.

रा. रा. त्रिंबकराव यशवंतराव मलकापुरचे तहशिलदार रात्रौ खिडकींतून पडल्यामुळें ते फार आजारी झाले होते. हल्लीं त्यांची प्रकृती थोडी थोडी गुणाकडे येत चालली आहे असें समजतें.

मे० क्या० गनत्राप साहेब पोलिस सुपिंटेंडेंट हे गेल्याचे मागील शनिवारीं पुण्यास गेले व ते येईपर्यंत त्यांचें काम मे० डेविस साहेब असिस्टंट कमिशनर हे पहातील.

गेल्या नेटिव ओपिनियन पत्रात या प्रांतांतील अर्किटग डायरेक्टरचे नेमणुकीचे संबंधानें कांहीं मजकूर आला आहे व त्याचाच उतारा कालचे उर्दूअखबारांत आहे हें पाहून आह्मास फार वाईट वाटतें. आमचे बंधू अखबारकर्ते यांनां वाटलें आहे कीं, हा मजकूर हल्लीं अगदी अप्रासंगिक आहे व आह्मासही वाटतें कीं, या वेळेस तो आल्यापासून कांहीं बरें निष्पन्न होण्याचा संभव नाहीं. कोणताही पक्ष कितीही खरा असला तरी त्याविषयीं भलत्या वेळीं वाटाघाट केल्यापासून कांहीं फायदा होत नाहीं. व ज्यामध्यें युरोपियन आणि नेटिव या जातींच्या हक्काचा संबंध आहे असा मजकूर भलत्यावेळीं लिहिला गेला किंवा तो लिहिण्यांत कांहीं बारीक सारीक चुका झाल्या तर त्यापासून खऱ्या पक्षास मजबुदी यावयाची ती न येतां उलटा वाईट परिणाम मात्र होण्याचा संभव आहे असें आह्मास वाटतें. आह्मी समजतों कीं, सरकार अलिकडे आपले लोकांस पुष्कळ मोठमोठाल्या जागा देऊं लागलें आहे आणि आपले रेसिडेंट मे० सर रिचर्ड मीड साहेब यांची नेटिवांविषयीं चांगली सप्रेमबुद्धि आहे असें आमच्या चांगलें अनुभवास आलें आहे; याकरितां एकादे वेळेस युरोपियनाची तरफदारी झाली असें आपल्यास वाटलें तरी हेतु उत्तम आहेत असें आपणास नेहमीं दिसत असल्यामुळें ते जें कांहीं करितात त्यास कांहीं तरी सबल व योग्य कारणें असतील असें समजणें रास्त आहे. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार केला तर जो मजकूर हल्लीं छापला गेला आहे त्यापासून कोणासही बरें वाटणार नाहीं असें आह्मी समजतों.

उमरावती— बडोद्याचे दिवाण सर टी माधवराव यांचे चिरंजीव मि. टी. रंगराव अय्याची यांची इकडे नेमणूक झाल्या प्रमाणें ते एथें आले आहेत.

गेल्या शनवारीं रात्रौ मोठ्या सपाट्यानें पर्जन्यवृष्टि झाली आणि तेव्हां पासून वरचेवर पावसाच्या सरी येतच आहेत. याचप्रमाणें हा पाऊस वऱ्हाडांत बहुतेक चहूकडे झाल्याचें समजतें.

आह्मांस असें समजण्यांत आलें आहे कीं, मंगरूळ दस्तगीर येथील कांहीं पुढारी गृहस्थांनीं तेथील शाळागृह बांधण्याकरितां २०० रुपये वर्गणी पांच असामी मिळून दिली आहे. प्र. सिं.

इलिचपुर— पर्जन्यानें बरीच रेलचेल करून दिली आहे. यामुळें शेतकरी लोकांची मनें आनंदित होऊन ते शेतकीचीं कामें मोठ्या झपाट्यानें करीत आहेत. गावांत पडसें व तापाचा आजार तुरळक चालू आहे. बाजार भाव माफकच आहेत.

मे० यासिनखा सा. अ. क. यांनीं ता० २८ रोजीं आपले कामाचा चार्ज घेतला.

आलीकडे ह्या छावणींत बऱ्याच चोऱ्या होऊं लागल्या आहेत, इकडे आमचे पोलिसानें चांगले प्रकारें नजर ठेवावी असें आह्मी त्यास सुचवितों.

रा. रा. रामचंद्र विनायक भिडे अ. मा. यांचे घरीं तारीख २५ रोजीं रात्रौ चोरी होऊन एक सोन्याची सरी वजन तोळे १३ ची गेली. सदर्हू सरीचा पत्ता अद्याप लागला नाहीं.

लार्ड लारेन्स हिंदुस्थानचे माजी गवरनर जनरल आणि व्हाइसराय विलायतेस मरण पावले त्याबद्दल दुःखप्रदर्शक जाहिरनामा हिंदुस्थान सरकारानें प्रसिद्ध केला तो अलीशान रेसिडेंट साहेबांनीं रेसिडेन्सी आर्डमध्येंही प्रसिद्ध केला आहे. लार्ड लॉरेन्स मोठे हुशार असून यांचा कारकीर्द हिंदुस्थानास फार हितावह झाली. वारन हेस्टिंग पासून असा गवरनर जनरल कोणी झाला नव्हता असें त्यांत लिहिलें आहे.

सेकंड क्लास आस्पिटल असिस्टंट सयद कादर यास पांढरकवड्याचे डिस्पेन्सरीवर नेमिलें.

मि० पी शामरेट वणीचे सिव्हिल सर्जन रजेवरून परत आले.

अपाथिकरी जी ई किंग उमरावतीचे आफिशियेटिंग सिव्हिल सरजन यांस तेथील जेलचे आफिशियेटिंग सुपिंटेंडेंट नेमिलें.

बिरार आस्पिटल असिस्टंट क्लासाकरितां पहिले तारखेस सिकंदराबाद, अकोलें आणि उमरावती एथें शाळाखात्यामार्फत परीक्षा होणार होत्या.

मि० ई डब्ल्यु एम ह्यूज ४ थे प्रतीचे एक्झिक्युटिव इंजिनियर यांस खामगाव उमरावती स्टेटरेलवेचे लोकोमोटिव सुपिंटेंडेंट नेमिलें. व त्यानीं त्या कामाचा चार्ज घेतला.

वर्तमानसार.

मुंबईस एम एची परीक्षा ता. १७ नोवेंब र रोजीं, एल एल बीची ता. २४ नोवेंबर रोजीं व लिटलगोची तारीख १ डिसेंबर रोजीं होणार.

रा. ब. केरोपंत छत्रे यांस कालेजच्या मंडळीनीं सभा भरवून एक मानपत्रादाखल संस्कृत काव्य, एक त्यांचा फोटोग्राफ, व एक सुंदर पेटी नजर दिली.

सर रिचर्ड टेंपल साहेब मुंबईचे गवर्नर गेले आठवड्यांत इंदापुर, बार्शी, सोलापुर वगैरे ठिकाणीं जाऊन पुण्यास परत आले.

वासुदेव बळवंत फडके याजजवळ एक कागद सापडला त्यांत पुढें त्यानें कोणत्या प्रकारें वागावें, कशा लढाया कराव्या, वगैरे बद्दल नियम लिहिले आहेत असें ह्मणत होते परंतु त्या कागदाचा इंग्रजी तरजुमा होऊन मजकूर समजून आल्यावरून टाइम्समध्यें लिहिलें आहे कीं त्या कागदांत तसा प्रकार बिलकूल नाहीं. त्याची स्वतांची हकीकत व त्यानें दरवेडे घातले व घालविले त्यांची यादी त्यांत आहे. राजकीय प्रकरण त्यांत कांहींच नाहीं. आणखी असेंही ह्मणतात कीं रामोशी लोकांनीं कित्येक दरवड्यांचा माल लांबविला व त्यास कांहीं दिलें नाहीं त्या त्यांच्या वर्तणुकी बद्दल वाईट वाटून त्यानें पुष्कळ त्या विरुद्ध त्या कागदांत लिहून ठेविलेलें आहे. बाकी कांहीं नाहीं.

असें असेल तर आह्मांस संतोष वाटतो. तरुण विद्वान लोकांची किंवा आणखी कोणा कोणाचीं नांवें आतां त्या कागदावरून पुढें येतात कीं काय? अशी लोकांस काळजी वाटत होती ती आतां या योगानें दूर होईल.

वासुदेव बळवंत फडके यानें पुण्यास तुरुंगांत आत्मघाताचा प्रयत्न केला होता तेव्हांपासून त्यास गोरे लोकांचे पहाऱ्यांत दिलें आहे. कोणास त्याला पाहूं बोलूं देत नाहींत, फक्त कलेक्टर साहेबांचे व पोलिस सुपिंटेंडेंट साहेबांचे पास ज्याला मिळतील तो जाऊन पाहून येतो. त्याचे अन्नांत विषप्रयोग होऊं नये ह्मणून सरकारचे अधिकारी आचाऱ्याकडून तें आपल्या समक्ष तयार करवितात व आचाऱ्यास त्याच अन्नानें आधीं जेवूं घालितात. नंतर कैदीला तें अन्न पाठवितात. त्याच्या चौकशीच्या सुरुवातीला अजून महिनाभर लागेल. मे० ड्यानियल साहेब पुन्हा मोगलाईंत गेले आहेत. कोणी ह्मणतात धरलेल्या वासुदेव बळवंत फडके याची दाढी बरीच लांब आहे व सहा महिन्यांच्या अवकाशांत इतकी दाढी कधीं कोणाची वाढत नसते. सबब हा वासुदेव नसावा. व त्याच्या बायकोला तो कैदी दाखविला तेव्हां तीही हा आपला नवरा नव्हे ह्मणाली असें ह्मणतात.

विश्राम बागेचे वाड्याची पुन्हः उभारणी करण्याचे उद्देशें पुण्यास ता. २४ जुलाई रोजीं हिराबागेंत मेठी सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं खान बहादूर दस्तूर नसरवानजी जामासजी साहेब होते. डायरेक्टर साहेबें व कलेक्टर साहेब सभेस होते व सुमार ५०० नेटिव मंडळी होती. वाडा पुन्हा बांधण्याचा विचार ठरून वर्गणीची यादी सुरू झाली व त्या दिवशीं ३५०० रुपयांचे अकडे पडले.

फ्रान्स देशांत टपालचे कामाकडे ६००० खबुतरें आहेत.

श्री० रा० बापुसाहेब विंचूरकर फर्स्ट क्लास सरदार हे तारीख २९ जुलाई रोजीं पुण्यास मरण पावले असें समजतें.

तापी नदींत ग्रहणाचे दिवशीं स्नानास गेलेलीं ३ मुलें बुडून मरण पावलीं.

वलसाड तालुक्यांत एका कोळ्यानें एका आपल्या ४५ वर्षांचे बयाच्या आपल्या मुलास दारूच्या अमलांत ठार मारिलें.

रशिया देशात नवगोरद एथें मोठी आग लागून सर्व बाजार जळाला. व १७ मनुष्यें जळून मेलीं.

अमदाबादेस कालेज करण्याचा विलायत सरकारचा ठराव झाला. तेथें हायस्कूल आहे तें मोडून त्याचेच खर्चांत कालेज चालविणार. सरकारानें सालीना ८००० रुपये या काले जाप्रीत्यर्थ खर्च करण्याचा ठराव केला आहे.

विलायतेस वर्तमानपत्रावर डाकहशील ४ पै आहे. व हिंदुस्थानांत विद्येची गोडी लोकांस कमी असून वर्तमानपत्रांवर डाकहशील ६ पै आहे तें फार असल्यामुळें सरकारानें मेहरबानीनें कमी केल्यास वर्तमानपत्रांची वृद्धी होऊन फैलाव वाढेल. व सरकारचेंही नुकसान होणार नाहीं.

इंडियर मिरर पत्रांत लिहिलें आहे कीं, कलकत्ता एथें गेलें सूर्यग्रहण मुळींच दिसलें नाहीं. तथापि धर्मभोळ्या हजारो लोकांनीं त्या वेळेस भागीरथीवर जाऊन बुटकळ्या मारल्या.

नागपुरास वेड्यांचे इस्पितळांत ठेवण्याकरितां ५३ मनुष्य आणिले होते त्यांतून ४४ ठेवून घेतले. व मागच्या पैकीं निरुपद्रवी वेडे व कांहीं दुरुस्त होण्याची आशा नाहीं असे वेडे त्यांचे आप्तवर्गास परत दिले. एका वेड्याविषयीं असें समजलें आहे कीं तो शाळेचा अभ्यास फार करून वर्गांत नंबर वर रा खण्याचे झटीस पडला असतां वेडा झाला.

अफगाणिस्थानांत सर्वत्र स्वस्थता झाली आहे. व इंग्लिश सरकारास सर्व लोक अनुकूळ बोलतात. अमीरही सरकारासी मोठ्या नेकीनें वागत आहेत. खोडकर लोक मात्र अजून कांही कांहीं उलाढाली करीत आहेत.

मुंबईस म्युनिसिप्यालिटीचें आफीस बांधण्याकरितां अडीच लक्ष रुपये खर्च करावे असा विचार चालला आहे.

बारशीस गवर्नर साहेब गेले होते तेव्हां लोकांनीं नळाचें पाणी आणविण्याविषयीं व कुरडूवाडी स्टेशनापासून रेलवे करण्याविषयीं त्यांस मागणें मागितलें. ते म्हणाले कीं पानगावचा तलाव झाल्यावर पाण्याची सोय करू. व रेलवे करण्याविषयींचा विचार आहे परंतु जरूरीच्या दुसऱ्या कामामुळें तो आतांच होईल असें नाहीं.

सोलापुरास पुअर हौस म्हणजे अनाथ लोकांकरितां भोजन गृह केलेलें आहे त्यांत फक्त मृत्यूच्या दाढेंत जाणारे अति दुर्बल लोक मात्र घेत असत परंतु अलीकडे ना. गवर्नर साहेब तेथें जाऊन आल्यापासून थकलेले, अशक्त, अन्न अन्न करीत हिंडणारे या सर्वांची त्या घरांत सोय करावी असें त्यांनीं सांगितल्यावरून त्यांस त्यांत सामील केलें आहे.

सोलापुराकडे चोऱ्यांचा उपद्रव फार आहे. दररोज ८।१० चोरट्यांस फटक्यांची शिक्षा चालू आहे.

बंगालचे लेफ्टिनेंट गवर्नर सर अशली ईडन साहेब के सी एस आय यांस लश्करी खर्च कमी करण्याचे कमिशनांत अध्यक्ष नेमिलें आहे म्हणून ते त्या कामावर आहेत तों पर्यंत त्यांचे जागेवर सर स्टुअर्ट बेली साहेब आसामचे चीफ कमिशनर यांस नेमिलें आहे.

महत्कृत्ये— भूच्छेदकरून त्या जागीं सामुद्रधुनी करण्याचीं तीन स्थळें जगतांत विचारापुढें आहेत. १ लें गारोन नदीचें पात्र भूमध्य समुद्रापर्यंत खणून तो कालवा केल्यास इंग्लंडांतून भूमध्यसमुद्रांत येणाऱ्या गलबतांस स्पेन व पोर्तुगालचे द्वीपकल्पास वळसा घालावा लागणार नाहीं. व त्यामुळें विलायतचे डांकेस येथें येण्यास सुमार ३ दिवस कमी पुरतील. २ रें, कारिंथची संयोगीभूमि छेदल्यानें ट्रिस्टीहून कान्स्टांटिनोपलास येणाऱ्या जाणाऱ्या गलबतांच्या आथेन्स शहर हें अगदीं वाटेवर येणार आहे. आणि तिसरें, उत्तर व दाक्षिण अमेरिकेस जोडणारे पनामा संयोगीभूमीचा छेद करणें हें काम तिन्ही कामांत विशेष मोठें व खर्चाचें आहे.

विलायतेंत जाडे विद्वान एंजिनियर तयार करण्याकरतां जे कूपर्सहिल कालेज स्थापन झालें आहे तें लवकरच बंद करण्याची बातमी निघाली होती व ही गोष्ट लिहिण्यास सर्वांस आनंद वाटला. कारण अगोदर या देशांत लागणारे इंजनेर एथेंच तयार होऊं शकतात, यासाठीं ते बाहेरें देशाहून अणण्याची वस्तुतः कांहींच जरूर नाहीं, व यामुळें असे इंजनेर बाहेरून तयार करून विनाकारण मोठमोठे पगार देऊन इकडे पाठविण्यांत येतात त्या योगानें या देशाचें पुष्कळ नुकसान होतें तें या योगानें बंद होईल. परंतु ती बातमी खोटी आहे असें आतां कळतें.

सांप्रत काश्मीर प्रांतांत दुष्काळ जारी असून महाराजांची स्वारी श्रीनगरास आली आहे. श्रीनगर येथील नेहमीची लोकसंख्या तीन लक्ष असते तथापि दुष्काळाचे कारणानें त्या शहरांत हल्लीं फक्त तीन हजारच लोक राहिले आहेत! हरहर!!

प्रोफेसर केरोपंत छत्रे यांचें भाकित

(सन १८८० सालांत दुष्काळ)

दुर्दैवें आमच्या लोकांच्या हात धुवून पाठीस लागलें आहे. सन १८७७ चा दुष्काळ झाला व दुष्काळ कमी होत आहे तों मि ठावरील कर व लायसेन्स कर आला. सन १८७८ त पर्जन्य विपुल लागला; परंतु सन १८७७ च्या दुष्काळानें शेती करण्याचें लोकांस सामर्थ्य नाहींसें झालें व ज्यांणीं शेतें पेरलीं त्यांचा उंदरांनीं नाश केला. आतां तरी सुबत्तेचे दिवस येतील म्हणून लोक अशा करीत होते परंतु यंदाही सुचिन्ह दिसत नाहीं. यंदाही उंदीर नाश करित आहेत व आज सहा महिने दरोडे पडत आहेत. पूर्व बंगाल्यांत गरीब लोकांस कंदमुळेंही मिळत नाहींशीं झालीं आहेत असें तिकडील पत्रांत वाचण्यांत येतें. काश्मिर येथें दुष्काळाचें स्वरूप इतकें भयंकर झाल्याची बातमी आहे कीं, मुख्य राजधानीचे शहरांतून घरेंदारें सोडून लोक जात आहेत. व आमचे इकडेही पर्जन्य पाहिजे तसा नाहीं. पर्जन्य मधून मधून पडत आहे म्हणून कोठेंही सफाई नुकसान झाले किंवा शेतें अजी सुकून गेलीं अशी बातमी नाहीं; तथापि पर्जन्याच्या कमताईमुळें कोकणांतील पिकास कांहीं तरी धोका आल्याशिवाय राहत नाहीं असें आतांच वाटूं लागलें आहे. व देशावरही पुष्कळ ठिकाणीं पर्जन्य कमी आहे. गुदस्त सालीं आज तारेखेपर्यंत मुंबईस सुमार ८४ इंच पर्जन्य पडला होता व यंदा अजूनपर्यंत सरासरी ३० इंच पडला आहे व आणखी महिना दोन महिने पर्जन्याचे जावयाचे आहेत ते कसे जातात ही काळजीच आहे. परंतु इतक्यानेही दुर्दैव सोडीत नाहीं. सन १८८० सालीं दुष्काळ पडणार असें रा. ब. केरोपंत छत्रे यांणीं भविष्य केलें आहे. सन १८८० सालीं दुष्काळ पडणार असें जें केरोपंतानीं भविष्य केलें आहे त्यास त्यांनीं कोणाही मनुष्यास समजण्या सारखीं कारणें दाखविलीं आहेत व आपलें हें म्हणणें सरकारास कळविलें आहे. हा विषय फारच महत्वाचा असून त्याविषयीं सरकारास व लोकांस पूर्वी कळल्यास अपरमित फायदा होणार आहे. पुढें दुष्काळ पडणार हें पूर्वी कळल्यास योग्य उपाय योजण्यास सरकारास संधी सापडणार आहे व लोकांसही थोडें फार सावध राहतां येईल. आतां दुष्काळ अमुकच नियमित भागांत पडेल असा अद्यापि निर्णय करतां येत नाहीं; यासाठीं लोकांस पाहिजे तितका फायदा करून घेतां येणार नाहीं. तथापि कोठेंही हा दुष्काळ पडला तरी सरकारास लोकांचें संरक्षण करावयाचें आहे तेव्हां लोकांपेक्षां सरकारास या पासून चांगला फायदा करून घेतां येईल. दुष्काळ पडण्यास केरोपंतांनीं मुख्यत्वेंकरून दोन कारणें दाखविलीं आहेत.

पहिलें, सन १८२२ सालीं मुंबईत ११२ इंच पर्जन्य पडला, १८२३ सालीं ६२ इंच दडला व १८२४ सालीं ५४ इंच पडलीं. नंतर पुन्हा सन १८२८ सालीं मुंबईस १२२ इंच पर्जन्य पडला. व १८२९ सालीं ६६ इंच पडला. पुन्हा १८४९ सालीं मुंबईत ११९ इंच पर्जन्य पडला. व १८५० सालीं फक्त ५१ इंच पडला. पुन्हा सन १८६९ सालीं मुंबईत ११५ इंच पर्जन्य पडला. व १८७० सालीं ८१ इंच पडला. व ६१ सालीं ४७ इंच पडला. रत्नागिरीचा पर्जन्य पाहिला तर वर लिहिल्या प्रमाणेंच क्रम आढळतो. यावरून फक्त कोंकण प्रांताचाच विचार केला तर ज्या सालीं बाजवीपेक्षां ज्यास्त पर्जन्य पडला आहे त्याच वर्षानंतर पहिल्या किंवा दुसऱ्या सालांत पर्जन्य कमी पडतो अशी कल्पना करण्यास हरकत नाहीं. गुदस्तसालीं मुंबईत १२२ इंच पर्जन्य पडला आहे यासाठीं येते सालीं मागील क्रमाप्रमाणें पर्जन्य कमी पडला पाहिजे.

दुसरें, पर्जन्य कमजास्ती पडणें हें आणखी सूर्यावरील ठिपके किंवा डाग कमजास्ती होण्यावर आहे. सूर्यावर डाग आहेत, व ते क्रमानें ज्याप्रमाणें कमी किंवा जास्ती होतात त्याप्रमाणें पर्जन्य कमी किंवा जास्ती पडतो. असें अनुभवास आलें आहे. परंतु सूर्यावरील हे डाग ज्या वर्षीं कमी होतात त्याच वर्षीं पर्जन्य कमी होत नाहीं. डाग कमी झाल्यावर प्रत्येक वेळीं सुमारें ४ वर्षांनीं पर्जन्य कमी पडतो. सन १८३० सालीं सूर्यावरील ठिपक्यांची संख्या जास्त झाल्यावर ४ वर्षांनीं म्हणजे १८३४ सालीं पर्जन्य जास्त पडला नंतर सन १८३३।३४ सालीं सूर्यावरील ठिपक्यांची संख्या अगदीं कमी झाली होती व नंतर ४ वर्षांनीं म्हणजे सन १८३८ सालीं पर्जन्य फार कमी पडला. नंतर सन १८३७, सन १८४८, १८६० व १८७० या सालीं सूर्यावरील ठिपक्यांची संख्या फार वाढली व या वर्षानंतर प्रत्येक चार चार वर्षांनीं पर्जन्य जास्त पडला आहे तसेंच सन १८४३, १८५६ व सन १८६७ सालीं सूर्यावरील ठिपक्यांची संख्या अगदीं कमी झाली होती, व या वर्षांत चार चार वर्षांनीं म्हणजे १८४७, १८६० व सन १८७१ सालीं पर्जन्य फार कमी पडल्याचा अनुभव आहे.

हिंदुस्थानांत दोन प्रकारचे दुष्काळ बहुधा सारखे पडत आले आहेत. सूर्यावरील ठिपक्यांची संख्या कमी झाल्यावर ४ वर्षांनीं १ व सूर्यावरील ठिपक्यांची संख्या कमी झाल्यावर १० वर्षांनीं एक.

सन १८२६ सालापासून ज्याप्रमाणें सूर्यावरील डाग कमी किंवा जास्त होत गेले आहेत त्याप्रमाणें डाग कमी किंवा जास्त झाल्यावर प्रत्येक चार वर्षांनीं पर्जन्य कमी किंवा जास्त पडत गेला आहे.

कलकत्ता व पश्चिम किनाऱ्याकडे सूर्यावरील डागाचे कमी जास्ती होण्यापासून पर्जन्यांत कित्येक कारणांनीं कमजास्तपणा होत नाहीं.

सन १८७० सालापासून सूर्यावरील डाग कमी होत चालले आहेत, व सन १८७५ सालांत फक्त १९ डाग होते. यानंतर १८७६ सालांतील डाग अद्यापि कळले नाहींत; परंतु क्रमाप्रमाणें ते अगदीं कमी असले पाहिजेत. व यामुळें १८८० सालांत पर्जन्य कमी पडावा.

सन १८६५।६६ सालाप्रमाणें १८७६ व १८७७ चा दुष्काळ सूर्यावरील डाग कमी झाल्यावर १० वर्षांनीं पडणारा दुष्काळ होता. व सन १८७६ त सूर्यावरील डागांची संख्या कमी झाली आहे तेव्हां ७६ सालानंतर ४ वर्षांनीं म्हणजे ८० सालीं पर्जन्य कमी पडावा.

वर लिहिलेले हकीकतीवरून दोन गोष्टी उघड होतात. पहिली, बाजवीपेक्षां फाजील पर्जन्य पडतो त्यानंतर पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षांत पर्जन्य कमी पडतो व दुसरी सूर्यावरील डाग कमी झाल्यावर चार वर्षांनीं एक व सूर्यावरील डाग कमी झाल्यावर १० वर्षांनीं एक असे दुष्काळ पडावयाचे व यावरून सन १८८० सालांत दुष्काळ पडेल हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें.

ने. ओ.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला रविवार ता० १० माहे आगष्ट सन १८७९ इसवी अंक ३१

वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

	रु.
वर्षाचे अगाऊ	५
साल अखेर	७
किरकोळ अंकास	०१

डाक हाशील.

वर्षाचे अगाऊ	१८८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिसीबद्दल.

मराठी, १० ओळीचे आंत	१
१० ओळीपुढें दर ओळीस	०१८६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०३
,, दुसरे खेपेस	०२

जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

कामडी आफ एरर्स.

अथवा

भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्सपियरच्या इंग्लिश नाटकांस भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेले आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेतून मागविल्यास हशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

कृषिकर्मविद्या अथवा शेतीचें वर्णन.

हा सुमार साडेपांचशें पृष्ठांचा मराठी ग्रंथ ग्रंथोत्तेजक मंडळीकिडून नुकताच छापून तयार झालेला प्रसिद्धीस आलेला आहे. हा विषय मोठ्या महत्वाचा असून ग्रंथांतील माहिती फार शोधकपणानें लिहिलेली आहे. याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. किंमत ३॥ रुपये व डाकहशील ८४ आणे पडेल.

नारूविषयीं ... उपचारी.

येथें एक घरही

हा भ... कोणावर ते... प्रसिद्ध आहे त्या विषयीं चांगलें नाहीं. कोठे व... त्यावर वक्तशीर उपाय योजणे मनुष्यें बहुतेक आहे. ह्मणून मिरज संस्थानचे दोन आफिसर रा. रा. त्रिंबक सखाराम सिरवलकर एल. एम. यांनीं या विषयावर एक लहान सें उत्तम पुस्तक तयार केलेलें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत ... आणे. बाहेर गावीं नेणारास एक आणा अधिक पडेल.

कुटुंब मंत्री.

शरीरास अपाय घडले असतां तत्काल योजण्याचे उपाय यासंबंधी हें उपयुक्त पुस्तक मिसेस रेबिका सिमियन नावाची इस्त्रायल स्त्री जी मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण आहे तिनें नवीन तयार केलें त्याची दुसरी आवृत्ति छापून तयार झालेली आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकीस तयार आहे. किंमत सहा आणे. बाहेर गावीं मागणारास एक आणा अधिक पडेल.

जाहिरात. सुबोधसार भाग पहिला.

राजनीति, व्यवहार वगैरेवर ग्रंथांतून अनेक विद्वानांच्या सहायानें नीतिपर, बोधक, मनोरंजक, आणि दृष्टांतिक असे सुभाषित श्लोक आह्मी निवडून त्यांचा सुबोधसार नावाचा ग्रंथ तयार केला आहे. यांत प्रथम श्लोक, त्याचे खालीं प्राकृत अर्थ, व त्याचे खालीं एकंदर श्लोकाचें व अर्थाचें खुलासेवार तात्पर्य लिहिलेलें आहे. हा ग्रंथ टाइपानें छापून लवकरच प्रसिद्ध होईल. याची किंमत अगाऊ आठ आणे व बुक बंगी व पोष्टाबद्दल एक आणा एकूण नऊ आणे ठेविली आहे. परंतु जितके वर्गणीदार दिळतील तितक्याच प्रति काढण्याचा इरादा आहे. जे लोक आह्मांस ओळखतात त्यांस पूर्वी आह्मी दुसरे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत ह्याची खात्री असल्यानें अगाऊ वर्गणी देण्यास मागें पुढें पहाणार नाहींत; परंतु अपरिचित लोकांनींही अगाऊ वर्गणी देण्यास शंका घेऊ नये. कारण कांहीं ग्रंथकर्ते अगाऊ वसूल करून स्वस्थ बसतात परंतु तसा प्रकार एथें मुळींच नाहीं, असें आह्मी खात्रीपूर्वक कळवितों. वर्गणीदारांनीं आपलीं नावें व अगाऊ वर्गणी खालीं सही करणाराकडेस अथवा रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचार कर्ते यांजकडेस द्यावी. कळावें ता. ९ माहे जुलै सन १८७९ इ.

रंगनाथ सखाराम किकवीकर
स्टेशनमास्तर वरणगाव
जिल्हा खानदेश

गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत मिसळून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ८६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिलक नव्हत्या व तेणेंकरून यारोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत. तारीख १० माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

नोटिस.

जानजी वल्लद फुलाजी संपुरे तेली रहाणार कसबे नांदुरा तालुके मलकापुर यास कृष्णा वल्लद गणू तेली रहाणार नांदुरा या जकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची भावजई मरण पावली या कारणांनीं मी आपली बायको जनसांप्रदायाप्रमाणें तुमचे घरीं पाठविली असतां तुह्मी तिजला परत माझे घरीं न पाठवितां २ महिने आपले घरींच ठेवून घेतलें. नंतर एके वेळीं मी खुद्द जातीनें व एक वेळा माझा बाप व एक वेळा माझी मातुश्री असे बोलाविण्याकरितां आलों असतां तुह्मी पाठविलें नाहीं. व याचप्रमाणें तुह्मी मागूनही करीत आले. हल्लीं तारिख २८ माहे जुलै सन १८७९ इसवी रोज सोमवारीं मी खुद्द माझे बायकोचा हात धरून घरीं आणित असतां तुह्मी बाजारांतून चालून येऊन मजला मारठोक करून पुन्हां तिजला घेऊन गेला. आणि बाजारांत जाऊन माझे बापास ही मारलें. व तुह्मीच फिर्याद करण्याकरितां मलकापुरास गेला. ह्या गोष्टीस तुह्मास तेली मंडळीचे पंच अनुकूळ झालेले आहेत. फिर्यादीविषयीं मजला फिकर नाहीं. परंतु असें ऐकण्यांत आलें आहे कीं येते पोळ्याचे दिवशीं तुह्मी माझे-परवानगीवाचून तिचा पाट लावून देण्याचा विचार केला आहे. तर तुह्मास ह्या नोटिशीनें कळवितों कीं, मी तिजला वागविण्यास कबूल असून तुह्मी तिजला पाठवित नाहीं. आणि आपला फायदा करून घेण्यासाठीं पाट लावून देता. व पंचही तुह्मास साह्य करितात हें बरोबर नाहीं. ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तिजला माझे घरीं पोहोचवावें. असें न केल्यास सरकारांत फिर्याद करून माझी बायको मला ताब्यांत घ्यावी लागेल. ही नोटिस पंचासही लागू असे. त्यांणीही माझी बायको माझे घरीं येऊं देण्याविषयीं समज द्यावी. कळावें. तारीख ४ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

(सही) कृष्णा वल्लद गणू तेली उमाळे
रहाणार नांदुरे याचे हातची
निशाणी असे.

पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

पर्जन्य वेडा झाला!

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० खालीं लिहिलेल्या माझ्या कल्पना आपणास बऱ्या वाटल्यास प्रसिद्ध कराव्या.

अलीकडे पर्जन्याची जी चलबिचल झाली आहे तीवरून मला वाटतें कीं, पर्जन्य वेडा झाला. पुष्कळ लोक ह्मणतात कीं, हिंदुस्थानांत इंग्लिश राज्य होण्यापूर्वी पर्जन्य चांगला पडत असे त्यावरून माझे मनांत कल्पना आली कीं त्या गोष्टीला ६० वर्षे झालीं. मनुष्यांची ' साठीं बुद्धी नाठी ' होते ह्मणजे त्यास भ्रम होऊं लागतो तशी पर्जन्याची स्थिति झाली. एकादे प्रांतांत दोन दोन तीन तीन वर्षे पर्जन्य ढुंकून पहात नाहीं. वऱ्हाडासारख्या प्रांतांत जेथें झडीचा पाऊस कधींच पडत नाहीं व तसा पडण्याची गरजही नाहीं. तेथें च्यार च्यार दिवस सारखी झड लागत आहे आणि कोकणांत महिन्याच्या महिने सारखी झड लागत असते व तिची जरूर असते पण तेथें तीन आठवेड हल्लीं पर्जन्याचा थेंब नाहीं असें दिसून येऊं लागलें आहे, तेव्हां पर्जन्यास वेडा ह्मणूं नये तर काय ह्मणावें ? ज्या प्रांताला झाडी विशेष असते त्या प्रांतांत पुष्कळ पर्जन्य पडतो असें शास्त्र आहे ह्मणतात, तर कोकणांतील झाडी आहे तशीच पुष्कळ आहे तींत कांहीं कमी झालें नाहीं मग तिकडे पर्जन्य कमी कां पडावा ? यावरून पर्जन्य वेडा झाला आहे असें मी ह्मणतो. दुसरे, "यज्ञाद्भवति पर्जन्य" असें प्राचीन शास्त्र आहे त्या मानानें ही पाहिलें तरी आतां बोकडांचा वध पहिल्यापेक्षां शेकडो पट अधिक होत आहे. होम धूम्र पर्जन्यास कारण असला तर चिलमी, हुक्के, नेचे तसेच चिरूट यांचे योगानें तंबाकु, ज्ञान वल्ली यांचा धूर तसाच आगगाडीच्या बंबाचा व फ्याकूटरीच्या चिमण्यांचा धूर होमधूम्राच्या शेकडोपट अधिक हल्लीं बर जात आहे, तेव्हां पर्जन्य कां न पडावा, यज्ञांतील सोमरसोंच पानही हल्लीं कांहीं कमी नाहीं. बहुत पटीनें वाढलें आहे, असें असतां पर्जन्य पडत नाहीं तेव्हां तो वेडा झाला. तिसरे, कित्येक लोक ह्मणतात कीं हल्लीं पृथ्वीवर पाप फार झालें, ब्रह्मकर्म घडत नाहीं ह्मणून पर्जन्य पडत नाहीं पण तें मत खोटें असें मी ह्मणतों. वेदांची खुलावट हल्लीं किती झाली आहे! तशीच शास्त्रें, पुराणें, स्मृति यांची संस्कृतांतील मोठ मोठालीं भांडारें आतां प्राकृतांत विशद होऊन तीं नुसत्या ब्राह्मणांत नव्हेत तर सोनार, शिंपी, तेली, तांबोळी, खिती व महार लोकांत देखील त्यांची अतिव्याप्ती झाली आहे, तेव्हां ब्रह्मकर्म जागरूक असून वेद शास्त्ररूप पुण्याचा साठा हल्लीं देशांत पुष्कळ झाला असतां ही पर्जन्य पडत नाहीं तेव्हां तो वेडा झाला खचित यांत संशय नाहीं.

आतां याला उपाय काय? असें आपण ह्मणाल तर मला वाटतें, देवाच्या दरबारांतून कामदारी पत करून आलेला हा कामदार आपलें काम बरोबर बजावीत नाहीं तेव्हां त्या वर देवाच्या दरबारींच आपण सर्वांनीं फिर्याद करून योग्य रीतीनें आपलें काम करील असा चांगला पर्जन्य मागावा. असला वेडा झालेला पर्जन्य आतां आपणास कांहीं उपयोगी नाहीं. आणखी इंग्रजींत जरी आपण

त्याची सुरू तारीख धरली तरी ५५ वर्षांहून अधिक काम केलेला कामदार आतां आपणास उपयोगीच नाहीं. बळेनें त्याला पेनशन दिलें पाहिजे. व चांगला व्यवस्थित पर्जन्य त्याच्या जाग्यावर मागितला पाहिजे, असें मला वाटतें. कळावें हे विनंती.

एक
आपलें पत्र वाचणारा.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. रा. रा. माधवराव केशव वैद्य यानीं प्रयाग येथें स्वधर्मविद्यावर्धनीय नामक सभेंत वाचलेला निबंध आपल्यापुढें सादर करितां. आशा आहे कीं आपल्या सुंदर जगमान्य पत्रींस्थैल द्याल.

बाल विवाहत्यागा अथवा विधवा
विवाह अंगकृत करा.

सभ्य जनहो, ह्या सदराकडे लक्षद्या. पूर्वी ह्मणजे विक्रमादित्याच्या कारकीर्दीपर्यंत बालविवाह होत नव्हते मग पुर्नविवाह होण्याची गरज काय? जसे श्रुति स्मृतीच्या वचनानुसार ह्मणजे वधूचें लग्न झाल्यानंतर निदान पक्ष तीन दिवस ब्रह्मचर्य व्रत करून योग आपल्या संसारसुखोपभोगास प्रारंभ करावा," तर अशा अवस्थेंत तीस येण्यास १४—१५ वर्षांची अवस्था सहजावृत्ती पाहिजे. आणि अशा वयांत लग्न झालें ह्मणजे पतीशीं व तिशी संग होऊन एक दोन आपत्यें झाल्यानंतर तिचा पति मृत झाला तरी तिची कोणत्याही प्रकारें हौस पूर्ण होण्यास विशेष रहात नाहीं, मग पुनर्विवाह करण्याची कोणती अवश्यकता होती! अस्तु.

प्रस्तुत तर "अष्ट वर्षात् भवेत् गौरी, नव वर्षाच रोहिणी, दश वर्षा भवेत् कन्या, ततोर्ध्वंच रजस्वला." ह्या श्लोकाकडे लक्ष्य देऊन विवाह करण्याची दृढ रूढी पडली आहे, कां तर महत् पुण्य लागतें ह्मणून. एकाद्या तरूणाला अथवा द्रव्यलोभानें वृद्धाच्या गळीं ती ८।९ वर्षांची पोर फाशीप्रमाणें जोडून देतात मग तिचा व त्याचा योग होण्यास निदानपक्ष ४।५ तरी वर्षें पाहिजेत व अकस्मात दैवयोगानें तो त्या काळाआंत यमाजीपंताच्या स्वाधीन झाला ह्मणजे सर्व सोहळे आटोपले. मग तिचे माता पिता, भ्रातृगण, हा अष्टाक्षरी मंत्र जपण्यास प्रारंभ करतात. "कसें करूं काय करूं." व मग जशी रती वयस्क होते तशी ती मनांतल्या मनांत झुरते; कारण वयानुसार मदनरावही आपल्या बाणांची वृष्टी करण्यास उद्युक्त होतात. आणि जेव्हां कां ती मदांध होते आणि तो संकटप्रसंग तिजवर गुजरूं लागतो, त्या वेळेस मात्र (जे सर्व गोत्रज लग्नाच्या वेळेस मानपानास्तव रुसून बसतात व ज्योतिषीपंत 'घटित फार नामीं मिळालें' ह्मणून हमी भरतात व उपाध्येबुवा धूम दक्षणा उपटण्यास व सुमुहूर्त ह्मणण्यास बावरलेले असतात, ते कोणी कामास पडत नाहींत) तिचें तिलाच विचारलें पाहिजें. मग जेव्हां कां तिच्या पापाचें व शापाचें गाठोडें वाढत जातें तेव्हां ती ह्मणते जळोत त्या आई बापांचीं आणि बालविवाह करणारांचीं मतें, ज्यांनीं बालत्वांत आमचीं लग्नें केलीं व ज्यांपासून आह्मास पतीचें सुख मुळींच माहित नाहीं. बरें, एकादीचा पति अगदींच बालअवस्थेंत मृत झाला तर तिचे माता पिता व श्वशूर इत्यादि विलाप करूं लागतात, व ती विचारते, 'आई कां ग रडतेस? 'वगैरे-व वयस्क झाली ह्मणजे एकादीच विचारी साध्वी निघते. नाहीं तर मदांधत्वाच्या फेऱ्यांत येऊन निघून गेली ह्मणजे सगळे तिला नावें ठेवितात. "काय हो, फलाणीनें कुळाला बट्टा लाविला, आणि निघून गेली! बरें, चोरून व्यभिचार केला व गर्भ राहिला ह्मणजे आंतल्या आंत गर्भ पाडण्यास सुरुवात करावयाची. मग गर्भ पाडण्याचें पातक, संतान झाल्यास तें मारून टाकतात तें पातक, व लज्जेस्तव तिनें जीव दिल्यास तें पातक कोणाच्या माथां! तर सर्व पातकें बालविवाह बंद न करणारे यांच्याच माथां आहेत असें मला वाटतें.

खरोखर ह्या अबलांच्या पातकानें व शापानेंच आमचीं राज्यें, ऐश्वर्य, संपत्ती यांचा नाश होऊन आह्मी असे दीनापरि दीन हो ऊन फिरण्यास लागलों आहो. तर सभ्य जनहो, आपणास सविनय प्रार्थना आहे कीं, बालविवाह ही अधम रूढी त्यागून शास्त्रानुमतें वयस्क अवस्थेंत विवाह करण्याचें प्रचलित करा ह्मणजे दुःखरूप समुद्रांत बुडणाऱ्या अबलांवर व सर्व देशावर आपले महत् उपकार होतील.

प्रयाग स्व धर्मविद्यावर्धनीय सभा दारागंज. } सभेस नाणारा मधु.

जाहिरात.

नवीन सालिसिटर.

सर्व लोकांस जाहीर केलें जातें कीं, मि० वैमनजी फिरोजशा मुंबई हाय कोर्टांतील सालिसिटर व अटर्नी हे अकोलें एथें सुमार दोन महिने झाले, आले आहेत. हे आल्यापासून बरींच कामें यांकडे येत आहेत. ज्यांजला फिर्यादी, अपिलें, व स्पेशियल अपिलें यांकडे देणें असतील किंवा हरएक कामासंबंधीं सला मसलत घेणें असेल त्यांणीं त्यांशीं स्वतः अगर कारकूनमार्फत भेटावें, ह्मणजे त्यांचीं कामें घेतलीं जातील. प्रथमचे वेळ प्याची अगर कागद पहण्याची त्यांजपासून फी घेतली जाणार नाहीं. कामासंबंधी पैशाचा ठराव समक्ष केला जाईल. हे गृहस्थ अकोलें एथें तूर्त मि० कावशा हेड क्लार्क आफ करन्सी आफिस सदर स्टेशन अकोलें यांचे विऱ्हाडीं डिपुटी कामिशनर कचेरीनजीक रहात आहेत. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य ८ शके १८०१

म्युनिसिपल कमिट्या व सरकारचे हेतु.

वऱ्हाड प्रांतांतील सर्व म्युनिसिपल कमिट्यांचा सन १८७७।७८ इसवी सालचा वार्षिक रिपोर्ट कमिशनर साहेबाचे अभिप्रायासह रेसिडेंट साहेबाकडे गेला व त्यांनीं आपल्या अभिप्रायासहित तो छापून प्रसिद्ध केला आणि हिंदुस्थान सरकारचे अवलोकनार्थ पाठविला तो पाहून हिंदुस्थान सरकारानें थोडक्यांत त्या संबंधी आपले विचार रेसिडेंट साहेबांस कळविलेले प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून आह्मी एक दोन गोष्टी आपले वाचकांस कळवितों.

हिंदुस्थान सरकारानें टिपण केलें आहे कीं, वऱ्हाडांत उमरावती, अकोला, खामगांव, इलिचपुर, आणि वाशीम या ५ ठिकाणीं म्युनिसिपल कमिट्या आहेत आणि त्यांकडून ७ प्रकारचे कर आहेत. त्यांचीं नावें:— १ टौनफंड (शहरपट्टी), २ हौसट्याक्स (घरपट्टी), ३ कार्ट ट्याक्स (गाडीपट्टी) ४ ब्रोकर लायसेन्स (दलाल पट्टी), ५ बजारसेस (बाजार पट्टी), ६ मेहतर ट्याक्स (भंगी पट्टी), व ७ काटनसेस (कपास पट्टी). हे सातही प्रकारचे कर सर्व कमिट्यांकडून आहेत असें नाहीं. टौनफंड आणि बाजारसेस हे सर्वत्र आहेत. हौसट्याक्स खामगावास आहे, कार्टट्याक्स उमरावतीस व इलिचपुरास आहे. दलाल लायसेन्स उमरावतीस आहे. मेहतर ट्याक्स अकोला, खामगाव आणि उमरावती एथें आहे. व काटनसेस खामगावास आणि उमरावतीस आहे. असे हे वेगवेगळे ठिकाणीं वेगवेगळे प्रकारचे किरकोळ कर असणें चांगलें नाहीं असें हिंदुस्थान सरकारचें मत आहे. कांहीं कर अगदी क्षुल्लक आहेत. कांहीं कर वसूल करण्यास खर्चाचे असून मक्ते दिल्यानें लोकांपासून अधिक पैसा घेतला जातो, पायखान्यावरील कर त्रासदायक आहे सबब या सर्वांविषयीं चांगला विचार करून सार्वजनिक, सोयीचे आणि स्थाईक असे सर्व ठिकाणीं सारखे व थोडे कर बसवावे असें हिंदुस्थान सरकार ह्मणतात त्यांची ही सूचना फार पसंत आहे. व कमिशनर साहेब त्याबद्दल विचार करीत आहेत तेव्हां लवकरच ठराव होतील. कार्टट्याक्स एथें नव्हता तो बसविण्याची तजवीज चालू आहे. व बजारसेस एथें आहे त्याकरितां नवीन नियम आले आहेत व त्या अन्वयें हल्लीं व्यवस्था सुरू झाली आहे. याचप्रमाणें सर्व वऱ्हाडांतही अशी तजवीज त्यानीं केलीच असेल. आतां बाकी करा विषयीं ते कसे काय ठराव करितात पहावें. पायखान्यावरील कर लोकांस नावडता आहे सबब तो व स्वच्छता राखण्याकरितां दुसरे तसले कर लोकांवर बसविणें चांगलें नाहीं. दुसऱ्या करांच्या उत्पन्नांतून तीं कामें करावीं असा हिंदुस्थान सरकारचा अभिप्राय आहे. सार्वजनिक पायखाने कोठें केलेले नसून ज्या लोकांचे घरीं पायखाने नाहींत त्यांस उमरावतीस त्याबद्दल कर द्यावा लागतो व त्या शहरांत तर पायखान्या संबंधी अति अव्यवस्था आहे याजबद्दल हिंदुस्थान सरकारानें आपली नाखुशी प्रदर्शित केली आहे. ज्या उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीला ३१००० रुपये उत्पन्न आहे तेथें अशी स्थिति असावी काय! असें हिंदुस्थान सरकार ह्मणतात. तर सर्वांचा आतां चांगला बंदोबस्त होईल असें आह्मी इच्छितों.

पिण्याचे पाण्याची शहरांतून उत्तम सोय करावी, गावांतील घाण चांगली गटारें करून बाहेर काढावी, व स्वच्छता ठेवावी या कामीं या कमिट्यांनीं फार कमी लक्ष पुरविलें आहे व ह्मणण्यासारखा कांहीं खर्च केला नाहीं हें पाहून हिंदुस्थान सरकारास आश्चर्य वाटलें. व आमच्या वाचकांसही तसें वाटल्यावाचून रहाणार नाहीं. साऱ्या वऱ्हाडांत पाण्याचे कामा करितां ८० रुपये खर्च! केवढी जाडी रकम हो! तसाच गटारा करितां ८६१ रुपये खर्च झाला आहे. हे खर्च त्या कामाच्या महत्वाच्या मानानें कांहींच नाहींत. तशीच जेथें लोकवस्ती जितकी आहे त्या मानानें त्यांच्या सफाईला खर्च लागला नाहीं असें खालीलें टिपणावरून कळेल. तें टिपण असें:—

	लोकसंख्या	सफाई खर्च रु.
उमरावती	२१७२१	७७८५
अकोला	१४१५७	३४१३
खामगाव	९२६४	२०६२
इलिचपुर	२०७८२	२९६६
वाशीम	८५३१	९९०

या अकड्यांत उमरावतीची इलिचपुराशी आणि वाशीमची खामगावाशी तुलना करून पहावी ह्मणजे किती विलक्षण अंतर आहे तें दिसेल!

आतां आह्मी हिंदुस्थान सरकारचे अभिप्रायांतील एक शेवटची गोष्ट लिहितो व ती फार महत्वाची आहे याजकरितां सर्वांनीं इकडे लक्ष पुरवावें अशी त्यांस शिफारस करितों. म्युनिसिप्यालिटीच्या ज्या कमिट्या भरतात त्यांत कित्येक डिपुटी कमिशनर हमेशा हजर रहात नव्हते याबद्दल कमिशनर साहेबांनीं त्यांनां दोष दिला आहे व तो हिंदुस्थान सरकारासही मानवला आहे. तथापि कमिशनर साहेबांनीं आपल्या अभिप्रायांत अशा आशयाची एक गोष्ट लिहिली आहे कीं, कमिट्यांनां सेक्रेटरी नेमण्याचें कारण नाहीं. असिस्टंट कमिशनर हेच सेक्रेटरी समजावें. व विशेषें डिपुटी कमिशनर आणि असिस्टंट कमिशनर यांणींच कमिटीचीं कामें करित जावीं; पण हिंदुस्थान सरकारच्या मतावरून कमिशनर साहेबांचें हें मत बरोबर आहे असें दिसत नाहीं, एवढेंच नव्हे, तर हिंदुस्थान सरकारानें रेसिडेंट साहेब व वऱ्हाडचे कमिशनर साहेब यांस या बाबदींत आपलें मत स्पष्ट कळविलें आहे. व त्याप्रमाणें या उभय सरदारांकडून तजवीज घडेल असा भरंवसा वाळगला आहे. तें त्यांचे मत असें आहे कीं, या गोष्टीच्या संबंधानें कमिशनर साहेबांनीं जे उपाय सुचविले आहेत त्यांवर तितका नेट न ठेवितां ते योजिले तर म्युनिसिप्यालिट्यांच्या व्यवस्थेंत सुधारणा होण्याचा संभव आहे. तसेंच म्युनिसिप्यालिटीसंबंधीं कामें ज्यांतील कित्येक जे मेंबर सरकारी कमिशा झाल्या. अशांच्या हातून व्हावीं [illegible] उत्तेजन देणें मोठें अगत्याचें [illegible] ट्यांचें काम काज चांगलें [illegible] टी भरेल तेव्हां [illegible] शाळेचे नेमणुकीचें योगानें त्या ठिकाणच्या [illegible] आहे. [illegible] चा त्यांचा कारभार स्वकीय [illegible] काराप्रमाणें करतां येण्याची विद्या शिकविण्याचा मुख्यतें हेतु आहे. व तसें झाल्यापासून सरकारचा फार फायदा आहे सबब तो हेतु म्युनिसिप्यालिट्यांतील कामें सरकारी अधिकारीच जर आपले हातांत ठेविं असले व करित असले तर साधण्याचा संभव फार कमी आहे. सबब या गोष्टीकडे

रोसिडेन्ट साहेबांनीं व कमिशनर साहेबांनीं लक्ष पुरतावें.

हिंदुस्थान सरकारची ही सूचना अति उत्तम आहे व तींत लिहिल्याप्रमाणें सर्व म्युनिसिप्यालिट्यांत व्यवस्था राहील तर आमचे लोकांची फार मोठी सुधारणा होईल यांत संशय नाहीं. इंग्लिश सरकारचें अंतःकरण फार उदार आहे. त्यांच्यामध्यें मत्सरभाव नाहीं. ते परराष्ट्रांतून आह्मावर राज्य करण्यास आले आहेत तरी समभावानें असें इच्छितात कीं, हिंदु लोक विद्वान् व्हावे, व हिंदू लोकांनां राज्यकारभारांचें वळण लागावें व अशाच हेतूनें त्यांनीं म्युनिसिपल कमिट्या, असेसर, जुरर, देवस्थानपंच, लवादकोर्ट इत्यादि राज्य कारभाराचीं कामें रयतेला करूं देण्याची मोकळीक ठेविली आहे. ठिकोळें चांगलें लावतां आलें तर त्यास मोठी पत्रावळ पुढें लावतां येईल, व घराच्या परड्यांत फुलझाडें, भाजी पाला चांगला लाविंतां आला तर मोठा बाग व मळा करतां येईल. तद्वत म्युनिसिप्यालिटीचा, लवादकोर्टाचा वगैरे कारभार करतां आले तर त्यांनां पुढें राज्याचा कारभार करतां येर्दल असें सरकारास वाटतें. व त्या त्यांच्या तशा सद्बुद्धिबद्दल आह्मी त्यांचे उपकार मानिले पाहिजेत हें योग्य आहे. तेव्हां हल्लींचे रीतीप्रमाणें जे असिस्टंट कमिशनर दोन लाखाच्या तालुक्याचा राज्यकारभार करितात त्यांस म्युनिसिप्यालिटीचे सेक्रेटरीचें काम करणें अधिक आहे किंवा जे डिपुटी कमिशनर २५ लक्षांच्या जिल्ह्याचा सर्व प्रकारचा कारभार करितात त्यांस म्युनिसिप्यालिटीचे प्रमुखत्वाचें काम अधिक आहे असें नाहीं; पण हीं कामें त्यांनीं स्वतांच न करितां रयतेकडून करवावीं व तीं करण्याचें त्यांनां शिकवावें असें हिंदुस्थान सरकार ह्मण तें व तें त्यांचें ह्मणणें यथायोग्य आहे व त्या प्रमाणें सर्वत्र घडावें असें आह्मी इच्छितों.

नारूचा आजार.

वस्तीचे मानानें जर शहराची सुधारणा होत गेली नाहीं तर नाना प्रकारचे व्याधि उत्पन्न होतात. ही गोष्ट आमचे अकोल्यामध्यें स्पष्टपणें दिसून येते. ज्या मानानें ह्या शहराची वस्ती वाढत आहे त्या मानानें लोकांस पाण्याचा वगैरे जसा पुरवठा असावा तसा एथें झाला नाहीं. यामुळें गलिच्छतेपासून जे रोग उत्पन्न व्हावयाचेच ते हल्लीं एथें दिसून येत आहेत.

अकोल्यामध्यें नारूचें पीक अतोनात माजलें आहे. जिकडे जिकडे जावें तिकडे नारूविषयीं गाऱ्हाणीं ऐकूं येतात. किंबहुना एथें एक घरही असें आढळणार नाहीं कीं, तेथें कोणावर तरी नारायणाची कृपादृष्टी झाली नाहीं. कोठे एक, कोठे दोन, कोठे तीन अशीं मनुष्यें बहुत घरीं आजारी आहेतच कितिएकांस तर दोन दोन, तीन तीन नारू झालेले दृष्टीस पडतात. ह्या रोगावर पुष्कळ लोकांस औषधी माहीत आहेत परंतु त्यांमध्यें रामबाण असें एकही औषध आह्मास दिसत नाहीं.

मनुष्यास नारू कसे होतात व ते कोणत्या उपायानें बाहेर काढता येतात. याविषयीं आह्मांस जी माहिती आहे तिचें आह्मी आमच्या वाचकांकरितां आज थोडक्यांत विवेचन करितों.

आपल्या देशामध्यें पुष्कळ ठिकाणीं हेमशा नारू उत्पन्न होतात. ह्या किड्याची लांबी केव्हा केव्हां तीन फुटांहून अधिक असते. हा तंतूवाकृति असतो. हा तंतू अगदी पातळ असून त्याचे शरीराचा घेर दीर्घ वर्तुलाकृति असतो. मध्यभागीं हा तंतू बराच जाडा असून दोहों शेवटांस अगदी केसा सारखा बारीक झालेला असतो, ह्याचा रंग दुधा सारखा पांढरा असतो, हा मनुष्याचे शरीरामध्यें लांबचे लांब पसरतो. सूक्ष्म दर्शक यंत्रांतून ह्याचें शरीर पाहिलें असतां यावर चित्रविंचित्र रंगाचे पट्टे दिसतात आणि ह्याच्या पोटामध्यें शेंकडो लहान लहान किड्यांची वेटोळी दिसतात. नारूची सांत बहुधा पावसाळ्यामध्यें किंवा पावसाळा संपतांच येते. ज्या विहिरीमध्यें किंवा तलावामध्यें पाणी फारच कर्दम असतें तेथें ह्या किड्यांची उत्पत्ती असते आणि अशा ठिकाणचें पाणी ज्या वेळीं लोक प्राशन करितात, त्यावेळीं तो तंतू पाण्याच्या घोटाबरोबर मनुष्याचे पोटांत जातो, हा तंतू मनुष्याच्या शरीरामध्यें दुसरे एक रीतीनें जात असतो ती रीत फारच चमत्कारिक आहे. ती अशी कीं हा किडा रोमरंध्रांतून आपल्या शरीरामध्यें प्रवेश करितो. आपल्या शरीरा वरील एक चौरस इंच जागेमध्यें सुमारे ३५०० रंध्रें आहेत. हा तंतू बाल्यावस्थेंत इतका सूक्ष्म असतो कीं त्यास या रंध्रांतून शरीरामध्यें प्रवेश करितां येतो. अस्तु. ह्या दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका प्रकारें तो शरीरांत शिरला ह्मणजे तेथें हळूहळू वाढत जाऊन कित्येक फूटपर्यंत लांब बनतो आणि त्याची वाढ पूर्ण होईपर्यंत आपल्या शरीराचे कोणते भागामध्यें नारू आहे असें आपणास मांसतसुद्धा नाहीं. बहुतकरून नारू मनुष्यांचे पायास होतात, परंतु दुसऱ्या भागास होत नाहींत असें नाहीं, कोणत्याही भागामध्यें हा होऊं शकतो. कित्येक वेळां तर आह्मी मनुष्याचे कान, नाक, जीभ इत्यादिकांसंही नारू झालेले पाहिले आहेत. तात्पर्य असें कीं तंतू एकदा शरीरांत शिरला ह्मणजे पाहिजे त्या भागांत संचार करूं शकतो आणि ह्याची वाढ पूर्ण झाली ह्मणजे हा आपल्या त्वचेवरून आंतले अंगास भासूं लागतो आणि जिकडे याचे तोंड असेल तिकडे एक भाजल्या सारखा फोड येतो. हा फोड सामान्यें करून खबुतराचे अर्ध्या अंड्या एवढा वाढतो आणि ज्या ठिकाणीं हा फोड उद्भवतो त्या ठिकाणीं हमेशा अतोनात कंडू सुटतो, किंवा तेवढ्या भागास कवस कुइल्या लागल्याप्रमाणें भासतें, ज्यावेळीं हा फोड फुटतो त्यावेळीं आंतून पांढरा विलविलित पदार्थ निघतो आणि त्या पदार्थांतून केसा एवढें ह्या किड्याचें तोंड बाहेर पडतें.

हा किडा औषधोपचारानें आंतल्या आंत जाळून टाकितात किंवा ह्यास ओढून बाहेर काढितात. आपल्या हातांस तो बाहेरून चांगला लागूं लागला ह्मणजे आपण आपली खात्री करून घ्यावी कीं, हा अगदीं बरच्या अंगास आहे आणि तशी खात्री झाली ह्मणजे एकादे कुशल व अनुभविक मनुष्याकडून त्यास मध्यें कापून ओढून काढावा. जर हा किडा फारच आंतील अंगास असेल तर एक चिंधूक घेऊन त्याचें तोंड त्या चिंधीस हळूच बांधावें. आणि मोठ्या सावधगिरीनें व हलक्या हातानें हळूच त्यास नियमशः बाहेर ओढित जावें आणि जसजसा तो बाहेर येत जाईल तसतसा त्या चिंधीस गुंडाळावा. ही कृति करतेसमयीं तो तंतू न तुटे अशी फारच खबरदारी ठेविली पाहिजे. शिवाय चिंधीस गुंडाळलेला तंतु वाळूं देतां कामां नये. कारण तसें झाल्यानें धक्का न लागतांही तो तुटण्याचासंभव आहे. एरंडेलाचा हात घेऊन बाहेरून चोळून त्यास प्रथमतः त्वचेपासून मोकळा करावा. ह्मणजे तो लवकर बाहेर येत जाईल. अशी क्रिया अहोरात्रींतून एकवार मात्र करावी. आणि मग असें केल्यानें हा तंतु एकादे वेळीं फुटीचे फुटीही बाहेर येत जाईल. परंतु हें ओढण्याचें काम फार नाजुक हातानें केलें पाहिजे. आणि त्यास फार बेतावातानें बाहेर ओढिला पाहिजे. अशा प्रकारची क्रिया करणें झाल्यास ती अनुभविशीर मनुष्याचे हातून करवावी हें फार बरें, यांत संशय नाहीं.

किंवा दुसरा उपाय असा आहे कीं, पाण्याचा ओहोळ पाहून तेथें जाऊन बसावें आणि तंतु तसा धरतां येईल तर पाण्याचे वाहते अंगास धरावा ह्मणजे पाण्याचे ओघानें तो हळूहळू बाहेर निघून जाईल.

हा तंतु तुटला असतां त्याचा परिणाम फारच भयंकर होतो. केव्हां केव्हां व्रण उद्भवतो आणि केव्हां केव्हां त्या भागास अतिशय सूज येते आणि त्यामुळें मनुष्य फार हैराण होऊन जातो. असें झालें असतां त्या ठिकाणीं पोटिस लावून पुन्हा त्याचें तोंड बाहेर काढावें आणि तें चिंधीस बांधून पूर्ववत् क्रम सुरूं ठेवावा.

ह्या वरील उपायाखेरीज जर आमचे वाचकांपैकीं कोणास सुलभ उपाय माहित असेल तर त्यांनीं विलंब न करितां त्याची सर्व माहिती आमचेकडे प्रसिद्धीकरितां लिहून पाठवावी ह्मणजे पुष्कळ लोकांवर त्यांचे उपकार होतील. किंवा कोणाजवळ या रोगावरील विकण्याकरितां खात्रीलायक जर औषध असेल तर तेंही त्यांनीं आमचेकडे पाठवावें ह्मणजे आह्मी त्याची विक्री करू.

कोणताही मजकूर अप्रासंगीक आहे असें ज्यास खरोखरी वाटेल तो तो मजकूर प्रसिद्ध करणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. असें नसेल तर अप्रासंगीक ह्मणण्याचा काय हेतु हें आह्मांस समजत नाहीं. आपले देशांत युरोपियन व नेटिव यांचा संबंध फार नाजुक प्रकारचा आहे, व या लोकांमध्यें परस्पर प्रेम रहावें हें आपणा सर्वांस इष्ट आहे याकरितां त्यांच्या परस्पर हक्काच्या संबंधानें भलत्या वेळेस चर्चा करण्यापासून वर सांगितली इष्ट गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं हें उघड आहे. एका मनुष्याच्या हातून कांहीं वाईट काम झालें तर वेळच्यावेळेस त्यास रागें भरावें किंवा दूषण द्यावें हें योग्यच आहे, परंतु गोष्ट जुनी होऊन कांहींकाळ लोटल्यावर भलत्याच वेळीं त्याच गोष्टीबद्दल त्यास कठोर शद्बांनीं ताडण केलें, तर या शद्बउच्चारणाऱ्यांच्या मनांत द्वेषबुद्धि मात्र आहे इतकें सिद्ध होतें. हें जर सामान्य गोष्टीविषयीं आहे, तर राज्यकर्त्यांच्या कृत्याविषयीं व योग्य वेळेस जी चर्चा व्हावयाची ती झाली असून वेळ गेल्यावर पुन्हा वाटाघाट करित बसल्यानें नेटिव लोक व पत्र कर्ते यांची बुद्धी आपणाविषयीं चांगली नाहीं असा उगीच साहेब लोकांचा ग्रह होतो, या मुळें नेटिव ओपिनियन पत्रांतील मजकूर व त्याचा उर्दू अखबारांत आलेला उतारा पाहून आह्मास वाईट वाटलें.

आतां आमच्या मागल्या अंकांतील मजकूर जो कोणीं लक्ष लावून वाचील त्याच्या सहज ध्यानांत येईल कीं, मेहरबान सर रिचर्ड मीड साहेब यांच्या हातून मुळींच चूक व्हावयाची नाहीं, किंवा ते जे करितील तें रास्त आहे असें समजावें, असा आमचे लिहिण्याचा आशय नव्हता. योग्य वेळेस सरकारचे कोणतेही कृत्याबद्दल आपला खरा अभिप्राय निर्भिडपणानें लिहिणें हें सर्व वर्तमानपत्रांचे कर्तव्य आहे, त्याप्रमाणें मि० एटकिन साहेब यांचे नेमणुकीचे वेळेस जें आह्मास योग्य वाटलें तें आह्मी लिहिलें. आतां आमचें ह्मणणें एवढेंच कीं, हल्लींचे रोसिडेन्ट साहेबांची एकंदरींत नेटिवाविषयीं चांगली बुद्धि आहे याकरितां त्यांच्या कृत्याविषयीं प्रसंग नसतां चर्चा करून आपली वाईटबुद्धि दाखविणें प्रशस्त नाहीं. साहेब लोक नेहमीं ह्मणतात कीं, नेटिव लोकांचें कांहीं बरें केलें तर ते तेव्हांच विसरतात व कांहीं थोडेसें वाईट झालें असें त्यांस वाटलें तर मात्र त्याचा वेळीं अवेळीं घोष करित बसतात. असा दोष बिलकूल कांहीं फायदा नसतां आपल्या असमंजसपणानें आपणावर आणून घेणें चांगलें नाहीं, या सर्व कारणांकरितां गेल्या दोन आठवड्यांत या विषयावर त्या पत्रांतून जो मजकूर आला तो आला नसतां तर बरें झालें असतें असें आह्मास अद्यापिही वाटतें. आतां आमचें जें खरें मत आहे तें प्रसिद्ध करण्यानें आह्मी हांजी हांजी करितों असें कोणीं समजले तर त्यास आमचा उपाय नाहीं, व या विषयावर पुन्हा लिहिण्याची इच्छा नाहीं.

वऱ्हाड.

लोअर व हायर परीक्षा— असिस्टंट कमिशनर, एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर, व तहशिलदार यांची वार्षिक परीक्षा अकोल्यास जुडिशियल कमिशनर साहेबाचे कचेरींत तारीख ८ माहे सप्टंबर सन १८७९ इसवी सोमवारीं रोजीं ११ वाजतां होईल.

मि० किट्स साहेब खामगावचे स्माल काज जडज रजेवरून परत आले. आज खामगावास जातील

जुडिशियल कमिशनर साहेब बुलढाण्याहून परत आले. तेथें दोन खुनी मुकद्दमे होते पण त्यांतील कैदी पळून गेल्यामुळें चौकशी झाली नाहीं. डाक्याचे मुकद्दम्यांतील कैदींनां सात सात वर्षांच्या शिक्षा झाल्या.

१६ वे तारखेस म्युनिसिप्यालिटीची जनरल कमिटी भरेल तेव्हां सेक्रटरीबद्दल व मुलीचे शाळेचे नेमणुकीबद्दल पुन्हा विचार होणार आहे.

पातुरच्या शाळेंतील ५ मुलांस चारोंच्या आरोपावरून फटक्यांच्या शिक्षा झाल्या. तिघांस आठ आठ, एकास १६ व एकास २४.

सांगलीकर नाटककार मंडळीनीं काल शेवटचा खेळ केला. ते आतां २।३ दिवसांत उमरावतीस जाणार

वर्तमानसार.

पंढरपुरकर प्रसिद्ध सिध्देश्वर बावा यांची कन्या सौ० अनुसूयाबाई नाशकास आली आहे. ती संस्कृतांत प्रवीण असून उत्तम पुराण सांगते व वयानें अगदीं तरुण आहे असें ह्मणतात.

धुळें, नाशिक, नगर, अमदाबाद एथील हाय स्कुलांतून शेतकीच्या अभ्यासाची सुरवात झाली.

हरी रामोशी यास जेजुरीस नेऊन फांशीं दिलें.

दक्षिणेतील शेतकरी लोकांस कर्जांतून मुक्त करण्याविषयीं दिवाणी कायदा होत आहे. तो झाल्यानें दिवाणी कोर्टांचे कामांत न्यायाधीश, वकील, वादी प्रतिवादी यांचे संबंधानें मोठा फरक होणार आहे. सबब त्याज बद्दल पुण्याची सार्वजनिक सभा व लवादकोर्ट सरकारास अर्ज करण्याचे विचारांत आहे.

सोलापुरच्या म्युनिसिप्यालिटीनें पाण्याचे पुरवठ्यासाठीं १,९३,८९४ रुपये दरसाल दर शेकडा ७ रुपये व्याजानें बाजारामधून कर्ज काढण्याची परवानगी मिळण्याकरितां सरकारास अर्ज केला आहे. दर सहा महिन्यांनीं कर्जाचे फेडीकरितां पांच हजार रुपये देण्याचा कमिटीचा विचार आहे.

रा. ब. माधवराव गोविंद रानडे धुळ्यास आजारी असून एक महिन्याचे रजेवर पुण्यास जाणार असल्याचें समजतें.

कालिदास नाटकाचे मालक रा. रा. नानाभाई धैर्यवान यांनीं नागपुरास एका मास्तराची इजत घेतल्याबद्दल त्यांवर फौजदारी मुकद्दमा होऊन ५० रुपये दंड झाला असें समजतें.

मुंबई इलाख्यांत ठिकाठिकाणच्या वुक डिपोच्या तपासण्या सरकार कलेक्टर मार्फत आतां करवीत आहे. धारवाडचे व पुण्याचे प्रकरणावरून ही गोष्ट या थरास आली.

सिव्हिल प्रोसिजर कोड कलम २८७ प्रमाणें विक्रीचे जाहिरनाम्याबद्दल कोर्टफी घेण्याची असोन कित्येक ठिकाणीं तर जाहिरनाम्याच्या जितक्या प्रति होतात तितक्यांसही कोर्टफी घेण्याची वाहिवाट आहे. यास्तव ही वाहिवाट बंद करून जाहिरनाम्याचे एकाच प्रतीबद्दल फी घेत जावी अशाविषयीं मुंबई हायकोर्टानें रत्नागिरी येथील डि० जज्जाचे रिपोर्टावरून एक सरक्युलर प्रसिद्ध केलें आहे.

श्री० अण्णा साहेब विंचुरकर याणीं दत्तक घेण्याविषयीं आपल्यास परवानगी मिळावी ह्मणून काम चालविलें होतें. परंतु शेवटीं हें प्रकरण ने० ना० स्टेट सेक्रेटरी साहेब यांजपर्यंत जाऊन त्याणीं श्रीमतांचें ह्मणणें नाकारिलें असें समजतें.

श्री० जयाजीराव महाराज शिंदे अलीजा बहादूर यांचा सडीस्वारी रामेश्वरास जाण्याकरितां ग्वालेरीहून लवकरच निघण्याचा विचार आहे ह्मणून समजतें.

रा० बें० निळकंठराव अनंत जोशी यांस जमखिंडीचे कारभाऱ्याचे जाग्यावर येण्यास कबूल आहां कीं काय ह्मणून विचारलें आहे.

चिनांत दुष्काळामुळें सुंदर स्त्रियां व तरुण मुली विकण्याचा व्यापार सुरू झाला आहे. हा प्रकार बंद करण्याविषयीं तेथिल सरकार यत्न करीत आहे.

सोलापुर जिल्ह्यांत रोज शेंकडो उंदीर मारून बक्षिसासाठीं मामलेदार कचेरींत ते दाखविण्यासाठीं आणण्याचा झपाटा चालला आहे. हुबळींत चार दिवसांत २० हजार उंदीर मारून गरीब लोकांनीं बक्षिसें मिळविलीं असें कळतें.

सावंतवाडीचे राजे श्रीमंत बाबासाहेब यांचा विवाह मार्गशीर्ष शु० ८ मी रोजीं बडोद्याची राणी जम्नाबाई यांच्या मुलीशीं होणार असें समजतें.

बाबू चंद्रनाथ बोस एम. ए. बी. एल. युनिवार्सिटीचे ग्रयाजुएट यांस जयपुरचे महाराजांनीं जयपुरचे कालेजचे प्रेन्सिपाल नेमलें.

पब्लिक वर्क्स खात्याचे संबंधानें जी कमेटी नेमली होती तिनें या खात्याचे संबंधानें हिंदुस्थानांत दरसाल ५,९०,००,००० रुपयापेक्षां जास्त कर्ज काढूं नये, कूपर्सहिल कालेजांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी करावी व नेटिव लोकांस या खात्यांत जास्त नोकऱ्या द्याव्या अशी शिफारस केली आहे.

कूपर्स हिल कालेजांतील विद्यार्थ्यांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला त्यावेळीं लार्ड क्रानब्रुक यांणीं असें बोलून दाखविलें कीं, पब्लिक वर्क्स खात्यांत नेटिव लोकांस जास्त नोकऱ्या देण्याचा सरकारचा मानस आहे तथापि या खात्यांतील मोठ्या अधिकाराच्या सर्व जागा सरकार त्यांस कधीं देणार नाहीं.

पिस्तुल, बंदुक वगैरे हत्यारें उतारूंनीं निझाम स्टेट रेल्वेतून आपले बरोबर नेऊं नये असल्या निजाम सरकारानें ठराव केला आहे ज्या उतारूस अशा प्रकारचीं हत्यारें रेल्वेतून बरोबर न्यावयाचीं असतील तीं त्यानें स्टेशनचे अधिकाऱ्याचे हवालीं करावीं व ज्या स्टेशनावर उतारूस उतरून जावयाचें असेल त्या ठिकाणीं हत्यारें स्टेशनचे अधिकाऱ्यापासून मागून घ्यावीं.

हिंदुस्थानच्या संबंधानें कर्ज काढण्याचे बिलाचें हाऊस आफ कामन्स सभेंत दुसरें वाचन झालें त्यावेळीं आफगाणिस्थान संबंधानें इंग्लंडच्यासात पट जास्त खर्च हिंदुस्थानावर लादणें योग्य नाहीं अशी मि. फासेट यांणीं सूचना केली होती परंतु बहुमतानें ती नाकारली ने. ओ.

पृथ्वीची रचना.

ज्या पृथ्वीवर आपण रहातो तिचा व्यास सुमारें ८००० आठ हजार मैल आहे. तिच्या सपाटीचा दोन तृतियांश भाग पाणी आहे व एक तृतियांश जमीन आहे हें सर्वांस माहित आहेच, परंतु या गोलाच्या मध्यंतरीची माहिती आपणास फारच थोडी आहे कारण या ऐवढ्या गोलाच्या फारच थोड्या भागाचें प्रत्यक्ष ज्ञान आपणास होतें. आजपर्यंत खणलेल्या खाणीं पैकीं फार खोल खाण ह्मटली ह्मणजे कायती अर्धा मैल खोलीची होय. या खोलीची तुलना पृथ्वीच्या सपाटीचें तिच्या मध्यापासून जें ४००० मैलां चें अंतर आहे त्याशीं केलीं असतां ही खोली फारच थोडी आहे हें सहज लक्षांत येईल. परंतु आपली माहिती फार फार ह्मटली ह्मणजे २० मैल होईल. त्यापलीकडे आपली माहिती फारच कमी आहे. या वरील भागास भूगर्भशास्त्रज्ञ " भूपटल " असें ह्मणतात. जमीनींतें कधीं कधीं जुनाट हत्यारें, भांडी, व अलंकार पुरलेले सांपडतात त्यावरून पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेलेल्या मनुष्यांची माहिती आपणास मिळते. पूर्वीच्या लोकांनीं पुरून ठेवलेल्या वस्तूंवरून काळाचे तीन भाग करितां येतात ते येणें प्रमाणें:—पहिला भाग पाषाणकाळ ज्यावेळेस लोक अगदीं रानटी स्थितींत होते व त्यांनीं आपल्या उपयोगी पडणारीं सर्व हत्यारें दगडाचीं केलेलीं होतीं अशा दगडाच्या कुदळी, कुऱ्हाडी व दुसरीं हत्यारें जमीनींत पुरलेलीं सांपडतात तो. दुसरा भाग ब्राझकाळ ह्मणजे ज्या वेळीं मनुष्याची थोडीशी सुधारणा होऊन त्यांनीं जमीनींत तांबें, सोनें, रुपें वगैरे धातु शोधून काढले व त्यांपासून आपणास पाहिजे ते हत्यार व पाहिजे तीं भांडीं करून घेतलीं. या धातूंची पुष्कळ हत्यारें जमीनींत व नदी नाले यांच्या गाळांत पुरलेलीं सांपडतात. तिसरा भाग लोहकाळ ज्या वेळेस अशुद्ध धातु शुद्ध करण्याची युक्ति शोधून काढली व कोळशाचा उपयोग होऊं लागला या वेळेस ब्रोंझबद्दल लोक लोखंडाचा उपयोग करूं लागले. पूर्वीच्या लोकांच्या वस्तू जमीनींत कशा आल्या हें सहज रीतीनें लक्षांत येईल. पाऊस फारच पडून नद्यांस पूर आला ह्मणजे त्यानशीं घरें खेडींही वाहून जातात व तीं माळांत बुडून रहातात. असेच पूर येऊन किंवा धरणीकंप होऊन पूर्वीच्या लोकांच्या वस्तु गाळांत बुडून राहिल्या व त्या आपणास सांपडल्या व त्या लोकांच्या रीतिभातीची माहिती आपणास मिळाली.

पृथ्वीच्या पटलावरून आपणास पाहिल्या भागाच्या पूर्वीचा ह्मणजे ज्यावेळेस मनुष्य ह्या जगांत नव्हता व या पृथ्वीवरचे रहिवाशी अति नीच प्राणी होते अशा वेळेचा इतिहास कळतो. हजारों वर्षांपूर्वी या पृथ्वीवर कोणते प्राणी होते या विषयींचें ज्ञान पृथ्वीच्या पटलावरून करून घेण्याच्या आधीं, पृथ्वीच्या सपाटीवर ज्या शक्तीच्या योगें नेहमीं फेरफार होतात त्यांचा विचार केला पाहिजे. त्यांपैकीं मुख्य शक्ति ४ आहेत. वातावरण, जल, अग्नि व इंद्रियविशिष्ट प्राणि या होत. यांचा विचार आपण निरनिराळा करूं. पहिली शक्ति ह्मणजे वातावरण यांत oxygon ऑक्सिजनवायु nitrogen नैट्रोजनवायु carbonic acid कार्बानिक आसिडवायु आणि पाण्याचा वाफ रूपानें असेलला ओलावा हे पदार्थ आहेत. सर्वांस माहित आहेच कीं, वातावरण हें चहूकडे आहे व या योगानें ही शक्ति बरीच महत्वाची झाली आहे. वातावरणांतील carbonic acid याचा गुण असा आहे कीं (carbonate of lime) खडू, marble, कंकर इत्यादि पदार्थ पाण्यांत द्राव्य होतात.

पावसाचें पाणी वातावरणांतून carbonic acid घेतें व त्यामुळें त्याचे अंगीं अगदीं कठीण चुन्याचे खडकांस limestone rocks पाण्यांत द्राव्य करितें. वातावरणांतील ओलावाही अतिशय कठीण खडकास दिसूळ करून टाकितो. हळूहळू व दृष्टोत्पत्तीस न येईल अशा रीतीनें हा ओलावा अतिशय कठीण खडकाच्या परमाणूंतील स्नेहाकर्षणाचा नाश करून टाकितो. ओलाव्याचा हा गुण थंड हवेंतील देशांत चांगला दिसून येतो. कारण या देशांतील खडकांच्या रंध्रांतील पाणी थिजून मोठमोठाल्या खडकांचे बारीक बारीक तुकडे होतात. वातावरणांतील oxygen (क्षारोदक) हा सर्व धातूंवर बसून त्या धातूची बारीक भुकी करून टाकतो. उदाहरणार्थ आपण कोणताही लोखंडाचा पदार्थ पुष्कळ दिवस तसाच ठेविला तर त्यावर oxide of iron चढतो. व त्यास जंग ह्मणतात. हा पदार्थ पृथ्वीवर बराच आढळतो. महाबळेश्वराच्या डोंगरांत शेंकडा पन्नासाहूनही अधिक जंग जाहे. यावरून आपणास दिसून येतें कीं, वातावरणांतील निरनिराळीं द्रव्यें पृथ्वी पटलाच्या पदार्थांची स्थिति नेहमीं बदलीत असतात. सु. प.

कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकाम-ध्यें " सिद्धांत कौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ' स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा पंचसंधि, षडलिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनींस व उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस " पोष्टपेड " पत्रीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते
मुंबई काकडवाडी घर नंबर ८

नादारी प्रकरणी नियम.

वऱ्हाडांत नादारी संबंधी जो कायदा ह्लीं चालू आहे व ज्याच्या प्रति मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सरकारी कचेऱ्यांतून वहिवाटीकरितां छापवून दिल्या आहेत तीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किमत आठ आणे. बाहेरगावीं पाठविण्यास एक आणा अधिक लागेल.

नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें.

वऱ्हाडाकरितां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं तयार करून रेसिडेन्सी आर्डरमध्ये जीं नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें छापून प्रसिद्ध केलीं व ज्यांचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं छापवून कोर्टानिहाय दिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत किंमत सहा आणे. बाहेर गावीं एक आणा अधिक पडेल.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.
चेरी

वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला रविवार ता० १७ माहे आगष्ट सन १८७९ इसवी अंक ३२

वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

	रु.
वर्षाचे अगाऊ	५
साल अखेर	७
किरकोळ अंकास	४१

डाक हाशील.

वर्षाचे अगाऊ	१४८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिसीबद्दल.

मराठी, १० ओळीचे आंत	१
१० ओळीपुढे दर ओळीस	०।०६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०३
,, दुसरे खेपेस	०२

जाहिरात.
नवीन सालिसिटर.

सर्व लोकांस जाहीर केलें जातें कीं, मि० वैमनजी फिरोजशा मुंबई हाय कोर्टांतील सालिसिटर व अटर्नी हे अकोलें एथें सुमार दोन महिने झाले आले आहेत. हे आल्यापासून वरींच कामें यांकडे येत आहेत. ज्यांजला फिर्यादी, अपिलें, व स्पेशियल अपिलें यांकडे देणें असतील किंवा हरएक कामासंबंधी सला मसलत घेणें असेल त्यांणीं त्यांशीं स्वतः अगर कारकूनमार्फत भेटावें, ह्मणजे त्यांचीं कामें घेतलीं जातील. प्रथमचे बोलण्याची अगर कागद पहाण्याची त्यांजपासून फी घेतली जाणार नाहीं. कामासंबंधी पैशाचा ठराव समक्ष केला जाईल. हे गृहस्थ अकोलें एथें तूर्त मि० कावशा हेड क्लार्क आफ करन्सी आफिस सदर स्टेशन अकोलें यांचे विऱ्हाडीं डिपुटी कमिशनर कचेरीनजीक रहात आहेत. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

जाहिरात.
सुबोधसार भाग पहिला.

राजनीति, व्यवहार वगैरेवर ग्रंथांतून अनेक विद्वानांच्या सहायानें नीतिपर, बोधक, मनोरंजक, आणि दृष्टांतिक असे सुभाषित श्लोक आह्मी निवडून त्यांचा सुबोधसार नावाचा ग्रंथ तयार केला आहे. यांत प्रथम श्लोक, त्याचे खालीं प्राकृत अर्थ, व त्याचे खालीं एकंदर श्लोकाचें व अर्थाचें खुलासेवार तात्पर्य लिहिलेलें आहे. हा ग्रंथ टाइपानें छापून लवकरच प्रसिद्ध होईल. याची किंमत भगाऊ आठ आणे व बुकबंगी व पोष्टाबद्दल एक आणा एकूण नऊ आणे ठेविली आहे. परंतु जितके वर्गदार दिळतील तितक्याच प्रति काढण्याचा इरादा आहे. जे लोक आह्मांस ओळ[illegible] त्यांस पूर्वी आह्मी दुसरे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत ह्याची खात्री असल्यानें अगाऊ वर्गणी देण्यास मागें पुढें पहाणार नाहींत; परंतु अपरिचित लोकांनींही अगाऊ वर्गणी देण्यास शंका घेऊ नये. कारण कांहीं ग्रंथकर्ते अगाऊ वसूल करून स्वस्थ बसतात परंतु तसा प्रकार एथें मुळींच नाहीं, असें आह्मी खात्रीपूर्वक कळवितों. वर्गणीदारांनीं आपलीं नावें व अगाऊ वर्गणी खालीं सही करणाराकडेस अथवा रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचार कर्ते यांजकडेस द्यावी. कळावें ता. ९ माहे जुलै सन १८७९ इ.

रंगनाथ सखाराम किकवीकर
स्टेशनमास्तर वरणगाव
जिल्हा खानदेश

रामजोशीकृत लावण्या.

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति लवकरच खलास झाल्यामुळे हल्लीं दुसरी आवृत्ति विशेष सुधारून टाइपावर छापविली आहे. प्रथमावृत्तीपेक्षां या खेपेस कांहीं उत्कृष्ट नवीन लावण्या घालून टीपा वगैरे दिल्या आहेत. त्यांचा किंमत पूर्वीप्रमाणें अगदी थोडी ह्मणजे आठ आणे ठेविली असून बाहेरगावीं मात्र टपाल खर्चाबद्दल अर्धा आणा अधिक पडेल. पुस्तकें पुण्यास आमच्याकडे किंवा ज्ञानप्रकाश व शिवाजी छापखान्यांत व मुंबईस इंदुप्रकाश छापखान्यांत मिळतील. कळावें तारीख १८ डिसेंबर सन १८७८ इसवी.

शंकर तुकाराम शालिग्राम.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांतही हीं पुस्तकें विक्रीकरितां आलीं आहेत.

अनंतफंदीच्या लावण्या.

हीं पुस्तकें रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं केलेलीं आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलीं आहेत. यांत अनंतफंदीचा इतिहास, माधवग्रंथ व लावण्या आहेत. याची किंमत आठ आणे आहे. डाक खर्च २ आणे शिवाय पडेल.

थोर पुरुषांचे आणि स्त्रियांचे पोवाडे.

हें पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास नुकतेंच छापिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत दीड रुपया व बाहेर गावीं नेणारास तीन आणे टपालसंबंधी खर्च पडेल

या पुस्तकांत शिवाजी महाराजांचा, निरनिराळ्या पेशव्यांचे, लढायांचे, शूरांचे व सद्गुणी स्त्रियांचे, तसेच पंढरपुर, तुळजापुर, व्यंकटगिरी, पुणें, बेलबाग, तुळसीबाग, पर्वती यांजवर पवाडे आहेत. कांहीं कांहीं पोवाडे तर एकाच प्रकरणावर कित्येक आहेत, सवाई माधवरावावर २, नानाफडाणिसावर २. अहिल्याबाईवर २, खर्ड्याच्या लढाईवर ५, व शेवटचे राव बाजीवर ८ पोवाडे आहेत.

[illegible] करितां व आपल स्वत[illegible]
श्लोक या पुस्तकास चांग[illegible] वल्याचें
असें आह्मी इच्छितों. या[illegible] त्र.
८८ आठ आणे आहे. व [illegible]
यांजकडे विकत मिळतील. [illegible]रानें हें नवीन उत्तम पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास तयार केलेलें आमच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलें आहे. याची किंमत १ रूपया असून डाकहशील एक आणा आहे. अगदी अलीकडील ह्मणजे पेशवाईअखेरच्या या शूर पुरुषाचें नाव सर्वत्र महशूर आहे सबब त्याचें यथार्थ व सादंत चरित्र बहुतांस वाचावयास व संग्रहीं बाळगण्यास उत्साह असेल ह्मणून आह्मी मुद्दाम याच्या प्रति विक्रीस आणविल्या आहेत. सर्वांस कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

सांगलीकर नाटककार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. नाटकवाल्यांत सांगलीकर हे नामांकित आहेत त्यांत रा. रा. धोंडोपंत मराठे हे अधिक नामांकित आहेत आणि त्यांचें नाटक अकोल्यास येऊन दोन तीन महिने राहून खेळ करून गेलें तेव्हां त्यांच्या संबंधानें गुणदोषा एक दोन शब्द लिहून त्यांस व आपले वाचकांस कळविले तर उपयोग होईल असें मनांत येऊन लिहिण्याचे श्रम घेतले आहेत. तुह्मी कृपाकरून हा मजकूर ज्या अंकांत छापाल तो अंक ते जिकेड गेले असतील तिकेड त्यांचे अवलोकनार्थ पाठविला ह्मणजे ते कांहीं सुधारणा यापुढें तरी करितील. अस्तु.

रा. रा. धोंडोपंत मराठे आपलें नाटक घेऊन वऱ्हाडांत खामगावीं आले व अकोल्यास पुढें यावयाचें, तेव्हां आपले पत्रांत त्यांची पुष्कळ प्रशंसा आली होती ती वाचिली आहे. त्यांत लिहिलें होतें कीं, यांचें नाटक फार उत्तम आहे. व पुस्तकांतील उत्तम उत्तम ७।८ नाटकें वेणीसंव्हार, मृच्छकटिक, शाकुंतल इत्यादि त्यांनीं फार चांगलीं बसविलीं आहेत तें पाहून आह्मांस फार संतोष झाला होता पण रंगभूमीवर त्यांचे कांहीं प्रयोग झाले तेव्हां तो भ्रमाचा भोपळा सर्व फुटला व लोकांची अशी खात्री झाली कीं, त्यांनां एका मृच्छकटिकाशिवाय दुसरीं ग्रंथांतील नाटकें चांगलीं करितां येत नाहींत. शाकुंतल नाटक त्यांनीं केलें तें त्यांस साधलें नाहीं. व जयपाळ नाटक केलें त्यास मुळींच रंग भरला नाहीं. तें केवळ पुस्तकी विद्येप्रमाणें पोपटपंचीचें झालें. आणखी रत्नावली व मालतीमाधव हीं नाटकें ते करणार असल्याची वदंता होती पण न करितां ते निघून गेले यामुळें तीं गोष्ट आंत राहिली; मला वाटतें कीं, तीं त्यांजवळ तयार नसावीं, किंवा तयार असलीं तरी चांगलीं नसावींत आणि जयपाळ व शाकुंतल प्रमाणें त्यांचेंहि व चेरी होईल ह्मणून त्यांनीं तें सोंग केलें नाहीं.

एतावतः ग्रंथोक्त नाटकें त्यांस चांगलीं करितां येतात ही गोष्ट अगदी खोटी ठरली हे निर्विवाद आहे. व त्यावरून मला असें वाटतें व माझें ऐकण्यांत असें आलें आहे कीं फक्त मृच्छकटिक नाटक कालेजांतील मंडळी कडून पुष्कळ तालमी घेऊन त्यांनीं तयार केलें आहे. व कित्येक वर्षें ते त्याचा प्रयोग करीत आहेत ह्मणून ते साधारणतः त्यांस चांगलें येतें; त्यांतील कविता चांगल्या असून कांहीं मुलें त्या सुस्वर ह्मणतात ह्मणून त्यास रंग भरतो, दुसरें कांहीं नाहीं. पुष्कळ अनुभवावरून माझी खात्री झाली कीं, इचलकरंजीकर नाटकवाले यांहून वरचढ आहेत. व ते ग्रंथांतील नाटकें श्लोकासुद्धां करूं लागल्यास यांपेक्षां खचित चांगली करितील व पुष्कळ करितील.

रा. रा. धोंडोपंत मराठे रामायणी व भारती नाटकें साधारण बरीं करितात तीं दहा वीस वर्षांच्या अनुभवानें त्यांस मुखोद्गत झालेलीं आहेत ह्मणून त्यांच्या तालिमी वगैरे करण्याचें कधीं त्यांस कारण पडत नाहीं. पण या धांगडधिंग्यांत मोठा गुण तो काय! त्यांतून कोठें देखावे दाखविणें, प्रेक्षकांचे अंतःकरणावर चांगला ठसा उमटण्यासाठीं कांहीं हुबेहुब तऱ्हा करणें, बगीचे, उदकपात्रें, मंदिरें, वणवा, सातिप्रवेश, शिर हसविणें, इत्यादि प्रसंगीं मंत्रापेक्षां तंत्राची खुलावट करण्यानें मनोवेधकता विशेष होते पण ही गोष्ट त्यांस समजत होती किंवा नाहीं तें कळत नाहीं. ते पडद्याच्या घमंडीवर असत पण पडदे असले ह्मणजे हे बाकीचे प्रकार नको आहेत असें कोणत्या नाटक शास्त्रांत सांगितलें आहे तें त्यांचें त्यांस ठाऊक! चांगले नाटककारांनी अशा गोष्टींस फार जपलें पाहिजे.

यांची मंडळी मोठी कर्मट होती ह्मणजे धर्म कर्मांत ते बहुधा निमग्न असत. स्नानसंध्या, एकादसण्या, वेदपठण यांत ते कालक्रमणें करीत असून निर्व्यसनी होते व गरीब होते. हा सद्गुण खरा व हा प्रत्येक मनुष्यास अवश्य आहे किंवा असावा, पण या पुण्याच्या योगानेंच त्यांचीं नाटकें सुरस होत जातील अशी त्यांची समजूत होती कीं काय! न कळे! त्यांचें मुख्य कसब नाटकाचें, सबब त्याचें अध्ययन त्यांस विशेष पाहिजे आणि तें ते फारसे करीत होते किंवा त्यांचे सूत्रधार त्यांपासून ते करवून घेत होते असें कधीं कोणाचे आढळांत आलें नाहीं. सबब ही मी कमतरता समजतों.

रा. रा. धोंडोपंत सूत्रधार हे आपले कसबांत प्रवीण आहेत. व सर्व आख्यानांच्या कविता त्यांस मुखोद्गत आहेत. व मंडळींत बसले तर चांगल्या साक्षरासारखी त्यांची विद्वत्ता दिसून येत असे. इचलकरंजीकराचे रा. रा. राघोपंत व हे धोंडोपंत यांचें साम्य पाहिलें तर कित्येक प्रकारांत धोंडोपंताचा नंबर वर लागेल. पण एकंदर म्यानेजरींत रा घोपंताची टापटीप, धूर्तता, दूरदृष्टी, व फड मारून नेणें हें अधिक होतें असें वाटतें, असो. थोडक्यांत लिहित असतां बराच विस्तार

झाला सबब आतां पुरें करितों. कळावें हे विनंति.

विवेचक.

बाळापुर एथील सरकारी शाळेतील मुलांची मिरवणूक.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. पुढील चार ओळी आपल्या पत्रच्या येत्या अंकीं प्रसिद्ध होण्या करितां पाठविल्या ओहत, तर त्यांस स्थळ देऊन छापण्याची मेहेरबानी करण्यांत यावी.

बाळापुर पेठ एथें आजपावेतों गांवठी शाळांचें बरेंच महात्म्य होतें, परंतु तें हल्लीं अगदी नाहींसें झालें आहे. या वर्षांत एथील दोन मोठाल्या गांवठी शाळा अगदी ओसाड पडल्या, व त्यांचें पुनरुज्जीवन करण्याकरितां त्यांचे मास्तरानीं पुष्कळच खटपट केली परंतु ती सर्व निष्फळ झाली. असो. नागपंचमीचे दिवशीं गांवठी शाळेंतील मुलांनीं वाजत गाजत मिरवत जाण्याची चाल या प्रांतीं कोठें कोठें आहे, व ती इतके दिवस एथेंही चालू होतीच. परंतु एथील गांवठी शाळा या सदरी सांगितल्या प्रमाणें बंद झाल्यामुळें नागपंचमीचा दिवस साजरा होतं नाहीं हें पाहून गावांतील पुष्कळ संभावीत गृहस्थांनीं सरकारी शाळेचे हेड मास्तर यांजकडेस जाऊन मुलांचा मिरवणूक काढण्याविषयीं सुचविलें. सरकारी शाळांतून ही चाल कोठें प्रसिद्धपणें सुरू नसले कारणानें प्रथम हेड मास्तर यांनीं ती गोष्ट अगदीच नाकारिली. परंतु गांवकऱ्यांनीं विशेष आग्रह धरिल्यामुळें व तसें केलें नसतां ते फार नाराजहोतील असें दिसून आल्यामुळें अखेरी स हेड मास्तर यांस त्या गोष्टीस रुकार देणें भाग पडलें. सदर्हू सणाचे दिवशीं सकाळीं १ वाजतां पूर्वी ठरल्या प्रमाणें शाळेपासून मुलांचे मिरवणुकीस सुरुवात झाली. सर्वांचे पुढें वाजंत्री, चौघडा, शिंगें वगैरे वाद्यें वाजत होतीं, त्यांच्या मागें गणपतीची पालखी होती, व शेवटीं सुमारें २०० मुलांचा मेळ रांगांनीं परवचा व कविता वगैरे गळ्यावर म्हणत चालला होता. भोवताली गावांतील लोकांची तो समारंभ पहाण्याकरितां मोठी गर्दी जमली होती. असा त्या मुलांचा थाट पेठेंतील मोठ्या रस्त्यानें मिरवत मिरवत पुनः सरकारी शाळेपाशी येऊन थडकला. नंतर रा. रा. पांडुरंग गोविंद शास्त्री हेड मास्तर यांणीं तेथील चीफ कानस्टेबल मि० भोलासिंग, व इतर संभावीत गृहस्थ व साबकार या सर्वांस योग्य स्थानीं बसविल्यावर नागपंचमीचा सण ह्या विषयावर सुरस भाषण केलें. शेवटीं विद्येपासून होणारे फायदे या विषयावर बराच वेळ संस्कृत व प्राकृत ग्रंथांतील प्रमाणांसहीत बोलले. त्यांचे बोलण्याचा ठसा श्रोतेजनांचे मनावर चांगला उमटला, असें त्या वेळीं दिसून आलें. मग हेड मास्तर यांणीं पुन. उभें राहून सुचविलें कीं खेड्या पाड्यानीं देखील वर्गणी होऊन मुलांस आरोग्य देण्याकरितां तालमी व कसरतीचीं साधनें करण्यांत आलीं आहेत, असें असतां आपल्या एथें ही सोय नसावी हें आपणास मोठें लांछन आहे, ह्या करितां सर्वांनीं आपले शक्त्यनुसार या कामास मदत केल्यास मोठे उपकार होतील, आतां हे उपकार मास्तरावर किंवा सरकारावर आहेत असें कोणी समजूं नये. तर हे तुमचे तुच्याम वरच आहेत; म्हणजे ज्या अर्थीं मुलें तुमचीं त्या अर्थीं त्यांचे शरीरास आरोग्य देण्याकरितां तुम्ही कांहीं तजवीज केली तर त्यांत दुसऱ्यावर उपकार ते कशाचे आहेत बरे? ह्या त्यांच्या सूचनेस मि० भोलासिंग चीफ कान्स्टेबल यांणीं अनुमोदन दिलें. व वर्गणीची याद तयार करण्यास सांगून पाहिल्यानें तींत आपण आकडा घातला. व इतर संभावित लोकांस आकडे घालण्यास सांगितलें. याद सुरूं होतांच कित्येक लोकांनीं "यःपलाय" केलें. हें त्या लोकांस खरोखरच मोठें लज्जास्पद होय. यादीवर सुमार वीस पंचवीस रुपयांचे आकडे पडले आहेत. मि० भोलासिंग यांणीं मलखांब व जोड्या करण्याकरितां बाभळीचीं लाकडें स्वतांचे खर्चानें देण्याचें कबूल केलें आहे. सदर्हू चीफ यांणीं शाळेचे कामास मदत केली हें त्यांस मोठें भूषण होय. तसेंच त्यांणीं आपले घरासमोरचे शिवालयाचा जीर्णोद्धार केला हेंही त्यांचे योग्यतेस अनुरूपच आहे यांत संशय नाहीं. असो. हेड मास्तर यांणीं अखेरीस सर्वांस पानसुपारी व फुलांचे गजरे व अत्तर गुलाब वगैरे दिलें व चीफ साहेबांनीं आणि इतर गृहस्थांनीं मोठी मदत केली म्हणोन सर्वांचे फार आभार मानिले. एडिटर राव, आमच्या बाळापुर पेठेंत आजपर्यंत असा समारंभ कधींच झाला नव्हता व तो हल्लीं घडून आला म्हणून मोठ्या उल्हासवृत्तीनें आपणास लिहून कळविला आहे. पत्रविस्ताराबद्दल माफी करून आपण त्यास स्थळ द्याल असें मी इच्छितों. कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला

एक समारंभप्रेक्षक.

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य ३० शके १८०१

विनंती—या आठवड्यांत आमचे कारखान्यांतील बहुतेक सर्व कंपॉझिटर आजारी पडले व शेवटीं फक्त एका कंपाझिटरास पत्र पुरें करावें लागलें सबब उशीर झाला त्यास नि रुपाय आहे.

नेटिवांस सिविल सर्विसच्या जागा.

आमचे व्हाईसराय लार्ड लिटन साहेब झाल्यापासून त्यांनीं आह्मा नेटिव लोकांचे सुखार्थ कित्येक गोष्टी केल्या आहेत त्याचप्रमाणें त्यांचे कारकीर्दींत हल्लीं नेटिव लोकांस सिविल सर्विसच्या जागा देण्याचा ठराव झाला, हें ऐकून आह्मास फार संतोष वाटतो. व या कामीं आह्मी लार्ड लिटन साहेबांचे उपकार मानितों. विलायतेस वाटाघाट होऊन ८।९ वर्षांमागें या बाबदींत सरकारचा ठराव झाला होता व तो हा कालपर्यंत मागें पडला होता त्याजबद्दल वेळोवेळ स्टेट सेक्रेटरीस लिहून या व्हाईसराय साहेबांनीं तो हल्लीं अमलांत आणविण्याची तजवीज केली ही गोष्ट त्यांस मोठी भूषणाची होय. आतां ठराव होऊन आल्याप्रमाणें ते सुयंत्र रीतीनें त्याची अमलबारी करून नेटिवांचा संतोष व देशाचें हित करितील असा आह्मी भरंवसा बाळगतों.

सिमल्याहून १२वे तारखेचा टेलिग्राम आला आहे कीं, हिंदुस्थान सरकारानें सनदी सिविल सर्विसच्या जागांमध्यें नेटिवांची भरती करण्याविषयीं लिहिलें होतें त्यास विलायतेहून स्टेट सेक्रेटरी साहेबांकडून मंजुरात मिळाली. नेटिवांनां पगार इंग्लिश सिविलियनास जो पगार मिळावयाचा त्याच्या दोनतृतीयांशाहून अधिक होईल इतका मिळणार नाहीं. प्रतिवर्षीं सिविल सर्विसमध्यें जे लोक नवीन लागावयाचे त्यांत सातवा हिस्सा नेटिव असावे व इलाख्याचे सरकारानें कोणकोणते नेटिव गृहस्थ या जागा देण्यास योग्य आहेत त्यांची नावनिशी हिंदुस्थान सरकारास कळवित जावी म्हणजे प्रोबेशनवर जागा दिल्या जातील असा ठराव झाला आहे.

आतां अशा ठरावानें नेटिवांचा फारसा प्रवेश सिविल सर्विसमध्यें होईल असें दिसत नाहीं. कारण वर्षास नवीन भरती पांचपंचवीस सापर्यंतच होत असते. तेव्हां नेटिवांच्या वाटणीस दोन तीनच जागा येतील. विलायत सरकारच्या मागील ठरावांत पंचमांश जागा नेटिवांस द्याव्या व सन १८७९।८० आणि ८१ या सालांत दोन दोन अधिकही द्याव्या. असें होतें तें बदलून हल्लीं सप्तमांशाचा ठराव झाला आहे. एवढी काटकसर झाली नसती तर एकंदरींत पांच चार तरी जागा नेटिवांस मिळण्याचा सुमार होता. अस्तु. कांहीं-नव्हतें त्यापेक्षां थोडें झालें हेंच फार चांगलें झालें असें आह्मी म्हणतों व तूर्त त्यांत संतुष्ट रहातों.

विलायत सरकारच्या ठरावांत अशा जागेवर नेटिवास नेमावयाचें त्याचें वय २५ वर्षांवर नसावें व असल्यास त्यास नेमण्याजोगी त्याची योग्यता वगैरे कारणें इलाख्याचे सरकारानें नमूद करावी असें लिहिलें आहे त्याचा उल्लेख टेलिग्रामांत आला नाहीं. तेव्हां तोच विचार कायम असेल असें आह्मास वाटतें. इलाख्याच्या सरकारानें आक्टोबरचे पहिले तारखेस अशा लोकांचीं नावें कळवित जावीं असें आहे तेव्हां या वर्षीं आतां कोणा कोणा नेटिवांचीं नावें लिहून जातात तें पहावें. प्रोबेशनवर नेमलेल्या गृहस्थांस कायम करण्याविषयीं इलाख्याच्या सरकारानें त्यांच्या कामाच्या माहितीवरून दोन वर्षांत हिंदुस्थान सरकारास कळविलें पाहिजे, व त्यांची त्या मुदतींत परीक्षा घ्यावी असा ठराव होईल तर त्यांनीं ती दिली पाहिजे असेंही सदर प्रकरणांत लिहिलेले आहे.

वतनांच्या रुसुमांचे दावे.

या आठवड्यांत मे० जुडिशियल कमिशनर साहेब यांचे कोर्टांत मोठमोठाले वतनदारी संबंधी ५।७ महत्वाचे कज्जे राखून ठेविलेले चालणार होते, व त्यांपैकीं रा० रामहीचे निकाल झाले, व गेले व मि० शहामहंमत चालतील. या सर्व गणें रुसुमाचा अंश प्रतिवादीच्या तकारी

तंत्र उपभोग घेत आलों आहो, सबब वाडींस कांहीं मिळण्याचा हक्क नाहीं, अशा हेत्या. इंग्लिश सरकारानें हा वऱ्हाड प्रांत ताब्यांत घेतांनां रुसुम किती व कशा प्रकारें द्यावे याजबद्दल जे ठराव केले आहेत ते व त्यानंतर वेळोवेळीं जे निरनिराळे ठराव झाले ते सर्व पाहून सर्वांस लागू असा एक सिद्धांत करून त्याप्रमाणें आपले फैसल द्यावे असें जुडिशियल कमिशनर साहेबानीं मनांत आणून तत्संबंधी सर्व कागद पत्र मागवून निर्णय करणें सुरूं केलें आहे. या आठवड्यांत जे दोन कज्जे फैसल झाले त्यांत एक अडगावचे देशपांडे रा. रा. गोपाळराव केशव यांचा व दुसरा अगरच्या देशमुखाचा आहे. अडगावच्या मुकद्म्याचे काम बरेच दिवस चाललें होतें. व वादीस रुसुमाचा अंश कधींच मिळाला नाहीं व त्याचा हक्क नाहीं असें पुष्कळ कागदपत्र व इतर पुरावे पाहून जु० क० साहेबानीं ठरविलें. या प्रकरणाची खरी हकीकत आह्मांस मिळाली म्हणजे आह्मी सादंत प्रसिद्ध करूं. या कज्जांतून वादींचे पक्षास निरनिराळे मुकद्म्यातून मि० नसरवानजी कामा बारिस्टर, मि. बमनजी फिरोजशा सालिसिटर तसेच वकील रा. रा. सदाशिव नारायण मुंबईकर, रा. रा. पांडुरंग गोविंद, रा. रा. गोपाळ खुशालराव इत्यादि नामांकित गृहस्थ कामें चालत आहेत व प्रतिपक्षास रा. रा. देवराव विनायक हे आहेत. आणि जे दोन तीन कज्जांचे फैसल झाले ते प्रतिपक्षास अनुकूळ झाले आहेत. या महत्वाचे खटल्यांतील वकील लोकांनीं आपआपल्या पक्षास प्रबलता आणण्याचे कामीं फार तत्पर असून ते मोठ्या कडेकोट तयारीनें भांडत आहेत असें ऐकतों. तेव्हां वऱ्हाडांत न्यायाचे कामाचा व वकिलीचे धंद्याचा आलीकडे चांगला प्रभाव पडत आहे हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

अलीकडील कायदे कौन्सिल.

दक्षिणेतील रयतेची स्थिति सुधारण्याच्या कायद्यांचा मसुदा हल्लीं कायदेकौन्सिलांत आला आहे हे आमचे वाचकांस माहित असेलच. ह्या कायद्याचा मूळ हेतु म्हटला म्हणजे असा आहे कीं, शेतकरी लोकांस त्यांच्या सांप्रतच्या निकृष्टावस्थेतून मुक्त करावें. परंतु हा कायदा एकपक्षीय असल्यानें किती दिवस हा वास्तव्य करील याची आह्मास शंकाच वाटते. कारण शेतकऱ्यांची परम वाईट स्थिति होण्यास खरें कारण पाहूं गेलें तर सरकारचा जबरदस्त जमीनीवरील सारा आणि तो वसूल करण्याचे कडक मार्ग हें असून त्याबद्दलचा विचार एकीकडेच ठेवून गरीब बिचारे सावकारांवर हावक घालणारा हा नवीन कायदा होत आहे; परंतु हा प्रकार पाहूं गेलें असतां प्रस्तुतचे कायदे करण्याचे राहाटीस अनुकूलच असा आहे म्हटलें तरी चालेल.

आह्मास वाटतें कीं, शेतकरी लोकांनीं आलिकडे दंगे फार कां केले, देश मध्यें दुष्काळ फार कां पडले, उंदीर व शी वगैरे फार कां झाल्या, यांच्या शोधार्थ व निवारणा साठीं हल्लीं कमिशनें बसतात त्याप्रमाणें हे हल्लीं आमचे देशामध्यें फार कां झाले

व त्यांचें निवारण कोणत्या उपायानीं होईल याबद्दल चौकशी करण्याकरितां एक कमिशन बसवावें म्हणजे बाकीच्या सर्व कमिशनांच्या कारणांचा उलगडा ह्यांत होणार आहे.

कायदे करण्याचा मुख्य हेतु असा आहे कीं देशामधील नीतीचें आणि प्रत्येक इसमाच्या बाजवी हक्काचें रक्षण व्हावें. हे हक्क मुख्य दोन प्रकारचे आहेत. लोकांतील परस्परांचे हक्क आणि दुसरे राजा आणि प्रजा ह्यांचे मधील हक्क. तेव्हां कोणताही कायदा करणें झालें तर ह्या सर्व हक्कांकडे समतोल दृष्टी पोंचाविली पाहिजे. ज्या देशामध्यें कायदे मोठ्या शहाणपणानें केले असतात, त्या देशांत प्रजा सुखी राहून राजा आणि प्रजा यांजमध्यें प्रेमभाव उत्पन्न होतो. आणि तेच कायदे एकपक्षीय असतील तर राष्ट्रामध्यें नेहमी बंडाळ रहाते तेव्हां कोणत्याही देशामध्यें कायदे कसे होते आहेत हें जाणणें झाल्यास त्या देशाची स्थिति पहावी म्हणजे झालें.

दुसरी गोष्ट अशी कीं कायदे करण्याचें काम मोठ्या जोखमीचें आणि अकलेचें आहे. ज्यांचे कायदे सर्वांस मान्य होतात असे लोक देशामध्यें फारच विरळा निपजतात.

आपल्या हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं मैनु म्हणून एक श्रेष्ठ पुरुष होऊन गेला त्याचे कायदे आज शेकडो वर्षेपर्यंत ह्या सर्व विस्तीर्ण भरत खंडभर निर्वेधपणें चालू आहेत. तसेंच मुसलमान लोकांकरितां महंमदानें मोठ्या निःपक्षपाताचे कायदे केले आहेत. पारशी लोकांकरितां झोरोस्टरानें कायदे केले आहेत. स्पार्टन लोकांकरितां लायकरगस यानें कायदे केले. तसेंच अर्वाचीन काळीं नेपोलियनानें फ्रेंच लोकांकरितां कायदे केले आहेत ह्या सर्व पुरुष विशेषांनीं आपआपले कायदे इतक्या दूरदृष्टीनें आणि इतक्या शहाणपणानें केले आहेत कीं ह्या सर्व पुरुषांस त्या त्या राष्ट्रांतील लोक केवळ परमेश्वरा प्रमाणें भजतात आणि त्यांची आज्ञा शिरसांमान्य करितात.

गेल्या पन्नास वर्षांमध्यें कायदे झाले किती आणि त्यांचें वास्तव्य झालें किती, हें पाहूं गेलें तर आपणास ह्या गोष्टीचें हसूं आल्याखेरीज रहात नाहीं. किंवा ह्या कायद्यांची स्थिति मोगलाईंतील मामलेदारांचे स्थिती प्रमाणें झाली आहे. त्या वेळीं मामलेदारांची नेमणूक झाली म्हणजे तो घोड्यावर मागें तोंड करून घोडें हाकित असे असें म्हणतात. कारण आपण जाऊन नेमिलेल्या स्थळीं पोंचण्याच्या पूर्वीच कदाचित दुसऱ्या कोणाची नेमणूक होईल अशी त्यास सर्वकाल धास्ती असे. त्याप्रमाणेंच हल्लीं कायद्याच्या प्रति विकत घेते वेळीं घेणारास वाटत असतें कीं, कांहीं वेळ तरी या बुकाचा उपयोग करण्यास सांपडेल कीं नाहीं कोण जाणे!

नुकताच पास झालेला सन १८७८ चा दिवाणी कायदा लोकांनीं त्याचीं पुरतीं पृष्ठेसुद्धां फाडलीं नाहींत तोंच त्या कायद्यास सुधारणारा नवीन कायदा येऊन धडकला त्याप्रमाणेंच पूर्वीचा फौजदारी काम चालविण्याचा कायदा आतां कोठें लोकांस समजूं लागला न लागला इतक्यांत कायदे कौन्सिलांत दुसरें बिल शिजूं घालून एकवार उतास सुद्धा येऊन गेलें ह्याप्रमाणें कोणताही कायदा स्टांपाचा, नोंदण्याचा, मुदतीचा, हे सर्व किती अल्पायुषि होतात हें सांगतां पुरवत नाहीं.

या सर्वांस मूळभूत कारण आह्मास असें वाटतें कीं, आपल्या हिंदुस्थान देशामध्यें राज्यचक्र चालविण्याकरितां जे राज्यकार्य धुरंधर पुरुष नेमिले जातात त्यांची त्यांच्या सिंहासनावर आयुर्मर्यादा फारच थोडी ठेविली आहे. याकरितां जो कोणी नवीन त्या गादीवर बसतो त्यास तेवढ्या अल्पकाळांत; जन्मांदारभ्य कमावलेल्या आपल्या अचाट बुद्धीचें निशाण उभारायाचें असतें. प्रत्येकास कदाचित असें वाटत असेल कीं, पूर्वापेक्षां; आपण जर सरकारचे पिशवींत भर अधिक नाहीं टाकली तर आपल्या अंगीं राज्य करण्याचें चातुर्य आहे असें कोण म्हणेल! जर आपल्या कारकीर्दींत कांहीं विशेष गोष्टी घडल्या नाहींत तर इतिहासकार आपणास काय म्हणतील? अशा कल्पना मनांत आणून ते आपल्या प्रचंड बुद्धीचें यंत्र कायद्याच्या वाफेनें इतक्या वेगानें चालवितात कीं, कित्येक वेळां तो वेग लोकांस अगदीं असह्य होऊन जातो आणि अशामुळें जे परिणाम घडावयाचेच ते साहजिक घडून येतात यांत नवल तें काय?

आमचें म्हणणें म्हणजे कायद्यामध्यें कधीं सुधारणुका होऊंच नयेत असें नाहीं. सुधारणा कालाचे मानानें व्हावी परंतु ती सुधारणा सावकाश आणि राजा व प्रजा या उभयतांचेही हक्कास अनुकूल अशी होत असावी.

आतां अशा प्रकारचे उपयुक्त कायदे आमच्या देशामध्यें मुळींच नाहींत. व कायदे करणारांचा हेतु म्हणजे रयतेस विनाकारण त्रास द्यावा असा आहे असें आमचें मत बिलकूल नाहीं. परंतु आमच्या देशाची स्थिति, सुधारणा, ऐपत यांकडे लक्ष देऊन कायदे झाले व ते वारंवार फिरले नाहींत म्हणजे आह्मास फार नीट पडणार आहे, येवढेंच काय तें आमचें म्हणणें आहे.

यथायोग्य अव्ययें Appropriate Prepositions. या नावाचें एक लहानसें इंग्लिश पुस्तक गेले आठवड्यांत पेपरकरन्सीकडील मि. के कावशा एम टाटा यांजकडून आह्मास नजर आलें आहे. हें त्यांचे मित्र मुंबईच्या प्रोप्रायटरी स्कुलावरील मास्तर मि० सोराबजी बमनजी पेस्तनजी यांणीं केलें आहे. क्रियापदांनां वगैरे जीं अव्ययें जोडलीं जातात तीं कोणत्या शब्दाला कोणत्या प्रसंगीं कोणतीं जोडावीं हें यांत विस्तारानें चांगलें सांगितलें आहे. व जागोजाग त्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. बहुत लोक अव्ययें जोडतांनां चुका करितात त्या होऊं नयेत म्हणून हा यत्न आहे. अक्षरानुक्रमानें कोशाप्रमाणें यांची रचना केली आहे. इंग्लिश भाषेचा व्यासंग करणारांस हें पुस्तक मोठें सहाय देईल. सबब तशा सर्वांनीं याचा संग्रह करणें फार चांगलें आहे. मि० सोराबजी यांणीं मागें इजी इंटरप्रिटर या नावाचें असेंच उपयुक्त पुस्तक तयार केलेलें आहे तें आमचे वाचकांस ठाऊक असेल. यावरून ते अशा कामांत प्रवीण झाले आहेत व उत्सुकतापूर्वक ग्रंथ करितात यास्तव अशा कामीं अधिक उत्तेजन येण्याकरितां व आपले स्वतांचे उपयोगाकरितां लोक या पुस्तकास चांगला आश्रय देवोत असें आह्मी इच्छितों. या पुस्तकाची किंमत ४८ आठ आणे आहे. व हीं मि. के. कावशा यांजकडे विकत मिळतील.

वऱ्हाड.

पर्जन्यानें याही आठवड्यांत चार पांच दिवस झोड मांडली होती. आतां उघाडी आहे. पर्जन्य फार चांगला झाला व हल्लीं हवा रमणीय झाली आहे.

मि० एच ए हिथ साहेब असिस्टंट पोलिस सुपिंटेंडेंट यांस क्रिश्चन साहेबाचे जागीं तारीख १९ एप्रिल पासून फोर्थ क्लासचे डिस्ट्रिक्ट सुपिंटेंडेंट कायम केलें.

मे०टामन्सन साहेब बुलढाण्याचे असिस्टंट कमिशनर यांचा रजेवर जाण्याचा बेत रहित झाला. व मलकापुर कोर्टाचें काम त्यांनीं बुलढाण्यास पाहावें असें ठरल्याचें उर्दूअकबारावरून समजतें. तसें झालें असल्यास त्या तालुक्याचे लोकांस आधिकाऱ्यांचे सोयीकरितां हा विनाकारण त्रास झाला.

रा०रा० रामचंद्र नारायण साघले यांस मलकापुरास आफि० फर्स्ट असिस्टंट मास्तर नेमिलें. व तेथील रा०रा० परशराम वामन चितळे यांस ६०रु. वरून ५०रु. वर जळगावास नेमिलें.

मि० हाबसन साहेब यांस मि० मोफट साहेब विलायतेचे रजेवरून परत येईत पर्यंत त फोर्थ क्लास डिस्ट्रिक्ट पोलिस सुपिंटेंडेटचें आफिशिएटिंग काम करण्याचा हुकूम झाला.

अकोल्याचे जेल आस्पिटलावरील नेटिव डाकटर मि० पुरुषोत्तम यास इन्स्पेक्टर जनरल साहेबाचे दिमतीस दिलें. व अकोल्याचे सिविल सर्जनचे हाताखालील थर्ड क्लास आस्पिटल असिस्टंट मि० अबदु रहमान यास जेलअस्पिटलकडे नेमिलें.

मे०जोन्स साहेब कामिशनर यांची स्वारी पुढील माहिन्याचे पहिले आठवड्यांत येथें येणार असल्याचें समजतें-

---

रा० बा० नारायणभाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर कमिशनर साहेबास भेटण्याकरितां सोमवारीं उमरावतीस गेले होते व बुधवारीं परत आले.

कर्नल अलेकझांडर साहेब सुपिंटेंडिंग इंजिनियर हैदराब देहून येथें येऊन हिंगोलीस गेले होते व तिकडून परत येउन येथील कामकाज त्यांनीं पाहिले व काल शिगावच्या तळ्याचें काम जाऊन पाहून हैदराबादेकडे परत गेले असें समजतें.

मि० फिट्स पात्रिक साहेब नवीन एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर अकोल्यास आले व ट्रेझरीआफिसरचें दिमती त्यांस दिलें.

पोलिस इन्स्पेक्टर रा० रा० मार्तंड पंढरिनाथ मोशींस गेले, रा० रा० रामजी शाळिग्राम वणीस गेले व मि० शहामहंमदखान खामगावास आले. व नवीन चीफ कानस्टेबल मि०इमामबेग हुसेनीबेग कारंजास आले.

रा० रा० रामचंद्र बाळकृष्ण चिपळे मुंबई इलाक्यांतील वकिल यांस वऱ्हाडांत काम करण्याची परवानगी मिळाली.

अकोल्याचे बाजार सेसचें लिलाव १७०० रूपयास रा०रा० बाबणलाल रामलाल साहू यानीं घेतलें.

लोकलफंडाकडील रा० रा० सदाशिव विष्णु भागवत ओव्हरसिंयर यांस त्यांचे अधिकारी म्युनिसीपालिटीकडे देत नाहींत यामुळें व सरकारी नोकरांनीं अलावन्स घेऊन दुसरें काम करूंनये असा ठराव हल्लीं कळून आल्यामुळें म्युनिसिपालिटीच्या सेक्रटरिचे जागीं गेल्या माहिन्यांत त्यांची नेमणूक झालेली या माहिन्याच्या कमिटींत रहित झाली व ३० रूपयांचे कान्सरव्हन्सी इन्स्पेक्टरें मि० च्यार्लस यांस ५० रूपये पगार करून म्युनिसिपाल इन्स्पेक्टर असा त्यांस हुद्दा दिला.

उमरावतीस प्रदर्शनाकरितां अठवडे बाजाराची जागा पसंत केलीं.

वर्तमानसार.

सोलापुरास ७०००० उंदीर धरले. धरून आणिलेले उंदीर विलक्षण प्रकारचे असतात, कित्येकांचा रंग हरणासारखा व कित्येकांचे शेपटास गोंडे असतात!

रा. ब. दाजी गोविंद गुप्ते नाशीकचे सबार्डिनेट जडज यांनीं पेनशनाचा अर्ज केला.

रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांनीं तारीख १ सप्तंबरपासून पेनशन घेण्याची तजवीज करावी असें ठरलें

नाशिकचे सबार्डिनेट कोर्टांतील टिकिटांचा गोंधळ रा० बा०रानडे यांनीं सरकारास कळाविला तो स्टेट सेक्रटरिचे कानांपर्यंत जाऊन त्यांना हिंदुस्थानांतील कोर्ट फीचे स्टांपाची व्यवस्था नापसंत वाटली. व त्यानीं मनांत आणिलें आहे की चिकटवण्याचे टिकिटापासून अशा लबाड्या होतात यावरून तीं टिकिटें बंद करून कोर्टफीचे स्टांप कागदच करावे, म्हणजे लबाड्या होणार नाहीत.

भावनगरचे राजे साहेबांनीं राजकोटा जवळ अजी नदीवर आपले खर्चानें पूल बांधिला. व त्याचें नाव केसरी हिंद पूल असें ठेविलें- याच राजे साहेबानीं राजकुमार कालेजाची इमारत बाढवण्यासाठीं एक लक्ष रूपये दिले आहेत.

निळगिरीचे लोकांचे मनांतून कुनूर घाटापर्यंत रेलवे करावी असें आहे. व त्याकरितां ते तजवीज करित आहेत. या रेलवेला १८,७०,००० रूपये खर्च येईल.

जान गास्पर नावाचे युरोपियनानें कोसिन तेलाचा दिवा फेकून मारल्याचे योगानें मि० स्वारिस साहेबाचें अंग जागोजाग जळलें व त्यांच्या मडमेचा प्राणघात झाला, याबद्दल गास्पर यावर मुकदमा चालू आहे.

मुंबई एथील उद्योग शाळेंत मातीचीं भांडीं करण्याचें काम शिकविण्याकरितां विलायतेहून कुंभार आणण्याचा सरकारानें ठराव केला आहे. चिनी कुंभार आणण्याचा पहिल्यानें सरकारचा बेत होता; परंतु चिनी कुंभाराच्यानें पाहिजे तितके हुशारीनें काम व्हावयाचें नाहीं असें वाटल्यावरून सरकारानें तो बेत फिरविला असें समजतें.

वासुदेव बळवंत याचे भावास पनवेल तालुक्यांत पकडून पुण्यास नेल्याचें कळतें.

आगष्ट, सप्टेंबर व आक्टोबर असे तीन महिने पर्यंत, माजिस्त्रेटानीं खटले सेशन कमिट केल्याबराबर जज्यांनीं. त्यांचा इनसाफ करीत जावा ह्मणून मुंबईचे हायकोर्टानें सरक्युलर केलें आहे.

पारिस शहरीं उंदरांचे कातड्याचा पुष्कळ उपयोग करतात व आतां देशांत उंदीर मारण्याचा झपाटा चालला आहे तेव्हां अशा वेळीं, एकादे व्यापारी कंपनीनें एथें उंदरांचीं कातडीं विकत घेऊन तीं युरोपांत पाठविलीं असतां मोठा फायदा होण्याचा समय आहे, असें कोणी वातमीदारानें मुंबईचे टाइम्स पत्रास पत्र पाठविलें आहे. हे उंदीर मारणारे वडार लोक तीनें रुपये शेंकड्याप्रमाणें उंदरांचीं कातडीं देण्यास तयार आहेत असें त्याणें लिहिलें आहे.

गोलास पत्रानें लिहिलें आहे कीं गेल्या जून महिन्यांत रशिआनें टीचिकिसलर येथून जें सैन्य रवाना केलें आहे तें तुर्कोमन्स लोकांवर रवाना केलें नसून हिरात घेण्याचा इंग्रज सरकारचा इरादा दिसल्यास मोठ्या महत्वाचे तजविजीसाठीं रवाना केलें आहे.

पोलिस आणि मुलकी खात्यांतील नौकर कोणकोणत्या जातीचे किती आहेत, आणि त्यांत नातलग किती आहेत यांचें एक लिष्ट सरकारानें मागविल्याचें कळतें.

संस्थान जंजिरा एथील अल्पवयी नबाब वयांत येतेंपर्यंत त्या संस्थानची व्यवस्था मुंबई सरकारचे हातांत आली. ने. ओ.

रा०रा० विठ्ठलनारायण फाटक एम ए यांस रत्नागिरीचे हायस्कुलावर हेडमास्तर नेमिलें पण रा०रा० वामन आवाजी मोडक येईत पर्यंत त्यांनीं सुरतेसच कामकरावें असा हुकूम झाला.

रा०रा०केशव बापुजी बाळ बी ए यांस धारवाड हायस्कुलावर नेनिलें व त्यांनीं तूंर्त हैदराबादेसच काम करावें ह्मणून हुकूम झाला.

व्हालंटियर पलटणी हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं मिळून लाहान मोठ्या २८ आहेत. व त्यांतून सात हजारांहून अधिक लोकांची भरती आहे. ईस्ट इंडिया रेलवे कंपनीचे लोक ९७७, जी आय पी कंपनीचे ९३३, पंजाब ६६७, मद्रास ६२०, मुंबई ४९६, कलकत्ता ३८३, रंगून ३६५, आग्रा ३५६, बंगलोर ३४५, पुणे १२४, बडोदा रेलवे १४९, रूरकी २८ इत्यादि.

पुणें जिल्ह्याचे पोलीस सुपरिंटेंडेंट मेजर ज्यानियल साहेब हे दक्षण हैदराबादेकडे प्रसिद्ध वासुदेव बळवंत फडके याचे साथीदारांस पकडून कैद करण्याकरितां गेले होते ते परत येऊन दाखल झाले.

बुधवार व विश्रामबाग वाड्यांस आग लावण्याचे बाबतींत बुकडेपोकीपर यास मदत दिल्याबद्दल वहिमावरून तीन इसम पकडल्याचें मागें आलीं लिहिलेंच होतें. सिटी माजिस्त्रेट मि० फ्लंकेट यांणीं चौकशी करून दोन इसमास पुरावा नसल्यामुळें सोडून दिलें, व एक डिपोकीपरचा भाचा बाळाजी नारायण फडके याजला पक्या चौकशीसाठीं सेशन कमिट केलें. होते त्यांत तेही सुटले.

धारवाड जिल्ह्यामध्यें उंदरांचा उपद्रव पुष्कळ झाला असोन तालुका हुबळी येथें १०००००, तालुका गदग येथें ५०००० नवलगुंद येथें ७५००० याप्रमाणें उंदीर मारण्यांत आले.

ब्रिटिश ब्रह्मदेशांत शाळा खात्याचें काम फारच वाईट रीतीनें चालतें असें खालीं लिहिलेल्या मजकुरावरून कळोन येतें. प्रोम जिल्ह्यांतील एका शाळेची तपासणी करण्यास्तव डेप्युटी कमिशनर साहेब नुक्तेच गेले असतां त्यांस असें कळून आलें कीं, सदर्हू शाळेंत दोन मास्तर व एक विद्यार्थी असोन मास्तर गैरहजर होते, व विद्यार्थी झोपीं गेला होता. पुढें ही शाळा बंद करण्या विषयीं अर्थातच कामिशनर साहेबानीं हुकूम केला.

सोलापूर येथील जाइंट सेशन जज्ज मि० पोलन यांणीं नुक्तेंच एका ठरावांत निनावी पत्राच्या संबंधानें आपला अभिप्राय दिला आहे. मि० पोलन साहेब यांचें असें ह्मणणें आहे कीं, निनावी पत्राकडे लक्ष पुरवून मोठ मोठाले सरकारचे अधिकारी चौकशी उघड रीतीनें सुरू करतात ही मोठी दुःखाची गोष्ट आहे; कारण अशा रीतीनें निनावी पत्रें लिहिणारांस विशेष उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. निनावी पत्राचा विच्यार सरकार मार्फत कधींही होणार नाहीं असें एक वेळ जर स्पष्ट रीतीनें जाहिर करण्यांत येईल तर अशा प्रकारचीं पत्रें लिहिणारे इसम फारच कमी होतील यांत संशय नाहीं. ज्ञा०

मुंबई एथील बगीवाले गाडी हांकणारांनीं विजार घातली पाहिजे असा कांहीं दिवसांपूर्वी त्यांस हुकूम झाला होता व त्याप्रमाणें आतां धोतर नेसलेला बगीवाला नजरेस पडत नाही. असा हुकूम होण्याचें कारण सभ्य स्त्रियांस व पुरुषांस बगींतून वारंवार जावें लागतें व बगीवाले आपलें धोतर नीट व्यवस्थेनें नेसत नाहींत असें आमचे ऐकिवांत होतें. आतां असें समजतें कीं सर्व बगीवाल्यांनीं विजार आंगावरील कपडा व टोपी काळे रंगाची वापरली पाहिजेव याप्रमाणें जो बगीवाला पोशाक करणार नाहीं त्यास बगी हांकण्याचा परवाना मिळणार नाहीं असा डेप्युटी पोलीस कमिशनर यांणीं हुकूम केल्याचें कळतें.

हिंदुस्थानची जमीन सुपीक असून धान्याची तूट कां पडते?

या पृथ्वीवर अनेक देश आहेत. त्या सर्वांमध्यें हिंदुस्थान देश हा केवळ पृथ्वीचा नमूना ह्मटलें तरी चालेल. हवा पाण्याचे संबंधानें पहातां, हा देश फारच चांगला आहे ह्मणजे ह्या एकाच देशांत शीत उष्ण आणि मध्यम असी तीन प्रकारची हवा असणारीं स्थानें असून अनेक प्रकारचें धान्य पिकतें. इतर देशांतलि जमीनीशी या देशांतील जमीनीची इतिहासावरून तुलना करून पहातां ही फार सुपीक आहे, असें दिसून येतें. अशी सुपीक जमीन हिंदुस्थानची असून धान्याची तूट कां पडते? असा प्रश्न निघतो. धान्याची तूट पडण्यास अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं आमचे पहाण्यांत व ऐकिवांत आहेत त्यांतून कांहीं थोडक्यांत आह्मी कळवितों, तीं येणेंप्रमाणें:—

पिका विषयीं विचार करून पाहिलें तर जमीनीची मेहनत शेतकऱ्यांकडून जशी व्हावी तशी होत नाहीं. यांचीं कारणें अनेक आहेत;. परंतु त्यांविषयीं थोडासा विचार केला तर असें दिसून येतें कीं, आमचा हिंदु धर्म कांहीं अंशीं नडतो. धर्म संबंधानें शेतकरी लोक फार नाडले जाऊन त्या कामीं त्यांचे पैशाचा व शरीराचा व्यय त्यांस निरर्थक करावा लागतो. हजारो लोक तीर्थयात्रा व वाऱ्या करण्यास लागले आहेत, कित्येकांस उपास तापास पडून व निकस अन्न खाऊन खाऊन त्यांचीं शरीरें इतकी निर्बल झालीं आहेत कीं त्यांस कोणत्याही कामीं तीं उपयोगांत आणतां येत नाहींत. तसेच सावकार लोकांच्या (भट मारवाड्याच्या) कचाट्यांत सांपडून रात्रंदिवस काळजींत असतात. इतक्यांतूनही टिकाव धरून राहिलेच तर शेतकीचे कामास लागणारीं, जनावरें मिळेनासीं झालीं आहेत. अलीकडे हिंदुस्थानांतील जनावरें इतर देशांतील लोक येऊन ते मारून खाण्याचे कामाकडे त्यांचा उपयोग करूं लागल्यामुळें फारच महाग झालीं आहेत. आह्मांस वाटतें कांहीं दिवसानीं या देशांत शेती पिकविण्याचे मेहनतीस बैल वगैरे जनावरें मिळेनासीं होतील. कदाचित मिळालीं तर पूर्वी पेक्षां दसपट किंमत द्यावी लागेल. व हल्लींच पांचपट किंमत द्यावी लागत आहे, ह्मणजे पन्नास वर्षांमागें ज्या बैलास दहा रुपये किंमत पडत असे त्यास हल्लीं पन्नास रुपये द्यावे लागतात हें सर्वांस माहितच आहे. अशा प्रकारें शेतकऱ्यांस जनावरें मिळण्याच्या अडचणी येऊन जमीनीची मेहेनत होण्यास अडथळा होत आहे.

दीनबंधु.

विकावयाचीं पुस्तकें.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. व तीं रोख पैशानें विकत मिळतील. बाहेर गावीं नेणारांस सुमार आठ आणे किंमतीचे आंतील पुस्तकांस एक आणा डाकहशील लागेल त्या सुमारानें पुढे एक रुपयास दोन आणे असें लागेल. व बरसातीचे दिवसांत मेणकापड लाविल्याशिवाय पोस्टांत बंगी घेत नाहींत. सबब आठ आण्योंच किमतीस सुमार अर्धा आणा मेणकापडाबद्दल पाठवावा लागेल.

कायद्या संबंधी	रु.
मुलकीखात्याचीं सर्क्युलरें	४
दिवाणी नवा कायदा	२४८
क्रिमिनल प्रोसिजर	१४१२
नादारीचे नियम (वऱ्हाडाकरितां)	४८
सेटलमेंट रूळ ,,	४६
दिवाणी सर्क्युलरें ,,	४६
पोलिसीची रूळ	४३
जाइंट रूळ	

संस्कृत.

अध्यात्म रामायण	४
प्रायश्चित्तेंदुशेखर	४१२
रजोदर्शनशांती	४६
धातुरूपावळी	४३
कोश-त्रिकांडशेष, मोदिनी, हारावली व एकाक्षरी (आडगिराइकी)	१
भगवत्गीता	४६
गोत्रमालिका	४४

प्राकृत

सर्व संग्रह वामन पंडित भाग	४१२
,, ,, ,, २	१२
मंत्ररामायण आर्या मोरोपंती	१४८
विराटपर्वनाटक	१३
बालविध नाटक	४६
रुक्मिणीहरण नाटक	१४८
हरिश्चद नाटक	१४८
भास्कर दामोदर कृत रत्नमाल ईश्वरस्तव	४६
सौभाग्यरत्न (पुनर्विवाहसंबंधी)	४३
विवेकासिंध	४१४
काव्यमाधुर्य (प्राकृत कवितांतील	४४
शिवराजलीला (केशवराव जोर कृत कविता)	४१२
गायनप्रकाश	४४
नलाख्यान आर्या मोरोपंती	४३
चतुश्लोकी भागवत	४६
आरत्या	४१
हरिपाठ	४१
भपाळ्या	४१४३
व्यंकटेशस्तोत्र	४१
चक्रव्यूह	४२
ध्रुवाख्यान	४१
धावे	४१
गणपतीचे श्लोक	४४३
रामनवमीप्रतमहात्म	४१
विष्णुसहस्रनामावली	४२
शिवसहस्रनामावली	४२

मनोरंजक

गोपीचंद नाटक हिंदुस्थानी	४१२
सिंव्हासनबत्तिशी ,,	कोपुर
फ्रेंच व जर्मन लढाई	४१४
वसंतमाला (कादंबरी)	४१२
इंग्रजांची बखर	४६
काशीयात्रा	४८
काशीप्रकाश	१
भ्रांतिकृतचमत्कार	४६
अनंतफंदीच्या लावण्या	४८
रामजोशाच्या लावण्या	४८
थोर पुरुषांचे व स्त्रियांचे पवाडे	१४८
बापुगोखल्यांचे चरित्र	१
व्यवहारोपयोगी तारतम्य	४२४६
हिंदुस्थानच्या दरिद्राचीं कारणें	४२

वैद्यक

वैद्यसुधाकर	१४४
महामारी	४६
कुटुंबमंत्री	४६
गजकरणाचें औषध (डबी)	४६

मुलांच्या उपयोगी.

तिसऱ्या बुकाच्या दुसऱ्या भागाचें भाषांतर	१
पहिले बुकाचें भाषांतर	४२
स्कूल डायलाग	४२
बालज्ञान	४१
अंकलिपी	४१
भूगोलविद्या	४१४६
बालव्याकरण	४४९
मोडी वाचन	४३
किंत मोडी मध्यम	४४६
मुलांकरितां पहिलें पुस्तक बालबोध	४१
वाचन विद्या	४१

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापुन प्रसिद्ध केलें.

वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० २४ माहे आगष्ट सन १८७९ इसवी. अंक

वऱ्हाडसमाचाराची किंमत.

	रु०
वर्षाचे अगाऊ	५
साल अखेर	७
किरकोळ अंकास	०४

डाक हाशील.

वर्षाचे अगाऊ	१०८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिशीबद्दल

मराठी, १० ओळीचे आंत	१
१० ओळी पुढें दर ओळीस	०१०६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०३
,, दुसरे खेपेस	०२

गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत मिसळून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ०६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून यारोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत. तारीख १० माहे आक्टोबर सन १८७८ इसवी.

कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ' स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस "पोष्टपेड" पत्रीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते
मुंबई काकडवाडी घर नंबर ८

जाहिरात.

सर्व लोकांस जाहीर केलें जातें कीं मि० बमनजी फिरोजशा एम. ए. एल. एल. एम. मुंबई हाय कोर्टांतील सालिसिटर व अटर्नी हे अकोलें एथें सुमार दोन महिने झाले, आले आहेत. हे आल्यापासून बरींचं कामें यांकडे येत आहेत. ज्यांजला फिर्यादी, अपिलें, व स्पेशियल अपिलें यांकडे देणें असतील किंवा हरएक कामासं बंधी सला मसलत घेणें असेल त्यांणीं त्यांशीं स्वतः अगर तुकाराम गणेश यास भेटावें, ह्मणजे त्यांचीं कामें घेतलीं जातील. प्रथमचे बोलण्याची अगर कागद पहाण्याची त्यांजपासून फी घेतली जाणार नाहीं. कामासंबंधी पैशाचा ठराव समक्ष केला जाईल. हे गृहस्थ अकोलें एथें तूर्त मि० के. कावुस एम. टाटा हेड क्लार्क आफ करन्सी आफिस सदर स्टेशन अकोलें यांचे बिऱ्हाडीं डिपुटी कमिशनर कचेरीनजीक रहात आहेत. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

सुईण.

किंवा प्रसूति आणि तत्संबंधी अनर्थकारक परिपाठ.

ह्या विषयावर गेल्या मे महिन्यांत मी मुंबईत व्याख्यान दिलें. त्यांत गर्भिण प्रसूत होण्याचा दिवस ठरविण्याचे नियम व बारा महिन्यांचीं बारा कोष्टकें, प्रसूतीस लागणारे पदार्थ, प्रसूतीचीं पूर्वसूचक चिन्हें, प्रसूतीच्या अवस्था, प्रसूत होण्याचा क्रम चालू असतां कांपरे, वांब, उमासें इत्यादि होणारे विकार, स्त्री प्रसूत झाल्यावर तिची व बाळकाची व्यवस्था इत्यादि विषयीं सांगून नंतर गर्भिण लवकर प्रसूत व्हावी ह्मणून अज्ञान लोकांचे तिची ओढा ताण करणें, भलते भलते औषधोपचार चालविणें, मंत्र तंत्र येाजणें, वार ओढणें, वगैरे अनर्थकारक प्रकारांचें वर्णन केलें आहे. हें व्याख्यान येत्या महिन्याच्या अखेरीस छापून प्रसिद्ध होईल, हें उत्कृष्ट ठशांनीं छापलें जाऊन यांचीं रायल षोडश पत्री सांच्यांचीं सुमार पन्नास पृष्ठें होतील. किंमत येत्या महिन्याच्या १५ व्या तारखेच्या आंत भरणारांस चार आणे पडेल बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपालहाशील व प्याकिंगबद्दल एक आणा जास्त पडेल. पत्रें तिकिटें लावून माझ्या नांवें मुंबईत अपर डेकन रोड घर नंबर २१ एथें किंवा "वऱ्हाडसमाचार" आफिसांत अकोल्यास पाठवावीं.

ता. १२ आगष्ट १८७९ इ० — मिसेस रेबेका सिमियन ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण.

NOTICE.

SPECIALLY PREPARED.

A KEY

To

LAMB'S TALES

SHAKSPEARE.

REDY FOR SALE ON THE 15th of August 1879.

VERY CHEAP.—10 as. in advance, 12 as. in arrears; postage Extra.

GREAT pains have been taken in making the book an easy book of reference, and the publisher hopes the publication will supply a long felt want. The Key contains all deficult words from the tales with equivalent words both in Marathi and English. All the dificult phrases have been fully explained in English. Dificult words have been traced and explained. Historical or other allusions are explained where necessary. Shades in the meanings of synonymous terms clearly brought out. An alphabetical index for words and phrases is given at the end. The numerous questions that form the apendix will specially enlighten the student as to the nature of examination questions. In fact no pains have been spared to make the Key useful to students for the subordinate Public serviee examination and teachers. Names of intending subscribers registered at the office of the Deccan Star. Subscription in advance to be paid before the end of this month.

THE PUBLISHER.

नोटिस.

नोटिस—बनाम परशराम शिवचंद मारवाडी रहाणार इंगोली यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचेकडे आमचे दुकानची खातेबाकी व दाळीचे विक्रीबद्दल अजमास ३०० रुपये निघत आहेत. ते रुपये अजून पाठविले नाहींत. याजकारितां या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येत आहे कीं, ही नोटिस पावल्यापासून चार दिवसांचे आंत रुपये चुकते पाठविल्यास नीट आहे. नाहीं तर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये घेतले जातील. व या नोटिशीचा खर्च तुमच्यावर पडेल. कळावें. तारीख २३ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

(सही) गोविंदराम गुरुप्रताप साहू
दुकान अकोलें दस्तुर
तनसुकराय.

पत्र

या सद[illegible] पत्रकर्त्याच्या मतास मि[illegible]सें समजूं नये.

[illegible]वार कर्ते यांसः—

वि. [illegible]ी लिहिलेल्या चार ओळी[illegible] पत्रीं जागा मिळेल अशी[illegible].

[illegible]राहून औरंगाबादेस नाण्या[illegible]तां वाटेनें पर्जन्यामुळें फार [illegible]गला वाटेनें बुलढाणें देऊ[illegible] लागलीं व इकडे बरेच दि[illegible]य पडत असल्यामुळें पिका[illegible]होत चालला आहे. श्रावणी[illegible]ऽ सारखी सात आठ दिव[illegible]दीं केली होती. मध्यें १। [illegible]घाडी दिली होती पण पु[illegible]क्रम सुरू आहे या पासून [illegible]ले आहेत. आतां पाऊस [illegible] नाहीं, कारण गतवर्षी [illegible]व आहे. महागाई बरीच [illegible]

[illegible]ळघाटास येतांनां देऊ[illegible]कीं एथें सडकरुदुस्ती [illegible]व तें फार अव्यवस्थित [illegible]आलें. सडकेवर कां[illegible]म टाकला आहे व त्या [illegible]वलाची इतकी समृद्धी [illegible]तडकेवरून जाण्यास [illegible]दाणेंही पाहिलें आहे [illegible]डकेवर तर चिखल [illegible]दाण्याहून देऊळघा[illegible] आहे ह्मणजे देऊ[illegible]ळघाटचे [illegible]जनावरें मरून [illegible]एक केराचा सरा[illegible]संरी बराच [illegible]होता त्या योगानें [illegible]फार घाण [illegible]अशा कारणांनें [illegible]एकाद्या रोग [illegible]चा संभव आहे. [illegible]एकंदरीच्या [illegible]या गावीं म्युनिसिप्यालिटी [illegible]हें मला समजले नाहीं [illegible]वाटलें कीं एथें म्यु[illegible]निसिप्यालिटी [illegible]असती तर इतकी घाण [illegible]तर या गावचे लोक[illegible]व जिल्ह्याचे स्वच्छतेकडे [illegible]लक्ष देऊन या गावसें आहे [illegible]ो व्यवस्था ठेवतील अ[illegible]सावी [illegible]त्रविस्ताराची माफी असावा ही विनंती.

मुक्काम [illegible]रीख १७ आगष्ट सन १८[illegible]

एक मुशाफर.

[illegible]गाष्टकं

[illegible] भाषा— स्रग्धरावृत्त.

[illegible]धिक् च मंत्रं धिग धननिसिकारी, धिक् छत्रं चामरं [illegible]दलं धिक् च डंका निशानं, [illegible]धिकारं बहु बल सहितं शास

नं गर्ववुक्तम्, हम् दर्दी भाइयो की नहि नहि जिनके मानुषी धर्म छीटा ॥ १ ॥ धिग् विद्या धिक् पढाई धिग बहु कथनं कुलीना भिमानं, आचारो धिक् उपाधिस्त्व धिग धिग तरा स्वप्रशंसापि तद्वत् । धिक् जाति धिंक् च पंक्ति धिंग धिग यजनं याजनं स्वार्थयुक्तं, हम् दर्दी भाइयो की नहि नहि जिनके मानुषी धर्म छीटा ॥ २ ॥ धिक् कंठी गोफही धिक् सुतिलक लालितं धिक् च माला विशाला, धिक् भुंभु ताल वाद्यं विविध रसमयं भोजनं स्वादुयुक्तं । धिग् धूर्ताचार ज्ञानं श्रु तिविधिरहितं मूर्खदानं प्रधानं, हम् दर्दी० ॥ ३ ॥ धिग् धोती धिक् अंगोछा धिग धिग असनी धिक् च शाला दुशाला, धिक् पगडी धिग् दुलाई धिग धिग गहना धिक् प्रतिष्ठा गरिष्ठा, धिक् कोठी धिक् खजाना धिग बहु इमला धिक् अटारी बगैचा, हम दर्दी० ॥ ४ ॥ धिक् ईशा शायरी धिक् धिग धिग कविता धिग् गजल धिग् रुबाई, धिग् मोहफिल् गुडगुडी धिक् धिग धिग मदिरा मांसमद्यं च नृत्यम् । धिग् वेश्यालम्पटत्वं धिग धिग कुहकं इश्क माशूक कर्म, हम दर्दी० ॥५॥ धिक् शेखी धिक् शराफत गर म गर धिक् धिक् लियाकत् फजीलत्, धिग धिग्ड नाजुक् मिजाजी अहमंधिकतरा धिक् अमीरी फकीरी, धिक् इज्जत धिक् हुकूमत धिग धिग पदवी धिंक् च कानून दानी, हम दर्दी० ॥ ६ ॥ धिग् गाडी धिक् च डाढी धिग धिग अरसा कोट पातलून जाकट्, धिक अमामा इबाचा धिक धिक शमला बूट टोपी दुनी धिक् । धिक् चाबूक धिक् च टेंडं धिग धिग कुवरी धिग् घडी धिक् छडी च, हम दर्दी० ॥ ७ ॥ धिक् पेन्सिल् जेब बुक् धिक् धिग धिग चिरुटं धिग् बरांडी च सोडा, धिक् बिस्कुट धिक च साबुन धिग धिग बरफं मेज खुर्सी च सीटी, धिग् आजादी च लेक्चर धिग चपल गति धिंक हथेली व जाना, हम दर्दी भाईयो की नहिं नहिं जिनके मानुषी धर्म छीटा ॥ ८ ॥ धिक्काराष्टक मिदंप्रोक्तं सर्वसिद्धि विधायकं । पठनाच्छ्रवणादस्य विमला जायेत मतिः कविवचनसुधा.

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध ७ शके १८०१

काबूलच्या अमीराचें सरकारासी प्रेम.

काबूलचे अमीर इंग्लिश सरकाराशीं तहनामा झाल्यापासून खरोखर इमानदारीनें व प्रेमानें वागत आहेत. ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. इंग्लिश सरकारचे जे रेसिडेंट काबुलास गेले आहेत. त्यांस आपले बरोबर हत्तीवर बसवून हमेशा ते शहरांत व बाहेर फिरावयास निघतात. उत्तम उत्तम वस्तूंचे त्यांस नजराणे पाठवितात. थोडे दिवसांपूर्वी अमिरांनीं रेसिडेंट साहेबांस ११ घोडे नजर पाठविले व सुंदर वस्त्रे, कातडीं, तशाच अफगाणीस्थानांत उत्पन्न होणाऱ्या विशेष वस्तु यांची तबकें भरून नजर पाठविली. रेसिडेंट साहेबास बरोबर घेऊन उत्तरभागाचा देश पहाण्यास ते निघणार आहेत तेव्हां हिरातेस व कंदाहारासही जातील. ते आपले बरोबर घोडेस्वार पलटणी १२, पायदळ पलटणी ३ व कांहीं तोफा असा सरंजाम नेणार आहेत.

परराष्ट्राशी आतां अमीर जें वर्तन करीत आहेत त्यांवरूनही त्यांचें इंग्लिश सरकारावरील प्रेम उघड होतें. रशियाकडून काबुलास जासूद आले होते ते परत गेले त्यांजबरोबर अमीरानें ताशकंदच्या गवर्नराला उत्तर पाठविलें त्यांत त्यानें लिहिलें आहे कीं आतां मी व माझें सर्व घराणें इंग्लिश सरकाराशीं प्रेम भावानें वागत आहे. सबब तुह्मासी आह्मी आतां कांहीं संबंध ठेवूं इच्छित नाहीं. व तुह्मी आह्मासी ठेवूं नये आणि तुह्मास जें काय करणें असेल तें खुशाल करावें.

अमीरानें आपल्या लश्करी खात्याची सुरळीत व्यवस्था चालविली आहे. खर्चाच्या एकंदर यादी केल्या आहेत व त्याबरहुकूम पगार वाटणी चालविली आहे. त्याच्या पायदळ पलटणी ४१ होत्या त्यांतील ३ हल्लीं कमी केल्या आहेत. त्यां शिवाय घोडेस्वाराच्या व तोफखान्याच्या मिळून १६ पलटणी आहेत. व ८ पलटणी इरेग्युलर आहेत व या सर्व सैन्यास सालीना खर्च १२११००० रुपये लागत आहे. फौजेचीही सुरळीत व्यवस्था तो इंग्लिश सरकारचे अनुमोदनानें करीत आहे.

इंग्लिश सरकारानें कंदाहार शहर अमीराचें स्वाधीन करून दिलें व तेथील आपला तळ उठविला.

सिविल सर्विसच्या जागा.

आज सुमारें पन्नास वर्षें पावेतो ज्या गोष्टीविषयीं आपण सतत प्रयत्न चालविला होता ती गोष्ट कशी तरी आज आपल्या हातास लागली असें ह्मणण्यास आतां कांहीं हरकत नाहीं. ती गोष्ट ही कीं आपल्या लोकांस सिविल सर्विसच्या जागा मिळणें. आमच्या वाचकांस माहित असेलच कीं एतद्देशीय लोकांस मोठाल्या जागा देण्याविषयीं आमचे सरकारानें अनेक वेळां वचनें दिलीं परंतु तीं आजपर्यंत सर्व निर्फलच होत गेलीं. शेवटीं आह्मास असेंही वाटूं लागलें होतें कीं एतद्देशीय लोकांस सिविल सर्विसच्या जागा मिळणें तर एकीकडेच राहिलें परंतु मामलेदारी सारख्या कमी दरजाचा जागा तरी आमचे लोकांस पचतात किंवा त्या जागेवरही पुढें विलायती पुरुष येऊन बसूं लागतात कोण जाणे.

परंतु ही काळजी आतां आमची अगदीं निरसन झाली. कारण स्टेट सेक्रेटरीचे मंजुरातीनें हिंदुस्थान सरकारानें आतां असा ठराव केला आहे कीं प्रतिवर्षी एतद्देशीय लोकां पैकीं कांहीं तरी उमेदवार सिविल सर्विसचे जागेवर नेमण्याचेच. तेव्हां आतां आपले एथील विद्वान लोकांस जिल्हा जडजाच्या कलेक्टराच्या, बेर्ड आफ रेव्हेन्यूचे सभांसदांच्या, रेव्हेन्यु-कमिशनराच्या, कस्टम वगैरे बरील कामिशनरांच्या, अशा मोठमोठाल्या हुद्याचे जागेपैकीं कांहीं तरी जागा दर वर्षास मिळतीलच यांत कांहीं संशय नाहीं.

ह्या जागा एतद्देशीय लोकांस देण्याविषयींचे नियम कोण कोणते झाले आहेत ते अद्याप बरोबर रीतीनें परिस्फूट झाले नाहींत. परंतु इतकें मात्र खरें आहे कीं, युरोपियन लोकांस त्या जागेवर जितका पगार मिळत आहे त्याचे दोन तृतीयांशा इतका पगार नेटिव कामगारास मिळण्याचा आहे. तसेच युरोपियन लोकांची जी दर वर्षास सिविल सर्विसचे जागेवर जी संख्या नेमिली जाते त्याचे सप्तमांशा इतके आपले लोक नेमिले जावयाचे; आणि ह्या जागा परीक्षेवर वगैरे अवलंबून नसोन ह्या जागेबद्दल लोकांची सरकार निवड करणार आहे.

आतां खरें पाहूं गेलें तर पगाराचे संबंधानें ह्या नियमामध्यें पुष्कळ उणीव आहे; परंतु सध्या आनंदाची गोष्ट इतकीच मानावयाची आहे कीं, आपल्या लोकांचा बराच पुढें शिरकाव झाला.

या सत्कृत्याबद्दल लार्ड लिटन साहेबांचे कोण बरे उपकार मानणार नाहीं? हिंदुस्थानचे संबंधानें इतर एकादे गोष्टी मध्यें आमचे लार्ड साहेबांची कशीही वागणूक असो परंतु या कामीं त्यानीं आमचे देशाचे संबंधानें निर्मल यश संपादन केलें. या योगें लार्ड साहेबानीं आमचे लोकांस केवळ सिविल सर्विसच्याच जागा दिल्या असें आह्मी समजत नाहीं तर आमचे लोकांस राज्यकारभारांत शिरकाव करून देण्याविषयीं हा एक मार्गच आह्मास खुला करून दिला असें आह्मी समजतों. आतां आह्मास अशी उमेद वाटत आहे कीं हिंदुस्थानचा राज्यकारकार चालविण्याचे कामांत जो आमचा रास्त हक्क आहे तो हें सरकार आह्मास कधींना कधीं तरी देईलच.

आह्मांस असें वाटतें कीं एतद्देशीय लोक राजनिष्ठ आणि कृतज्ञ किती आहेत हें दाखविण्याची जी ही आतां संधी आली आहे ती आमचे लोकांनीं दवडूं नये. पुण्याचे सार्वजनिक सभेसारख्या ज्या सर्वमान्य आणि जगाविख्यात सभा आहेत त्या सभांनीं विलायतेंतील स्टेट सेक्रेटरी साहेबांस व या कृत्याचे मूळ पुरस्कर्ते लार्ड लिटन साहेबांस मानपत्र पाठवून त्यांचा जयजयकार करावा.

एथपर्यंत सर्व हकीकत ठीकच झाली परंतु पुढें आपणास एक निराळाच त्रास उत्पन्न होणारा आहे त्या विषयींही आपणास एथें थोडा बहुत विचार करणें अवश्य आहे. खरचणाराचें खरचतें आणि कोठवळ्याचें पोट दुखतें या ह्मणीप्रमाणें मुंबई ग्या झेट पत्राचे जे पूर्ण निःसीम भक्त आहेत त्यांची अवस्था होणार आहे कारण कीं ह्या ठराबाचे योगानें युरोपियन लोक वारंवार नेटिवाचे हाताखालीं येण्याचा प्रसंग येणार आहे. ज्या लोकांस ते आज पावेतो कसपटा प्रमाणें मानीत होते व गुलामाप्रमाणें वर्तवीत होते तेच लोक जर ह्यापुढें त्यांच्या पूज्य स्थानीं येऊन बसूं लागले तर त्यांची अवस्था काय होईल व त्यांनां या गोष्टींचें वैषम्य किती वाटेल याचा विचार आमचे वाचकांनीं करावा. नेटिवांचे हाताखाली गौरवर्णाचा अभिमान बाळगणारे लोकांस रहावें लागलें ह्मणजे त्यांची कशी स्थिति होत असते याचा मासला जर कोणास पहाणें असेल तर इकडेच थोडा पहाण्यास सांपडणार आहे!

इतर जातीमध्यें एखाद्या व्यक्तीनें अपराध केला असतां तेवढी व्यक्तीच कायती दूषित ठरते परंतु हा नियम आपले जातीस सांप्रत लागूं नाहीं. एकानें अपराध केला कीं, त्यामुळें सर्व जातीस कलंक लागत आहे. एका ब्राह्मणानें चोरी केली कीं, सर्व ब्राह्मण चोर. एकानें राजद्रोह केला कीं सर्व राजद्रोही. सारांश सध्या आपला काळ अज्ञातवासांतील आहे तेव्हां नवीन होणारे होत कं तरूण उमेदवारांस व राजाचें इष्ट केल्यामुळें जे कोणी निवडले जातील त्यांस आमचें एवढेंच सांगणें आह कीं, कालमान पाहून त्यांनीं आपलें वर्तन ठेवावें आणि वृथाभिमान बाळगणारे युरोपियन लोकांसही आमची विनवणी आहे कीं आतां त्यांनीं तो आपला वृथभिमान सोडून द्यावा. राज्य कर्ते जर आतां नेटिवास आणि आपल्या लोकांस बराबरीचे लेखूं लागले तर आतां बाकीच्या सर्वांनीं गडबड सोडून उभयतांनींही प्रेमभावानें वागावें ह्मणजे उभयतांसही सौख्य होऊन राष्ट्रास मोठा फायदा होईल.

वासुदेव बळवंत फडके याची चौकशी आतां लवकरच सुरू होईल असें दिसतें. मेजर ड्यानियल साहेब मोगलाईंत जाऊन परत आले. व आतां त्यावर पुरावा तयार करण्याच्या कामांत गढून गेले आहेत. भिवा शिपायानें वासुदेवास मी धरिला व स्टेशनावर आणिल्यानंतर ड्यानियल साहेबास बोलाविलें अशी बातमी कल्पतरू पत्रांत प्रसिद्ध झालेली खोटी आहे असें इंग्लिश पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. प्रथमतः भिवास व दुसऱ्या एका वासुदेवाच्या आफिसांतील गृहस्थास गाणगापुराकडे शोधास पाठविलें होतें. व त्यांनीं शोध करून व त्यास ओळखून परत पुण्यास येऊन कळविलें व नंतर ड्यानियल साहेब त्यांस पुन्हा बरोबर घेऊन जाऊन वासुदेवास पकडून घेऊन आले असें ह्मणतात. पुण्यास आतां वासुदेवानें दाढी राखिली होती ती काढून त्याची एकंदर हजामत केली आहे असें ह्मणतात. व लोकवार्ता अशीही आहे कीं, खुनासहित दरोडा, अथवा राजद्रोह या च्यार्जाच्या संबंधानें त्यावर भरपूर पुरावा मिळत नसल्यामुळें साधारण दरवडेखोराप्रमाणेंच त्याची चौकशी होणार आहे.

नरसी केशवजी— मुंबईचे प्रसिद्ध गृहस्थ नरसी केशवजी काठेवाडांतून धरून आणिल्यापासून त्यांवर माजिस्त्रेटापुढें फौजदारी मुकद्दमा चालला होता व ते कैदेतून हमेशा कोर्टांत येत असत. शेवटीं त्यांवर हायकोर्टानें चौकशी करून शिक्षा देण्याजोगा मुकद्दमा आहे असें माजिस्त्रेटास वाटल्यावरून त्यानीं त्याला सेशन कमीट केलें. नरसीकडून मि० जील साहेब बारिस्टर होते त्यांनीं पुष्कळ आढे वेढे घेतले व शेवटपर्यंत जामिनावर कैदीस सोडण्याविषयीं अर्ज केले. परंतु कांहीं चालले नाहीं. जामिनाचे बाबतींत हायकोर्टास अर्ज झाला. व तेथें वाटाघाट होऊन ३,२१,००० रुपयांच्या रकमेचे वेगवेगळे नऊ इसम ज़ामीन कबूल करून आरोपीस

कैदेतून खुले केले. याप्रमाणें नरसी केशवाख्यान इतक्या मजलेवर आलें आहे. आतां पुढें काय होतें पहावें.

शिंदे सरकार— ग्वालेरचे शिंदे अलीजा बाहादर सडेस्वारीनें रामेश्वरास जाण्याकरितां निघणार आहेत असें मागें वर्तमान प्रसिद्ध झालें होतें. परंतु ते आपले राजधानी शहरापासून निघाले असून रामेश्वराकेड जाण्याची त्यांची त्वरा दिसत नाहीं. व ते माळवा प्रांतांतच फिरून आपला मुलुख पहाणार असें एका पत्रांत लिहिलें आहे. १२वे तारखेस ते इंदुरास आले. ७।८ दिवस तेथें होते. होळकर सरकारांनीं मोठ्या आनंदानें त्यांच्या भेटी घेतल्या, त्यांनां उतरावयास सुंदर जागा दिली, त्यांसाठीं दरबार केले. मेजवान्या दिल्या, पोशाग दिले. सोन्यारूप्याचे अलंकार घालून हत्ती घोडे सजविलेले दिले. व शहरांत महोत्सव करविला. होळकर सरकारचे बंधू श्री० काशीराव दादा साहेब यांनींही शिंदे सरकारास मेजवानी दिली. नंतर स्वारी उज्जयनीस गेली तिकडेही आठवडाभर मुक्काम होणार आहेत.

पुण्याच्या ज्ञानप्रकाशांत आह्मी वाचलें कीं पोस्टाकडे वर्तमानपत्रांची रजिस्टरें दोन आणे फी घेऊन करावीं असा ठराव झालेला आहे. आणि तेथील ज्ञानचक्षू पत्रांत लिहिलें आहे कीं या ठरावाचा अंमल पुण्यास अजून झाला नाहीं. ह्मणजे तेथे चार चार आणेच अजून घेत आहेत. अकोल्यास आह्मी शोध केला एथेंही दोन आणे फी घेण्या विषयीं अजून कांहीं लिहून आलें नाहीं. आह्मास वाटतें ज्ञानप्रकाशानें लिहिल्याप्रमाणें ठराव झाला असेल पण त्याची अंमल होण्याची ए कादि तारीख पुढील नेमलेली असेल. हा ठराव झाला असल्यास वर्तमानपत्रांत नोटिसा छापवून रजिस्टर करून पाठविणारास यापासून बराच फायदा होईल.

वऱ्हाड.

हवा या आठवड्यांत निर्मळ झाली नाहीं. मेघपटलांनीं बहुत वेळ आकाश झाकोळलेलें असतें. चांगले ऊन पडत नाहीं. व काल पासून झिमझिम पाउसाची पुन्हा सुरवात झाली आहे. हा रोगट असून त्रासकारक आहे. या वर्षी वऱ्हाडच्या पिकास कांहीं धक्का बसणार की काय समजत नाहीं. सारखा पाऊस फार लागला व उघाडीही पडावी तशी अजून पडत नाहीं परमेश्वरेच्छा!

या आठवड्यांत अकोल्यास एक पटाईत चोर धरला. हा जातीचा ब्राह्मण असून संभविता सारखा धंदा करणारा आहे. अकोल्यास जे लोक आले गेले असतील त्यांस नावावरूनही समजेल. त्रिंबक अनंत नातु या नावाचा हलवायाचे दुकान मांडणारा व स्टेशनावर भाड्याच्या गाड्या पाठविणारा हा गृहस्थ होय. यावर एथें यापूर्वी कधीं चोरीचा प्रसिद्ध आरोप आलेला नाहीं परंतु या वर्ष दोन वर्षांत शहरांत ज्या कित्येक चोऱ्या झाल्या त्यांत तो असावा असा कित्येकांस संशय होता. व पुण्यास चोरीचे मुकद्दम्यांत त्यास शिक्षा झालेली होती. आमचे बंधू उर्दूअकबार कर्ते लिहितात कीं ७ वर्षांची शिक्षा त्याला पुण्यास झाली होती. या गृहस्थानें गेले मंगळवारीं रात्रीं एथें एके आळींत तीन ठिकाणीं चोरीचे प्रयत्न केले. व शेवटले ठिकाणाहून दागिने वगैरेची पेटीही उपटून बाहेर काढिली होती पण त्याचे पापाचा घडा भरल्यामुळें तो दृष्टोत्पत्तीस येऊन त्याच रात्रीं पोलिसाकडून व गाववाल्याकडून धरला गेला. हा मनुष्य हिवातापानें आजारी असून पायास नारू झाल्यामुळें चालण्यास कमकुवत होता असें असतां च्यार पांच घरांच्या कित्येक भिंती वरून गर्द काळोखांत व पावसांतही हरणाप्रमाणें उडत होता. यावरून आह्मी त्यास पटाईत ह्मणतो व त्या रात्रीं बारा वाजल्यापासून त्याचे प्रयत्न चालू असल्यामुळें गडबड मोठी होऊन लोक जागे राहिले व तो एके भिंतीवर छपलेला दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें दहा वीस लोकांची त्यास धरण्याविषयीं खटपट झाली ह्मणूनच तो सापडला, नाहीं पेक्षां सापडला नसता असें आह्मास खचित वाटतें. अस्तु. यास असिस्टंट कमिशनर मि० एदलजी साहेबांनीं सहा महिने सक्त मजूरी कैद व ३० रूपये दंड अशी शिक्षा केली ही त्याचे कर्तबगारीस फारच थोडी झालीं. याहून त्यास अधिक शिक्षा खरोखर पाहिजे होती.

गावांतील कित्येक घरवाल्यांवर म्युनिसिपल इन्स्पेक्टर यानें घाणीबद्दल फौजदारी मुकद्दमे केले होते त्याविषयीं कमिटींत विचार होऊन ते चालवू नयेत असें ठरलें. घरवाल्यानें सफाई ठेविली नाहीं तर त्यास नोटिस द्यावी. व त्यानंतरही त्यानें दुरुस्ती केली नाहीं तर म्युनिसिप्यालिटीनें दुरुस्ती करून घरवाल्यापासून पैसा घ्यावा व तो न देईल तर तित क्या पुरता त्याचा जंगम माल जप्त करावा असें ठरलें. फिर्यादीपेक्षा ही तजवीज सौलतीची आहे व हीच प्रथम योजणें रास्त होतें मोठमोठाल्या प्रतिष्ठित लोकांवर नोकरांचे व गैरे कसुरीबद्दल असे क्षुल्लक बाबींत फौजदारी मुकद्दमे होऊन आणा, दोन आणे, चार आणें दंड होणें हें फार लांछनाचें काम आहे. सार्वजानिक जाग्यांत घाण केल्याबद्दलही या आठवड्यांत पुष्कळ मुकद्दमे झाले आहेत व लोकांस दंड झाले आहेत. वरिष्ठ सरकार सार्वजानिक पायखाने करा ह्मणत असतां ते केले नसून गोरगरिबास दंड होत आहेत या बद्दल आह्मास वाईट वाटतें. एका गवत विकणारास चार आणे दंड झाला तो देण्यास त्याजपाशीं गवत विक्रीचे पैसे पुरते नव्हते तेव्हां मि० एदलजी साहेब माजिस्त्रेट यानीं त्यास दंडाकरितां पदरचे पैसे दिले असें समजतें. गरीब बिचारा !

सरकारी कामदारास रेल्वेचे पहिले किंवा दुसरे क्लासांतून जाण्याचा खर्च मिळण्याचा हक्क असतां कोणी त्याहून हलक्या क्लासांतून जाऊन त्या क्लासाचा खर्च घेतात सबब तसें न व्हावें ह्मणून त्यांनीं अमुक क्लासांतून आह्मी गेलों असें सर्टिफिकेट बिलासोबत देत जावें ह्मणून ठराव झाला आहे.

दुसरे प्रसंगीं भत्याचा एक दिवस टरविणें तो मध्यान्ह रात्री पासून दुसरे मध्यान्ह रात्री परयंत समजावयाचा ठराव झाला आहे.

शिगावचे गुड्स क्लार्क बाबाजी यादव यानें रेल्वेचे १५३७ रूपयांचें अफरातफर केल्याचा मुकद्दमा डिपुटी कमिशनर साहेबांकडे चालू आहे.

बुलढाणें जिल्ह्यांतून इलाहीबक्ष नावाचा खुनी कैदी पळालेला पातुराजवळ एका देवी डाक्टरानें धरिला.

नवीन रेल्वे आक्ट झाला आहे त्या अन्वये वऱ्हाडांत जी रेल्वे आहे तिच्या संबंधानें इलाख्याच्या सरकारचा अधिकार हिंदुस्थान सरकारानें रेसिडेंट साहेबास दिला आहे. तसाच सिकंदराबादचाही दिला आहे.

मि० यादअल्ली तहसीलदार यांनीं पेनशन घेतलें त्या वर्गाविर्गीत रा०रा० वामनराव नारायण चांदूरचे थर्डक्लास तहसीलदार यांस सेकंडक्लास केले हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. मनुष्याच्याहुशारीवरच त्याला बढती मिळावी असें सर्वकाल होतअसतें तर वामनरावांनां या मागेंच आह्मी फर्स्ट क्लास तहसीलदारही पाहिलें असतें.

रंपा एथील बंड मोडण्याकरितां निजाम सरकारची फौज पाठवावी असा विचार चालू असल्याचें एका पत्रांत लिहिलें आहे.

मेजर मेकंजी साहेबाचे रजेंत ले० क० मेंजीस साहेबें आफीशियेटींग सेकंड क्लास व क्या० रोनिक साहेब आफिसि० थर्ड क्लास डिपुटीकमीशनर केलें व मि० हेरसाहेब सेकंडक्लासचे आफि० फर्स्ट क्लास असिस्टंट कमीशनर केलें.

मुंबई सरकारानें स्टांपाचे बाबदींत २ प्रश्न केले तेः—

१ सन १८७९चा आक्ट १ कलम ५१ अन्वयें बिघडलिले स्टांप या शब्दांत वठविलेला स्टांप कागद मात्र येतो किंवा चिकटणारे स्टांप आणि स्टांपाच्या चकत्याही येतात?

२ सन १८६९च्या १८व्या आक्टाप्रमाणें ज्या दस्तैवजाला स्टांपाच्या चकत्या लाविलेल्या आहेत व नवीन स्टांप आक्टानें त्या निरर्थक झाल्या आहेत तर त्यांस ५२वें कलम लागू होईल किंवा नाहीं ?

हिंदुस्थान सरकारानें याचा खुलासा केला कीं, स्टांपाच्या चकत्या या स्टांप कागदाप्रमाणें समजाव्या व सर्व प्रकारच्या स्टांपाला ५२वें व ५४वें कलम लागू आहे परंतु चिकटणारे स्टांपाचे किमतीचे प्रसंगीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे.

चांडोळास सब रेजिस्ट्रारचें आफीस होतें तें बंद केलें व त्या हद्दींतील गांव बुलढाणें आणि चिखली या दोन भागास वाटून दिले.

नऱ्हाडांत खाली लिहिलेले तहशिलदारास रेसिडेंट साहेबानीं बुकसर्क्युलर नंबर ३४ बरहुकूम तहसीलदारीचे पूर्ण मुलकी अधिकार दिले.

रा. रा. गोविंदराजअय्या
रा. रा. वामन नारायण.
रा. रा. देवराव जयकृष्ण
मि० दोराबजी कावसजी
रा. रा. भास्कर महेश्वर
मि० आर्देसर दिनसाजी
,, अबदुल बारी
रा. रा. गोविंदराव यशवंतराव
,, ,, त्रिंबकराव यशवंतराव
,, ,, हणमंतराव रामचंद्र
,, ,, अंबादास संतो
मि० मुबारक अल्ली.

मि० टी रंगराव उमरावतिचे अड्याची यांस थर्ड ग्रेड सिविल जडज व थर्ड क्लास मा जिस्त्रेटचे अधिकार साऱ्या वऱ्हाडांत दिले.

मि० सफदरअली अलीबेग बाळापुरचे तहशिलदार यांस वऱ्हाडांत सेकंड क्लास माजिस्त्रेटचा व क्रि० प्रो० कलम २५ अ यांतील चौथ्या रकमेशिवायचा अधिकार दिला.

बुक सर्क्युलर नंबर ३४ बर हुकूम रेसिडेंट साहेबानीं असिस्टंट कमिशनरचे मुलकी पूर्णाधिकार खालीं लिहिलेल्या गृहस्थांस दिले आहेतः—

दस्तुर बहिमनजी जामासजी सी. आय. ई.
मि० एच एस निकोलेट्स.
क्या० एच डी पी रेनिक.
मि० ए एलियट.
मेजर आर एस थामसन.
मि० ए जे डनलप.
मि० ई जे किट्स.
मि० आर डी हेर
मि० सी ए डब्ल्यु डेवीस
मि० बापुजी रंगनाथ.
मि० पुरुषोत्तम नारायण
मि० श्रीकृष्ण नरहर
मि० आत्माराम भिकाजी
मि० रामराव गोविंद
मि० केशव महिपत

मि० टालबट हामिलटन असिस्टंट सुपरिंटेंडिंग इंजिनियर यांस ३ आठवड्यांची हक्काची रजा मिळाली.

मे० डब्ल्यु० बी. जोन्स साहेब कमिशनर यानीं पूर्वीचे जमाबंदीचे नमुने बदलून नवीन दुसरे चांगले नमुने तयार केले आहेत. हल्लीं या नमुन्याच्या प्रति सर्व जिल्ह्यास पाठविल्या आहेत व त्याबरहुकूम काम करण्यास सोयीचें आहे किंवा नाहीं व वहिवाटीच्या संबंधानें त्यांत कांहीं फेरफार करणें जरूर आहे कीं काय या बद्दलचे सर्व डे० कमिशनर्स कडून रिपोर्ट मागविले आहेत असें समजतें. सर्व प्रांतांतील कामाच्या वहिवाटीची माहिती करून घेऊन हे नवीन नमुने यानीं मोठ्या परिश्रमानें तयार केले आहेत. या नमुन्याच्या योगानें जमाबंदीची सर्व कामें थोड्यांत चांगल्या रितीनें होऊन कामांत कोणत्याही रितीची भानगड होणार नाहीं असें ह्मणतात. मे० जोन्स साहेब हे मेहनती व मुलकी कामाचे उत्तम जाते असल्या मुळें वऱ्हाडांत आल्यापासून यानीं मुलकी कामांत पुष्कळ फेरफार करून चांगल्या सुधारणा केल्या आहेत.

हल्लीं नागपुरास असलेली कालिदास कृत नाटककार मंडळी लवकरच उमरावती येथें येणार आहे असें कळतें. प्र. सि.

वर्तमानसार.

मनुष्य संख्या — हिंदुस्थानांत इंग्लिश सरकारच्या राज्यांत ज्या शहरांतून पन्नास हजारांहून अधिक लोकसंख्या आहे अशीं ४४ शहरें आहेत त्यांतील कांहीं कांहींची माहिती:—

कलकत्ता ८,९२,४२९, मुंबई ६,४४,४०५ मद्रास ३,९७,५५२, लखनौ २,८४,७७९ काशी १,७५,१८८ पट्टण १,५८,९०० दिल्ली १,५४,४१७ आग्रा १,४९,००८ प्रयाग १,४३,६९३ बंगलोर १,४७,५१३ अमृतसर २,३५,८१३ कानपुर १२७७०० पुणें १,१८,८८६ अमदाबाद १,१६८७३ सुरत १,०७,१४९ बरेली १०,२,९८२ लाहोर ९८,९२४ व रंगून ९८,७४५.

इंडियन असोसिएशनच्या संबंधानें विलायतेस गेलेले बाबू लाल मोहन घोस यांचे वक्तृत्वाविषयीं विलायतेतील लोक स्तुति करीत आहेत.

मुंबई शहरांत एका वर्षांत १,४०,००० रुपयांचें बर्फ खपतें.

खानदेशांत यंदा फारच उत्तम पिकें आल्याचें कळतें, पाऊस मात्र असाच शेवटपर्यंत पुरवल्या पाहिजे.

सरजीरो एथें भयंकर आग लागून एक हजार घरांचा नाश झाला, व दहा हजार माणसें घरें जळालीं म्हणून निराश्रित झालीं आहेत.

विनाद एथील सोन्याच्या खाणी ज्यांची सांप्रत व भावी स्थितीच्या संबंधानें हिंदुस्थान सरकारास माहिती करून देण्याकरितां मि. ब्रूह स्माइथ नावाचे गृहस्थ हल्लीं सिमला एथें गेले आहेत. ह्या गृहस्थांचा असा अभिप्राय आहे कीं विनाद एथील सोन्याच्या खाणीची स्थिति विलक्षण उत्तेजन येण्यासारखी आहे. ज्या खाणींत नदींतील गाळ एका ठिकाणीं जमल्यानें तयार झालें आहे त्या खाणींत पुष्कळ सोनें सांपडून विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं, शिवाय या खाणींतील पुष्कळ सोनें पूर्वीच काढलें गेलें आहे. परंतु निळगिरी पर्वताचे समुद्राकडील उतारावर सोन्याची माती फारच विपुलतेनें सांपडते. फार तर काय, आस्त्रेलिया बेटांत ज्या खाणीपासून विलक्षण किफायत झाली त्या खाणींतही वर लिहिलेल्या खाणीप्रमाणें सोन्याची माती विपुलतेनें व अल्पायासानें सांपडली नाहीं असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

हिंदुस्थान सरकारचा गेल्या वर्षाचा छापण्याचा खर्च २३६०००० रु० चा झाला होता व या वर्षाचा छापण्योच खर्चाचा अजमास २७०००० रुपयांचा झाला आहे.

ज्ञा. प्र.

रंपा बंडखोरांचा पाठलाग करण्याचे कामागिरीवर मेजर डानियल साहेबांची योजना करावी म्हणून मद्रासचे गव्हरनर साहेबांस मुंबईचे गव्हरनर साहेबानीं शिफारस केल्याचें डेकन हेरल्ड पत्रकर्त्याचे समजण्यांत आलें आहे.

खानबहादुर दस्तुर नसरवानजी जामासजी हे मंगळवारी रात्रौ सोलापुरांस तेथील नवीन आग्यारीच्या पवित्र समारंभा करितां गेले, त्यावेळीं त्यांस पोचविण्याकरितां पुष्कळ पार्शी गृहस्थ स्टेशनावर गेले होते.

रंपा बंडाचा बंदोबस्त लावण्या करितां मद्रासचे गव्हरनर स्वतः तिकडेस जाण्यास तयार झाले आहेत परंतु असें धाडस करूं नये म्हणून कित्येक लोक सुचवित असल्याचें समजतें.

ज्या ठिकाणीं ब्राह्मण फौदार आहे त्या ठिकाणीं इतर जातीचा व ज्या ठिकाणीं इतर जातीचा फौजदार आहे त्या ठिकाणीं ब्राह्मण, या प्रमाणें प्रत्येक फौजदार कचेरींत एक एक लिहिणारा कारकून नेमण्याचा ठराव झाल्याचें समजतें. म०मि०

मद्रासेंतील रंपा लुटारूची एक टोळी पकडली गेली तरी ते अद्याप आवरत नाहीं त. ज्या गांवांतील लोक विरुद्ध वर्तन करितात त्यांस ते कापून काढितात. कोटापल्ली येथें शिरावाचून कित्येक धडें सांपडलीं असें म्हणतात. ओराटल व गोपापुरा येथून अनुक्रमें लुटारू लोकांनीं तीस व दहा हजारांचीं लूट नेली. सरकारची दौड त्यांच्या मागें आहेच तेणें करून लुटारू लोकांचा लौकरच नाश होईल असें दिसते.

देहगांवचा एक पार्शी मेलेला जीवंत होउन वैराग्याचे वेशानें मुंबईस आला आहे. तो असें सांगतो कीं मी घणदेवी येथें तापाच्या आजारानें मयत झालों, जातवाल्यानीं मला स्मशानांतील विहिरीचे कोनाड्यांत बसविलें व उत्तर क्रिया करून चालते झाले. अर्ध्यातासानें पुन्हा मीं जीवंत झालों. व वाटसरांच्या मदतीनें मी बाहेर पडलों तो घरीं न जातां या वेशानें भटकत फिरत आहे. मुंबईतील जातवाल्यानीं त्याचे आप्तवर्गास ओळखण्याकरितां बोलाविलें आहे असें म्हणतात.

ब्रह्मदेशांत उद्भवलेला बंडावा मोडण्याकरितां थिबा राजानें १९०० लोक पाठविले होते परंतु बंडवाल्यानीं त्यांचा पराभव करून ३०० लोक ठार मारल्याचें वर्तमान आलें आहे.

रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे यांस मानपत्र.

रा० बा० केरोपंत छत्रे यांणीं जागेचा राजिनामा देऊन चार्ज सोडल्याच्या संबंधानें मागील एका अंकांत आम्हीं थोडासा मजकूर लिहिला होता. चार्ज सोडतेवेळीं राव बाहदुरांस मानपत्र देण्याचा हेतु त्यांच्या विद्यार्थ्यांनीं दर्शविला होता, त्याप्रमाणें तारीख २१ जुलई सोमवारीं मानपत्र देण्याचा समारंभ झाला. त्यासंबंधें आम्ही आज चार ओळी लिहितों.

समारंभास मेसर्स पील, चाटफील्ड, आक्षेनहाम, रा. बा. नारायण भाई दांडेकर व रा०बा०शंकर पांडुरंग पंडित वगैरे मंडळी असून शिष्यवर्ग वगैरे मिळून सुमारें २०० मंडळी जमली होती. कालेजचे नवे प्रिन्सिपाल यांणीं सभेस सुरवात केल्यावर मानपत्र वाचलें. नंतर केरोपंतास उद्देशून कांहीं संस्कृत कविता एकानें झटल्यावर त्यांचा मुद्दाम काढलेला एक फोटोग्राफ व एक सुंदर पेटी त्यांस अर्पण केली; नंतर प्रोफेसर छत्रे यांणीं मानपत्राचें समर्पक उत्तर दिलें. पुढें शाळाखात्याचे मुख्याधिकारी या नात्यानें मे० चाटफील्ड साहेब यांणीं रावबाहदुरांच्या गुणांची वगैरे तारीफ केली. पुढें अत्तर, गुलाब होऊन मि० आक्षेनहाम यांच्या सूचनेवरून तीन वेळां जयघोष झाल्यावर सभा आटपली.

खऱ्या गुरुशिष्यांमध्यें जो पूज्यपूजक भाव व जें प्रेम असतें तें अवर्णनीय होय. तशांत जो खेडेगावांतला सामान्य पंतोजी नव्हे, तर ज्याच्या साक्षांत शिष्यांपैकीं "कोणी असिस्टंट इंजिनियर आहेत, कोणी सबा डिनेट जज्ज आहेत. कोणी डेपुटी ऐं. इस्पेक्टर आहेत आणि निरनिराळ्या खात्यांत ह्या हून लहान परंतु महत्वाच्या अधिकारावर तर कितीएक आहेत" इतकेंच नाहीं तर हल्लींच्या मराठी शाळांतील सर्व विद्यार्थी परंपरेनें ज्याचे शिष्य आहेत, व गुरू या नात्यास अनेक गुणांनीं खरोखर योग्य अशा केरोपंता सारख्या गुरूंच्या वियोगकालीं त्यांच्या सच्छिष्यांस तज्जन्य दुःख किती होईल हें सांगणें नको. मानपत्र व त्यास दिलेलें उत्तर हीं वाचून खरोखर गहिंवर आल्यावांचून राहत नाहीं. विद्यार्थ्यांचे शिक्षकावर उत्तम प्रेम जडण्यास त्याच्या आंगीं विद्वत्ता, शिक्षणाची उत्तम पद्धति, आपलें कर्तव्य बजाविण्याविषयीं व विद्यार्थीकृत शंका निरसनाविषयीं उत्सुकता, उल्हास व निरालस्य, शिष्याच्या कल्याणाची इच्छा, मनमिळाऊपणा इत्यादि गुण असावे लागतात. हे सर्व पूर्णपणें केरोपंताच्या अंगीं वसत होते असें आम्हांस वाटतें. ह्यांतील कांहींविषयीं केरोपंतांस उद्देशून मानपत्रांत विद्यार्थी म्हणतात. "जेव्हां ज्ञान संपादनाचीं साधनें व सोई आतां प्रमाणें नव्हत्या, पुस्तकें व पद्धतवार शिक्षणक्रम नव्हता तेव्हां अत्यास्था व उत्साह ह्यांच्याच केवळ साह्यानें आपण सांप्रतची योग्यता मिळविली. केवळ स्वावलंबनानें मनुष्य आपली योग्यता किती वाढावितो ह्याचें आपण एक उत्तम उदाहरण आहां. सृष्टपदार्थ शास्त्रावर आपले फार महत्वाचे परिश्रम आहेत. परंतु विशेषतः ते त्याची एक शाखा जें जोतिःशास्त्र त्याच्या अभिवृद्धीस कारण झाले आहेत. न्यूटन, केप्लर किंवा कोपार्निकस ह्याचा मार्ग पुढें चालविण्यास ह्या देशांत आपली योजना झाली आहे असें म्हणणें अत्युक्तीचें नाहीं. बारा वर्षांनीं इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी ह्या देशांतील मोठमोठ्या जोतिष्यांनीं आपली स्तुति केली आहे. तसेंच "इंग्लंडांत जसें रायल आस्ट्रानमर (राजकीय ज्योतिषी) तसें महाराष्ट्रांत केरोपंत" असें एका विद्याखात्यांतील मोठ्या अधिकाऱ्यानें आपल्याविषयीं मोठ्या संतोषानें झटलें आहे. "आपल्या आवडत्या विषयाखेरीज इतर विविध विषयांच्या ज्ञानाचाही आपल्या हृदयांत संग्रह आहे." एकादा लहान मुलगा एखादें क्षुल्लक उदाहरण विचारण्यास आपल्या पार्शी येवो किंवा ज्योतिष शास्त्राचा एकादा सिद्धांत विचारण्यास एखादा गणिती येवो सर्वांचा आपलेकडे सहज प्रवेश होत असे. मनमिळाऊपणा तर आपल्यामध्यें पूर्ण भरला आहे. आम्हांमध्यें मिसळण्यास, आमच्याशीं बोलण्यास आपल्यास अगदीं शंका वाटत नसे व एकाद्या गोष्टीविषयीं सल्ला विचारला असतां आम्हांस उपदेश करण्यास आपण कधीं अनमान केलें नाहीं. आपल्या वर्तनाच्या योगानें आपल्या ठिकाणीं आमची पितृवत् पूज्यबुद्धी उत्पन्न झाली होती. आमच्या कल्याणाविषयीं आपण फार काळजी घेत असा. आपल्यासारख्या मोठ्या मनुष्याशीं मोकळेपणें बोलतां येतें. याबद्दल आम्हांस अद्वितीय आनंद व भूषण वाटत असे. केरोपंतांची लोकप्रियता, साधेपणा, सभ्यता, निगर्वीपणा वगैरे विषयीं मानपत्रकार म्हणतात "आठ वर्षांच्या मुलापासून ऐशी वर्षांच्या वृद्ध मनुष्यापर्यंत तसेंच अति जुन्या समजुतीच्या लोकांपासून तो नव्या सुधारलेल्या लोकांपर्यंत सर्वांस आपण सारखे पूज्य आहां. साधेपणा, शांतता लोकांचा आवड अशा प्रकारचे अनेक गुण आपल्याप्रमाणें एकाच मनुष्यामध्यें क्वचितच सांपडतात. आपला असा मोकळा व साधा स्वभाव असे. तथापि आपल्याविषयीं आमच्या मनामध्यें पूर्ण पूज्यबुद्धी उत्पन्न होत असे. विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, विद्वत्ता असली म्हणजे बहुधा मनुष्यास गर्व असतो. परंतु गर्वाचा वास आपल्या ठायीं मुळींच नाहीं. आपली ख्याति व्हावी म्हणून आपला कधींही प्रयत्न नसे.

स्थलसंकोचास्तव सर्व मानपत्राचा सारांश आमच्यानें देववत नाहीं. तथापि त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी वर दिल्या आहेत व त्याच प्रमाणें आमचें मत आहे. सार्वजनिक हिताच्या कामामध्येंही केरोपंत हे मागें नव्हते, हें आम्ही मागील एका अंकांत लिहिलेंच आहे. केरोपंतास मुंबईच्या बंधशाळेंत प्रथम जागा मिळाली, हें ज्योतिःशास्त्राकडे त्यांचे लक्ष जाण्यास विशेषतः कारण झालें असें आम्हांस वाटतें. मनुष्याच्या अंगीं बुद्धी वगैरे अनेक गुण असले तथापि ते प्रसंगानुसार व कारणानुसार उदय पावतात. राव बहादुरांच्या जागीं नेमण्यास नेटिवांमध्यें कोणी मिळाला नसता असें नाहीं व सध्यांच्या हिंदुस्थानच्या दरिद्रावस्थेत सरकारच्या नुकत्याच झालेल्या ठरावाप्रमाणें आणि इळाखात्याच्या अधिकाऱ्यांच्या शिफारसीवरून पाहिलें असतांही नेटिवांसच नेमणें योग्य होतें असें आम्हीं मागील अंकांत लिहिलेंच आहे.

केरोपंताची मराठी शिक्षणास उपयोगी अशीं प्रसिद्ध पुस्तकें अंकगणित व पदार्थ विज्ञान हीं दोन आहेत. यांत सुधारण्यास जागा नाहीं असें नाहीं, तथापि सदर दोन पुस्तकांपासून त्यांत विशेषतः पहिल्या पुस्तकापासून मराठी शिक्षणास पुष्कळ मदत झाली व होत आहे. परंतु प्रोफेसरांचा आवडता विषय ज्योतिःशास्त्र यांत त्यांणीं आजपर्यंत फार परिश्रम केले आहेत. तथापि मराठी भाषा जाणणाऱ्यांस त्या शास्त्रासंबंधे कांहीं पद्धतवार माहितीचें साधन किंवा एखादा विस्तृत ग्रंथ त्यांणीं लिहिलेला आमच्या आढळांत नाहीं, परंतु लवकरच एक ग्रंथ प्रसिद्ध होईल, असें मानपत्रांत लिहिलें आहे. हे आज सुमार १५ वर्षांपासून पंचांग करीत असतात; तथापि एवढ्यानें त्यांच्या ज्योतिष शास्त्राचे ज्ञानाचा लोकांस व्हावा तसा उपयोग झाला असें म्हणतां येत नाहीं. तर आपल्या प्राचीन ज्योतिष ग्रंथाचें खंडन मंडन करून त्यांतील ग्राह्याग्राह्य विचार कोणते हें सकारण दाखवून, ज्यावरून स्वतंत्रपणें ज्योतिःशास्त्राची चांगली माहिती होईल असा एखादा ग्रंथ मराठींत प्रोफेसरांनीं करावा. अशी आमची त्यांस शिफारस आहे.

ने. ओ.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० ३१ माहे आगष्ट सन १८७९ इसवी. अंक ३४

वऱ्हाडसमाचाराची किंमत.

	रु०
वर्षाचे अगाऊ	५
साळ अखेर	७
किरकोळ अंकास	०४
डाक हाशील.	
वर्षाचे अगाऊ	१०८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिसाबद्दल

मराठी, १० ओळीचे आंत	१
१० ओळी पुढें दर ओळीस	०१०६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०३
,, दुसरे खेपेस	०२

नोटिस.

बनाम भिवराज मारवाडी दलाल वस्ती ताजनापेठ अकोलें जिल्हे मजकूर यास अशी नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे सांगळूद दुकानचे गहूं दर खंडी रुपये ३५ प्रमाणे खंडी ३४०७ चोवीस खंडी सात मण तारिख २ माहे जून सन १८७९ इसवी रोजीं सांगळूद एथें अंबारावर मोजून घेतले. त्याची किंमत १९८२॥। पैकीं तुह्मी वसूल दिले ते १४९० वजा जातां बाकी १३२॥। तुह्माकडून येणें असून अद्यापपावेतों दिले नाहींत. विनाकारण तकार सांगता. पेवांत जसा माल निघेल तसा सर्व मोजून घेऊ. याप्रमाणें तुह्मी कबूल करून गहूं मोजून घेतले आहेत. तेव्हां तुमची कोणतेही प्रकारची तकार निरर्थक आहे. करितां हल्लीं या नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत सदर्हू रुपये १३२८१२ व या नोटिशीस झालेला खर्च असे आमचे कडेस हजर करावे. न केल्यास रीतीप्रमाणें तुह्मावर योग्य कोर्टांत दावा करून सबदा झालेले तारखेपासून दर महा दर शेकडा दोन रुपयेप्रमाणें व्याजासुद्धां व कोर्टखर्चासुद्धां रकम भरून घेतली जाईल. कळावें. तारीख २५ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

Shapoorjee V. Kalafasee
दि० मु० नंबर ५/७२ कोर्ट डिपुटी कमिशनर, यांतील पक्षकाराचे इस्टेटीचे वहिवाटदार हुजूर नाजर जिल्हे अकोलें.

नोटिस

रा. नथाजी वल्द जानुजी, श्रावण वल्द जानुजी व नारायण वल्द जानुजी टाले पाटील रहाणार दाढी वगैरे देहात मोकदम मौजे पेढी प्रगणें भातकुली तालुके उमरावती जिल्हे मजकूर यास नोटिस देणार विठ्ठल त्रिंबक रहाणार खोडद प्रगणे भातकुली तालुके मूर्तिजापुर जिल्हे मजकूर सुरु सन १२८९ फसली कारणें तुह्मास नोटिसीनें कळविण्यांत येते कीं तुमचा माल जवारी, कपासी व गहू सन १२८७ सालांत अंदाजा रुपये ७२५ सवा सातशेचा माल घेऊन गणेश यशवंत वकील उमरावतीकर यांचे एथें तुह्मापैकीं नामे श्रावण वल्द जानुजी याचे हातानें भाड्याचीं खाचरें करून माल रवाना केला तसेच गणेश यशवंत वकील यास बाकी मागत असतां त्यानीं दिली नसून कांहीं तुमचे आमचे बोलणें कराराचे झालें असून सबब त्यांनी दिली नाहीं कराराप्रमाणें मिळावे तर गणेश यशवंत वकील व आह्मी व तुह्मी असे त्रिवर्ग एके ठिकाणीं होऊन बाकीचा करार गणेश यशवंत हे एक महिन्याचे पेऱ्यांत देऊ असे बोलले तसेच आह्मी खोडद एथें निघोन आलो आमचे मागें कपट करून गणेश यशवंत वकील याजपासून तुमचा भाऊ नामे श्रावण वल्द जानुजी यानें दस्तैवज सवा सातशाचा लिहून आणून आह्मास न कळवितां तुह्मी आपले जातीनें येऊन आमचे मागें तगादा लाविला कीं गणेश यशवंत वकील आह्मास दस्तैवज देत नाहींत व बाकीही देत नाहींत तुह्मी बाकी द्या किंवा दस्तैवज द्या त्यास आह्मी तुह्मास बोल्लो कीं गणेश यशवंत वकील याजकडून बाकीची आदाई होईल ती गोष्ट तुह्मी मानली नसून तुमचा जागल्या नामे यासिनखा याचे मार्फतीनें पांच रुपयांचा स्टांप आमचे नावाचा वेा लावून किस्तबंदीचा दस्तैवज रकमेस सवाई लावून चार सालचा राजश्री रामजी पाटील मुकदम मौजे दाढी व लक्ष्मणजी पाटील कानफोडिकर यांचे समक्ष घेऊन व यादव कृष्ण उर्फ भाऊ पंतोजी याचे हातानें लिहून त्याजवर सदरील उभयतां पाटलाच्या साक्षी आहेत तुमचे आमचे देणें घेणें गोष्टी वगैरे नोटिसीचे तारखेपावेतो मौजे बपोरी व मौजे सोनरी व मौजे खोडद व मौजे दाढी वगैरे देहात पेढी सुद्धा लोकांस माहीतच आहे. असें तुह्मी करण्याचें नसून तें केलें. एके रकमेचे दोन दस्तैवज झाले हे न्यायाधिशापुढें आल्यास न्यायाच्या सात तुमचा विचार कसा होईल याजकरितां किस्तबंदीचा दस्तैवज रद्द समजावा कारण तुह्मी मौजे दाढी एथें रहात होते त्या वेळेस तुमचे मनांत कपट बिलकूल नसे. हल्लीं मौजे पेढी एथें सन १२८५ व सन १२८६ फसली अवल खीस लावून गाव आबाद करावा असी उमेद बाळगून तसे न करितां पारधी लोक अबाद करून व त्यांची संगती धरून गैरचालीची वर्तणूक चालवून काम करीत आहा येणेंप्रमाणें सरकारी माल पजाव्याचा विटाचा असून सडकेकडील व रेलवेकडील व तहशिलदार साहेब किंवा बीन वारसी माल असलेल्या रिपोर्ट वगैरे कोणेही सरदारास न कळवितां तुह्मी आपले नवीन मकान मौजे मजकुरी केलें त्याजला लावून नाहींसा केला व राहिलेला माल नगदीनें विकून तो पैसा तुह्मी आपले उपयोगी लावला हा कलीजा तुमचा किती मोठा आहे तुह्मी शरफ आपले ठिकाणीं मोगलाई समजून आहा बिलकूल आपले मनांत विचार करीत नाहीं इंग्रजी राज्यांत अशी कामें केल्यानें नुकसान होईल. अशी तुह्मी आपले मनांत पक्की खात्री ठेवावी, कीं ही गोष्ट पचन झाल्यामुळें आणखी गरीब गुरिबास ताप देणें सुरु केलें तें येणेप्रमाणें. भाऊराव माऱ्हाठी याजपासून लग्नाबद्दल ७ रुपये पांडु भट याचे मार्फतीनें लांच घेतला आहे व जानु न्हावी खोडदकर याचा बैल मागून नेलात व त्यास न देतां पचविण्याच्या गोष्टी सांगतां व लुंगाजी कडू याजला रुपये ३५ सास हिसा विकलेला लुगाजी गाजऱ्या इंचिकर याजपैकीं शेताचा नोंदलेला हिसा तुह्मी आपले नावा पैकीं आठ आण्याचा वजा जातां चार आणे आपले जातीचा हिसा देऊन त्याजकडून नांगर वगैरे मेहनत करून त्या गरिबास हल्लीं काढून दिले व राघोजी बखाले याचे नावे एक शेत असून त्याचे दोन नंबर पाडले त वऱ्या नावांत तुह्मी त्याजपासून एक नांगराचा हिस्सा विकत घेऊन बाकीचा पोटबिरादर केला. मधापुरीकर माळी काढून दिले. आणखीही पारधी लोकांस तुह्मी साह्य असल्यामुळें आणखी लोकांचा पुकारा आहे ज्या ज्या लोकांचे नुकसान तुह्मी केलें ते लोक न्यायाधिशा समोर जाऊन अर्ज देणार आहेत तुमचा आमचा स्नेह असल्यामुळें नोटिसीनें कळवितो कीं झालेल्या गोष्टी न्यायाधिशा समोर उघडकीस आल्यास तुमची नालायकी दिसून येणार आहे. करितां आमचा किस्तबंदीचा दस्तैवज रद्द समजून जवळ ठेवावा. कळावें ता. २४ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

(सही) विठल त्रिंबक
दस्तुर खुद्द.

नोटिस.

संभाजी वल्द रामाजी भगत रहाणार पारसी तालुके बाळापुर यांस घासीखा वल्द मदारखा रहाणार पारस याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची तारीख २७ माहे जुलै सन १८७९ इसवीची नोटिस माझे नावाची मजला पोहोंचली तुमचे रुपये १९ एकुणवीस तुह्मास देऊन गहाण ठेविलेलें शेत सर्वे नंबर २७ एकर गुंठे १३८८ आकार रुपये ८ चे सोडवून घेण्या करितां १९ रुपये घेऊन आलो असतां तुह्मी रुपये घेऊन माझे गहाण ठेविलेले शेत सोडून द्या असे च्यार लोकां समक्ष तुह्मास झटले असतां तुह्मी रुपये घेतले नाहींत. सबब तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास ही नोटिस पावल्यावर च्यार दिवसांचे आंत तुमचे गहाणाचे १९ रुपये घेऊन माझें गहाण खत परत द्यावें. नाहीं तर मी तुमच्यावर दिवाणी कोर्टांत गहाण शेत सोडविल्याबद्दल दावा करून या नोटिशीचे खर्चासह कोर्ट खर्च भरून घेईन कळावें. तारीख २६ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

(सही) घासिखा वल्द मदारखा
मुसलमान रहाणार पारस
तालुके बाळापुर निशाणी खुद्द.

पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मताप्रमाणें असतो असें नाहीं. त्यास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपला माझा चांगला परिचय नाहीं, तथापि चार ओळी आपले सेवेस सादर केल्या आहेत तर आपले पत्रीं यांस जागा द्याल ही अशा आहे.

रेलवे चांदूर तालुक्यापैकीं कसबे कुऱ्हा हा गांव मोगलाईंत फार प्रसिद्ध होता. एथील जमीदार मोठे वजनदार होते. यांचे वसिले हैदराबादेपावेतों होते असें लोक सांगतात. एथें रजपूत लोकांची वस्ती एकतृतीयांश आहे. हे लोक मोगलाई अमलांत मोठे कडवे होऊन गेले. हल्लीं त्यांचे वंशज कोणी शेतकी, कोणी मोलमजुरी करून आपला चरितार्थ चालवितात.

पूर्वी जशी शूरत्वाबद्दल या गावची ख्याति होती तशी राहिली नाहीं. खरेंच आहे. ज्यास तरवार बाळगण्याचा कधींच प्रसंग नाहीं त्यास संग्रामांत नेऊन काय फायदा? कोणतीही गोष्ट तोंडानें सहज बोलतां येते तीच हातानें करूं लागल्यास फारच कठीण जाते.

एक वर्षापासून या गावांत मध्यभागी गढी आहे तींत हमेशा वाघीण येत असते. मागील साली दिवसा हिनें पोलिस स्टेशनचे पश्चिमेस बाळा किल्ल्यांत आपलें ठाणें दिलें होतें, परंतु हिंमतदार लोकांकडून तिचें तें ठाणें हालविलें गेलें नाहीं, तमासगीर पांच शांवर जमले पण कोणाकडून कांहीं झालें नाहीं पुढें तिनें आपले इच्छेनुरूप गमन केलें. महाराणीस आड कोण येतो? असें होतां करितां तिचे किल्ल्यांत घर वसलें. व शेवटीं किल्ल्याची ती नायब बनली, अखेर संसारी होऊन बत्तासह वर्तमान आनंदानें दिवस घालवूं लागलें. ही गोष्ट कोणास माहीत नव्हती. किल्ल्याचे पूर्वेस गढींत पोलिस स्टेशन व उत्तरेकडे लागून शाळागृहें आहेत. वाघिणीचें आगमन रात्रीं नऊ दहाचे सुमारास वरील दोनी इमारती समोर होत असें, परंतु तिनें कोणास त्रास दिला नाहीं. पुढें ता. १४ आगष्ट रोजी रात्रीं आपले पिलांसह क्रीडा करण्यास निघाली असतां दुसरें अगर काय कारण झालें असावें तें समजत नाहीं. दुसरे दिवशीं किल्ल्याचे दक्षिणेकडील बाजूस तिचें पिलू ३०।३५ हात उंच सफेलीवरून खालीं पडलें तें कांहीं अंशीं मरणोन्मुख होऊन पडलेलें लोकांनीं पाहिलें. पोलिस स्टेशनांत बदीं पोंचली पण विचाऱ्याचा तावडतोब प्राणहरण झाला. रात्रीं वाघीण आपल्या दुसऱ्या मुलांसह येऊन धडकली. व स्टेशनांत शिरणार तोंच कान्स्टेबल लोकांचा हल्ला झाला. तेव्हां बाईनें तेथून पलायन करून स्टेशनला लागून कान्स्टेबलचे रहातें घरांत चीफ मार्गील दिवालीनें जाऊन पिलांसह रात्रीं वस्ती केली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं कांहीं कामानिमित्त कान्स्टेबल आंत गेला तों आंतून गुरगुरणें

ऐकूं आलें. तेव्हां त्यानें बाहेर येऊन जमादारास बर्दी दिली. मग पांच कान्स्टेबल व जमादार आंत शिरले पण हिंमत कोणाची होणार! आपआपला जो तो हुशारींत. अखेर ती वाघीण कानस्टेबलाचे दोहीं पायांतून गेली आणि स्टेशना समोर गवतांत लपली. तें पोलिसास समजतांच बंदुका, तरवारी आल्या, ती तेथून पलायन करून पुनः घरांत पिलान जीक गेली. गांवात धांदल उडाली, थव्याचे थवे मौज पहाण्यास मिळाले; परंतु कोणाची हिंमत होऊन आंत जाऊन तिला मारवेंलें नाहीं. हजार लोकांसमक्ष घरांतून निघून दिवाल कुदून ती रानांत शिरली. पिलू मात्र आंत राहिलें तें धरण्यास हिंमत कोणाची होईना, कित्येकांचे हातचें शस्त्र गळालें; मुखेंदु उतरले, पुढें चीफ कान्स्टेबल रात्री गिरदावा रीहून परत आल्यावर त्यांनां ही बातमी समजली. त्यानीं तिचा शोध करविला परंतु कोठें मिळेना. हे आपले वऱ्हाडांतील प्रसिद्ध इन्स्पेक्टर रा. रा. विठ्ठल बळवंत यांचे भाचे असून मोठे हिंमतदार आहेत. यांणीं मेलेलें व जिवंत अशीं तीं दोन्ही पिलें रात्रौ स्टेशनासमूर बांधून आपण पहारा करीत बसले. आंत शिरल्यावर एक दोन ठिकाणीं जखमा लागल्यामुळें अगर माणसांचे भीतीमुळें वाघीण तीन दिवस गांवांत आली नाहीं; परंतु चीफ कान्स्टेबल यांस तिचीच चंद्री लागली. अन्न गोड लागेना, काम करण्यास मन घेईना. खरेंच शूरांचें हेंच काम. तिसरे दिवशीं अस्तमानीं पत्ता मिळतांच तत्क्षणीं जंगलांत एकटे जाऊन मोठ्या मेहनतीनें ती वाघीण त्यांनीं मारली व लोकांची भीति नाहींशी केली. या दोन दिवसांत स्टेशनचे रस्त्यानें जाणें येणें बंद झालें होतें. फार तर काय परंतु चीफ कान्स्टेबलचे घरांतसुद्धां लोकांची जाण्यास हिंमत होईना. मोठी मेहनत घेऊन वाघिणीचा जीव घेतला. तेव्हां त्यांनां बरें वाटलें. आमचे ब्राह्मण लोकांत असे शूर फार लोक आढळणें कठीण आहे. हे हरएक कामांत असेच दक्ष आहेत यांची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. हे तरुण चांगले समजदार, हुशार असून लोकप्रिय आहेत यांचा सहवास या प्रगण्यास फार सुखावह आहे. परमेश्वर यांस फार दिवस याच ठिकाणीं ठेवो ही प्रार्थना आहे. कळावें. तारीख २५ माहे आगष्ट १८७९ इसवी.

एक ग्रामस्थ.

वऱ्हाडसमाचार

भिति भाद्रपद शुद्ध १५ शके १८०१

रा. ब. गोपाळराव हरी देशमुख.

ठाणें जिल्ह्यांत नाशकास राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख जाइंट जडज आहेत हें आमच्या वाचकांस ठाऊक आहेच. ने टिवांत जाइंट जडजाची जागा आजपर्यंत या एकाच गृहस्थास मिळाली. व सिविल सर्व्हिसच्या सनदी जागेंत विलायतेस जाऊन सदन न घेऊन येतां असिस्टंट जडजाची जागा यांस च मिळाली होती. यांचें घराणें पेशवाईपासून नामांकित असून हे इंग्रजी अमल झाल्यावर लहान होते तेव्हां वयांत येऊन नोकरी धरीतपर्यंत यांस सरकारांतून कांहीं नेमणूकही मिळत होती व वयांत येतांच यांस नोकरी मिळाली व ती वाढत वाढत जाइंट जडजाच्या महत्वाच्या जागेपर्यंत आली असे हे नामांकित असतां उद्यापासून यांचा सरकारी नोकरीचा संबंध सुटणार हें ऐकून आह्मांस वाईट वाटतें.

रा. ब. गोपाळरावजी यांचीं कामें अलीकडे हायकोर्टाच्या जडजांस आवडनातशीं झालीं व त्यांच्या फैसल्यावर फार अपिलें होऊं लागलीं ह्मणून त्यांनीं मुंबई सरकारास कळविलें व त्यावरून त्यानीं यांनां पेनशनांत काढावें अशा विषयीं हिंदुस्थान सरकारास लिहिलें. ही गोष्ट राव बहादुरांस कळल्यावर त्यांनीं आपल्या कामाचें स्वरूप इतर कित्येक जडजापेक्षां वाईट नाहीं किंबहुना कांहींकां पेक्षां चांगलें आहे अशाविषयीं सरकारी लेखांचा पुरावा मिळवून असें आपणास जुलमानें पेनशन घेणें भाग न पाडावें ह्मणून मुंबई सरकाराकडे अर्ज केला व त्याची दाद लागली नाहीं असें पाहून त्याच अर्जाची नक्कल हिंदुस्थान सरकारास पाठविली. तिचा त्यांकडे विचार होऊन हिंदुस्थान सरकाराकडून असा ठराव झाला कीं गोपाळरावजीस मुंबई सरकारानें पेनशन घेण्यास भाग पाडूं नये. त्यांची खुशी असेल तेथपर्यंत त्यांस काम करूं द्यावें. त्यावरून आजपर्यंत ते काम करीत आहेत व मुंबई सरकार स्वस्थ बसलें आहे. हल्लीं लोकांत अशी वार्ता निघाली आहे कीं मुंबई सरकारचा तो विचार हिंदुस्थान सरकारास मानवला नाहीं तेव्हां त्यांचें वय ५५ वर्षांचें झालें आहे सबब ते सरकारी नोकरीस निरुपयोगी आहेत अतएव त्यांनीं पेनशन घ्यावें असें त्यांस सांगून त्यांकडून राजीनामा घेतला पण आह्मांस समजलें आहे कीं ती गोष्ट खोटी आहे. मुंबई सरकारानें वयाची सबब काढून गोपाळरावजीकडून राजीनामा घेतला नाहीं, तर हिंदुस्थान सरकराकडून मुंबई सरकारचे इच्छेविरुद्ध ठराव झाला, व आपणास मुंबई सरकारचे हाता खालीं काम करावयाचें तेव्हां असा नेटाचा प्रकार चालविण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं, व आपलें वयही आतां बरेंच झालें आहे आणि नोकरी पुष्कळ वर्षे झालीं आहे या गोष्टी मनांत आणून त्यानीं आपण होऊन राजीनामा दिला व उद्या ह्मणजे ता. १ सप्तंबर पासून घरीं बसण्याची त्यानीं परवानगी मागितली व त्या प्रमाणें मिळाली असें समजतें.

रा. ब. गोपाळराव यांच्या एकंदर नोकरीविषयीं ज्ञानप्रकाशांत लिहिलें आहे तें असें

प्रथमतः पुण्याचे एजंट मि. वार्डन यांचे आफिसांत ७७ रुपयांची क्लार्काची जागा यांनीं पत्करली. त्यानंतर हे तितक्याच पगारावर तेथेंच ट्रान्सलेटर होते. नंतर ९६ रु० वर तेथेंच हेड क्लार्क होऊन नंतर १३० रु० वर एजंटाचे शिरस्तेदार झाले. पुढें त्यांची शिफारस होऊन यांस वाईस २०० रु० वर फर्स्ट क्लास मुनसफ नेमिलें. त्यावर २७५ रु० पगारानें साताऱ्यास अक्टिंग सदरअमीन होऊन पुनः वाईस पूर्वीच्या जागेवर आले. त्यानंतर १८५१ त भत्यासुद्धां ३०० रु० वर मि० कूपर यांचे हाताखालीं सब असि० इनाम कमिशनर, उत्तर भाग, या जाग्यावर त्याची नेमणूक झाली. पुढें साताऱ्यास अलिअनेशन डिपार्टमेन्टमध्यें ६११ रु० वर कांहीं दिवस रा० ब० ची नेमणूक झाली. परंतु पुढें तें खातें अगदीं मोडल्यामुळें रा० ब० स कांहीं दिवस घरीं बसावें लागलें. पुढें त्यांस मुंबई हायकोर्टांत अक्टिंग सेकंड असिस्टंट रोजिस्ट्रारची जागा मिळाली व लागलेच पुढें सन १८६२ त अमदाबादेस असि० जज्जाची जागा मिळाली. तेथून १० माहिन्यांनीं त्याच अधिकारावर त्यांची नगरास बदली झाली. तेथें २ वर्षें राहिल्यावर रा० ब० देशमुखांची अमदाबादेस स्मालकाज कोर्टाचे जज्जाच्या जाग्यावर नेमणूक झाली, त्यावर मध्यें साताऱ्यास अमदाबादच्या जागेचाच पगार (१००० रु०) मिळून प्रिन्सिपाल सदरअमीनच्या जागेवर व तेथून मुंबई स्मालकाज कोर्टाचे तिसरे जज्ज याप्रमाणें नेमणुका झाल्या. त्यानंतर कांहीं दिवस पुनः ठाण्यास प्रिन्सिपाल सदरअमीन नेमून १८६६ त पुनः रा० ब० हे अमदाबादेस स्मालकाज कोर्टाचे कायम जज्ज झाले. ह्याप्रमाणें तेथें सुमारें १० वर्षें पर्यंत रा० ब० राहून त्याणीं पूर्वी प्रमाणेंच सरकारची नेहेमी वाहवाच ह्मणून घेतली. आणि शेवटीं सन १८७७ सालीं रा० ब० चीं नाशिक एथे जा० ज० चे जाग्यावर नेमणूक झाली. ह्या जागेचा मूळ पगार १८०० रु० आहे, परंतु काळ्या गोऱ्याचे भेदाभेदानें काळ्यास शेंकडा २५ रु० प्रमाणें ४५० रु० कमी करून रा० ब०स १३५० रु० पगार मिळत होता. ही जागा रा० ब० कडे आणखी ५—४ वर्षें राहील असें आह्मास वाटून मोठी आशा होती, परंतु ती हा० को०च्या दुराग्रहानें व चमत्कारिक न्यायानें व्यर्थ झाली!

खरोखर असा किंतु उत्पन्न होऊन गोपाळरावजी नोकरी सोडीत आहेत हें आमच्या लोकांचें दुर्भाग्य होय. ठिकठिकाणीं न्याय खात्यांत व इनाम कमिटींतही त्यांनीं उत्तम काम केलें असतां व तें सरकारांस मानवलें असतां आतांच हाय कोर्टास असें वाटावें ही दुःखाची गोष्ट होय. गोपाळरावजी सरकारच्या उपयोगी बहुत पडले आहेत. व बडोद्याचे श्रीमंत मल्हारराव गायकवाड राज्यभ्रष्ट होण्याचे यशाचा थोडा बहुत वाटा यांजकडे आहे व त्या अरितां सरकारानें यांस जाइंट जडजाची नोकरी, व यांच्या दोघा चिरंजीवास गायकवाडींत मोठाल्या नोकऱ्या दिल्या आहेत असें ज्ञा० प्र० कर्ते ह्मणतात. या पदविभूषणास सदरीं लिहिलेलें कारण होतें हें आह्मांस ठाऊक नाहीं. व तसें असेल तर रा. ब. चें हें कृत्य कशा प्रकारचें आहे याची परीक्षा लोक करोत. मराठी राज्ये चांगल्या धर्तीवर चालत नाहींत, राजे महा मूर्ख असतात, त्यांनां योग्य मंत्री नसतात, त्यांचे राज्यांत अव्यवस्था व गोंधळ फार असतो, त्यांचे पैशाची विनाकारण नासाडी व त्यांची अपकीर्ति होते याजबद्दल हमेशा ते बोलत असत व तसें न व्हावें असा उपदेश करीत असत. ह्मणून त्यांचें तें करणें देशाच्या व राजांच्या हितार्थ व शिक्षणार्थ होतें असें आह्मी समजत होतो व अजून समजतों.

रा. ब. गोपाळरावजी लोकसुधारणे साठींही बहुत श्रम, उद्योग व खर्च करीत असतात. हमेशा सभांतून व्याख्यानें देणें व ग्रंथ छापविणें ही त्यांची टांकशाळा अलीकडे मोठे वेगानें चालू आहे. त्यांनीं २०।२५ ग्रंथ केले आहेत. त्यांत कांहीं ५००,७००, १२०० पृष्ठांचेही आहेत. व कांहीं लहान लहान चोपड्या आहेत. तरी या कामीं त्यांनां हजारो रुपये खर्च आलेला आहे व हा फक्त लोकोपयोगार्थ होय. नावासाठीं ते विशेष झटतात असें दिसत नाहीं. कारण त्यांच्या एकही पुस्तकावर त्यांनीं आपलें नाव घातलेलें नाहीं. व लिहिण्याचा त्यांचा उद्योग सुमार ४० वर्षें सतत चालू आहे व त्यांत बराच भाग उपयुक्त व लोकांनीं उपदेश घेण्या सारखा आहे सबब अशा देशहितार्थ झटणाऱ्या पुरुषांनीं सरकारी नोकरी सोडिली व त्यामुळें त्यांच्या पगाराचें बरेंच मोठें नुकसान झालें हें पाहून आह्मांस पुनश्च वाईट वाटतें. तरी सरकारी नोकरी ह्मणजे रेटेल तेथपर्यंत करावीच असा कांहीं तींत पुण्यांश नाहीं. रा. ब. चीं बहुत वर्षें नोकरी झाली, पुष्कळ द्रव्यसंग्रह झाला. कित्येक चिरंजीव सुपुत्र निघाले व आतां वृध्दापकाळ झाला सबब ते मोकळे झाले हें फार चांगलें झालें. आतां त्यांनीं परोपकारार्थ जो आपला वेळ आणि पैसा खर्चावयाचा तो यथेच्छ खर्चावा आणि देहाचें सार्थक यांतच आहे असें त्यांस वाटतें त्याप्रमाणें त्यांनीं करून घ्यावें नइतर लोकांस नमुना दाखवावा.

नेटिव संस्थानिक.

हिंदुस्थानांत नेटिव संस्थानिक जे आहेत त्यांतून कित्येकांविषयीं माहिती टाइम्स पत्रांत दिली आहे त्यांतून थोडी आह्मी एथें घेतो.

राज्य.	लोक संख्या.	क्षेत्रफळ.	वसूल रुपये.	तोफा.	घोडेस्वार.	पायदळ.
१ निजाम	१,०६,६६,८००	९८०००	२,००,००,०००	३२५	८२०२	३६८९०
२ शिंदे	२५,००,०००	३११९९	१,२०,००,०००	२१०	५०५८	१६०६०
३ गायकवाड	१७,१०,४००	४३९९	१,१५,००,०००	३०	३०९८	११०००
४ होळकर	५,७६,०००	८०००	४०,००,०००	२८	४०००	५५००
५ काश्मीर	१५,०००००	८६०००	८२,३२,०००	९२	१३९३	२८३३६
६ म्हैसूर	५०,५५,३१२	२७०७७	२,०२,०९,७२३	३५		१००००
७ जयपुर	१२,००,०००	१५०००	४७,५०,०००		३५३०	२०५००
८ भपाळ	६,६३,६५५	८२००	२६,००,०००		११२८	३७६६

हिंदुस्थानांतील गोष्टींची विलायतेंत चर्चा.

हिंदुस्थानांतील लोकांस सिविल सर्व्हिसचे हक्क बरोबर मिळत नाहींत, व कित्येक दुसरीं गाऱ्हाणीं आहेत तीं विलायत सरकारच्या व तेथील लोकांच्या कानावर घालण्याकरितां कलकत्यांतील सार्वजनिक सभेनें मि० लालमोहन घोस बाबू यांस विलायतेस पाठविलें आहे. त्यांणीं तेथें गेले महिन्यांत हिंदुस्थानांतील रयतेस सरकार कोणत्या प्रकारें वागविते याविषयीं मोठें मनोवेधक भाषण केलें तें ऐकण्यास 'हिंदुस्थानांतील कित्येक इंग्लिश कामगार, पार्लमेंट सभेंतील सुमार २९ मेंबर व ४ पीर ह्मणजे बडे लोक होते. बाबूच्या भाषणाचा ठसा सर्व श्रोते मंडळाचे अंतःकरणावर फार नामी बठला. व त्यांची तिकडे मोठी कीर्ति झाली. विलायतेंतील वर्तमानपत्रांतूनही बाबु लालमोहन घोस यांचे इंग्लिश भाषेची, उत्तम वक्तृत्वाची आणि विद्वत्तेची पुष्कळ वाखाणणी झाली आहे. या भाषणाचे प्रसंगीं राइट आनरबल जान ब्राइट साहेब पार्लमेंट सभेंतील मेंबर हे अध्यक्ष होते. त्यानीं शेवटास जें भाषण केलें त्यांत बाबूच्या विचारांचें मंडण करून हिदुस्थान सरकारास फार टपका दिला. व याबद्दल इंग्लिश वर्तमानपत्रांतून इकडे मोठी चर्चा चालली असून ते ब्राइट साहेबास दोष लवीत आहेत. या गोष्टी इंग्लिश वर्तमानपत्रें वाचणारांस समजल्या असतील. व आमच्या सारख्या मराठी पत्रांतून त्यांचें इतकें दिग्दर्शन च पुरें आहे. कारण मुंबईच्या टाइम्स पत्रांत लिहिलें आहे कीं, असें भाषण हिंदुस्थानांत जर झालें असतें तर बंड होण्याचा संभव होता तेव्हां असले कडक उद्गारास आह्मांस स्थळ देतां येत नाहीं हें उघड आहे. तरी आह्मी आशा करितों कीं आमचे लोक थेट विलायतेस जाऊन गाऱ्हाणीं गाऊं लागले आहेत व तीं पार्लमेंठ सभेच्या मेंबरास श्राव्य वाटतात एवढेंच नव्हे तर ते त्यांचें मंडन करितात तेव्हां बेभाश्याच्या व नेटिव लोकांच्या दुखाच्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्या त्यांवर हिंदुस्थान सरकार आतां अधिक लक्ष पुरवित जाईल व आमची स्थिति सुधारील.

या प्रसंगीं बाबु लाल मोहनघोस यांचेंही आह्मी उपकार मानुन त्यांची तारीफ करितों. त्यानीं आपल्या विद्वत्तेचा खरा उपयोग देशहितार्थ केला व आपलें कर्तव्यकर्म बजाविलें. ही साऱ्या हिंदुस्थानास संतोषाची गोष्ट आहे. विलायतेस जाऊन आपलें अनुपम वक्तृत्वानें प्रसिद्ध होतात असे हिदुस्थानांत बंगाल्या कडील बाबू लोकच आहेत, दुसऱ्या स्थलांनीं अशा पुरुषास अजून जनन दिलें नाहीं असा दोष दुसरे भागांतिल लोकांवर न रहावा एतदर्थ मुंबई व मद्रास इलाख्यांतही असे नामांकीत पुरुष कोणी असतील तर त्यांनीं पुढें व्हावें व आपल्या देशजननीचें दुर्भाग्य घालविण्याकरितां विलायतेस जाऊन असे प्रयत्न करावे व बंगाल्यांतील बाबू प्रमाणें धन्यता मिळवावी. अस्तु. बाबू लाल मोहनघोस हे धन्य आहेत व ईश्वर त्यांचे सर्व प्रयत्नास चांगलें यश देवो असें आह्मी इच्छितों.

वऱ्हाड.

मुंबईग्याझेट पत्रांत उमरावतीहून एक पत्र गेलेलें छापलें आहे त्यांत या प्रांतीं लोक धान्यापेक्षां कपाशीचा पेरा अधिक करितात त्यामुळें धान्याचें उत्पन्न कमी होतें. सबब सरकारानें लोकांस कपाशी कमी पेरण्याविषयीं कायदेशीर रीतीनें निक्षून सांगावें असें लिहिलें आहे. त्याविषयीं आमचे एक माहितगार मित्र कळवितात कीं, अशी स्थिति वऱ्हाडांत नाहीं. मागें जेव्हां कपाशीला विशेष दर अमेरिकेच्या लढाईमुळें आला होता तेव्हां मात्र तशी स्थिति झाली होती, हल्लीं लोक जो पेरा करितात तो निमे जोंधळ्याचा व निमे कपाशीचा असा करितात ज्या भागांत या वर्षीं जोंधळा लाविला त्या भागांत पुढील वर्षीं कपाशी लावितात व तसें करणें फायदेशीर आहे. मागील धान्यच दुसरे वर्षीं त्या जमीनींवर पेरलें तर तें चांगलें येत नाहीं. पालटल्यानें बरें येतें व तशी वहिवाट सर्वत्र आहे.

या आठवड्यांत पावसानें मागील दोन आठवड्या प्रमाणें त्रास दिला नाहीं. आकाश केव्हां केव्हां साभ्र असतें तरी ऊन चांगलें पडतें व हवा निर्दोष झाली आहे. तेव्हां आतां गावांत सीतज्वर, आमांश, खोकला हे आजार झालेले लवकरच नाहींसे होतील अशी उमेद आहे.

मे० रतनजी साहेब वऱ्हाडांतील पेनशनर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर हैदराबादस दिवाण साहेबाचे प्रायव्हेट सेक्रटरी आहेत त्यांची प्रकृति थोडी बिघडल्यामुळें ते तीन महिन्यांची रजा घेऊन पुण्यास घरीं आले आहेत.

मे. दस्तुर नसरवानजी जामासजी साहेब पारशी लोकांचे धर्मगुरू व मे. द. बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांचे बंधू सोलापुरास नवीन अग्यारीचे सुरवातीचे समारंभाकरितां गेले होते, तेथील मंडळीनीं त्यांस ७०० रुपये किमतीची शालजोडी बक्षिस दिली.

अकोल्यास नवीन धर्मशाळेचें काम चालू आहे त्यास मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांच्या खटपटीवरून लोकांनीं चांगली मदत केली. प्रथमतः अक्कलकोटावरील धर्मशाळा उलगडून आणण्याची मजुरी व बांधणावळ खर्च मिळून सुमार पाच चार शें रुपये वर्गणी झाली ह्मणजे पुरी होईल असे धोरणावर काम सुरू केलें होतें पण आतां असें कळतें कीं त्या कामीं लोकांनीं आजपर्यंत २५११ रुपयांचे आकडे भरले व त्या पैकीं २२९१ रुपये वसूल झाला. ह्मणून आतां ती धर्मशाळा अधिक सुरेख. डौलाने तयार करण्याची तजवीज चालू झाली आहे तुळया दिल्यानें काम ठेंगणें होतें तसें न होतां उंच काम व्हावें याकरितां जाईस देऊन काम करण्याचें योजिलें आहे. त्यामुळें उपयोगास न लागणारें कांहीं लाकुड विकलें त्याचें ६०० रुपये आले व किरकोळ मसाला विकला त्याचें २६१ रुपये आले. आतां नागपुराहून नवीन लाकडें आणविण्याची तजवीज झाली आहे. आजपर्यंत झाल्या कामास १४७५ रुपये खर्च झाला. थोडे दिवस बंद असलेलें काम पाऊस उघडला आतां झपाट्यानें सुरू होईल.

कर्नल बेल साहेब जुडिशीयल कामिशनर सेशनाकरितां वाशिमास गेले आहेत ते आज परत येतील.

गेल्या आठवड्यांत २।३ दिवस रा. ब. नारायण भाई साहेब डायरेक्टर यांची प्रकृती खोकल्यानें व श्वासानें, आणि मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांची सी तज्वरानें नादुरुस्त होती. हल्लीं उभयतांच्याही प्रकृती चांगल्या झाल्या आहेत.

मि० जोन्स साहेब कमिशनर या आठवड्यांत उमरावतीहून एथें येणार आहेत.

गुरुवारीं सकाळी एथील मिडल क्लास स्कुलास व काल सायंकाळी मुलींच्या शाळेस वार्षिक बक्षिसें देण्याचा समारंभ झाला. दोन्हीही प्रसंगीं मंडळी बरीच जमली होती. मिडल क्लास स्कूल दिवसानु दिवस चांगलें सुधारत चाललें आहे व मुलींची शाळा ग्रामस्थ लोकांनीं बंद झालेली मोठ्या खटपटीनें पुन्हा सुरू केली आहे व तिजकंडे मंडळी चांगलें लक्ष्य देते असें स्पष्ट दिसून आलें. मुलींच्या शाळेस बक्षिसें देण्याकरितां रा. रा. देवराव विनायक वकील यांनीं ५ रुपये दिले व दुसरे एक दोन गृहस्थांनीं तितकेच रुपये दिले. त्यांतून चोळखण व मिठाई वगैरे मुलींस वाटिली. शाळाखात्याकडून २८ पुस्तकें बक्षिसाकरितां मिळालीं व रा. रा. धोंडो बाळकृष्ण देव एडिटर यांणीं कांहीं पुस्तकें दिलीं. या शाळेस पुनरुज्जीवन देणारे स्कूलकमिटीचे सेक्रेटरी रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुध्दे यांची व शाळेस आश्वासन देणारे राव बहादुर नारायण भाई साहेब दांडेकर यांचे, भाषणप्रसंगीं मंडळीनें, आभार मानिले.

एका अल्पवयस्क विद्यार्थ्यानें मुलींच्या शाळेच्या समारंभाचे प्रसंगीं एक श्लोक झटला त्याची सर्वांस फार मौज वाटली, तो श्लोक आह्मी एथें घेतों—

शाळा ही मुलिंची सभाग्य जनहो
तुंली प्रयत्नें अती ।
केली स्थापन एथ यास्तव अह्मा
संतोष झाला किती ॥
तो या एक मुखें मला न वदवे
आतां तुह्माला यश ।
देवो ईश्वर आणि तोच मुलिनां
प्रेमें असो कीं वश ॥ १ ॥

मि० पोप साहेब एक्झिक्युटिव इंजिनियर मध्यभाग हे दोन वर्षांचे रजेवर जाणार आहेत.

चोरीचे कामीं शिक्षा झालेला त्रिंबक अनंत नातु याचे मुकद्दम्याचे कागद पत्र डिपुटी कमिशनर साहेबांनीं पहावयास मागविले आहेत. व पुण्यास या कामीं त्याला शिक्षा किती झाली होती या विषयींही पोलिस सुप्रिंटेंडेंट साहेबांनीं माहिती मागविली आहे असें ऐकतों. त्रिंबकाला एथें पुष्कळ लोकांचें देणें. असल्यामुळें त्याचे दुकानांतील सामान, गाडी, बैल यांची जप्ती झाली आहे. व कांहींची त्याचे रांडेनें लांबवालांबवही केल्याचें बोलतात.

सन १८७८ सालचा अफूचा कायदा व सन १८७९ सालचा निरुपयोगी कागद पत्राविषयींचा कायदा हिंदुस्थान सरकारानें वऱ्हाडास लागू केला.

मे. महमद यासनखा साहेब असिस्टंट कमिशनर कामाकरितां थोडे दिवस इलिचपुरास गेले होते ते लवकरच उमरावतीस परत येणार असें समजतें.

दर्यापुरचे तहाशिलदार रा. रा. गोविंदराव यशवंतराव यांनीं एक महिन्याची रजा घेतली आहे.

रा. रा. भास्कर महेश्वर खामगावचे तहशिलदार यास ठरावबंदोचे नवीन नमुने पाहण्याचे कामीं डिपुटी कमिशनर साहेबानीं हुजूर बोलाविले होते त्याप्रमाणें ते थोडे दिवस आले होते व परत गेले.

रा. रा. वामन गणेश पराजपे बुलढाण्याचे डिपुटी इन्स्पेक्टर डायरेक्टर साहेबास भेटण्याकरितां एथें आले होते. दोन दिवस राहून परत गेले.

वर्तमानसार.

फ्रान्सचे राजपुत्र आफ्रिका खंडांत झुलू लढाईवर गेले होते ते मारले गेले त्याला कारण तेथल्या फौजेच्या टोळीस हुकूम देणारे क्या. केरी साहेब होत. त्यानीं शत्रूच्या समोर उभें असतां अयोग्य वर्तन केलें सबब ते गुन्हेगार आहेत असें ठरवून त्यांची कोर्ट मार्शलनें चौकशी झाली. व मागें बातमी आली होती कीं त्यांस देहांत शिक्षा देण्याविषयीं कोर्ट मार्शलानें ठरविलें. त्यावरून फ्रेंच राजपुत्राच्या दुःखित मातुश्रीनें चक्रवर्तिनी विक्टोरिया राणी साहेबांस पत्र लिहिलें कीं या मनुष्यास देहांताची शिक्षा होऊ नये. हल्लीं असें समजतें कीं त्याला फौजेतून बरतर्फ करावा इतकाच कोर्ट मार्शलानें ठराव करून त्याजवर दया करावी असेंही सुचविलें आहे. केरी साहेबास हल्लीं विलायतेस पाठविलें आहे. तो ह्मणतो फौजेला हुकूमत करण्याचें काम राजपुत्रानीं आपणाकडे घेतलें होतें. मी मुळींच त्या कामावर नेमलो गेलो नव्हतो. विलायतच्या लोकांचेही मत केरी साहेब निर्दोषी असल्याविषयीं आहे.

झुलू लढाईवर पाठविलेल्या सैन्याचे अधिपति लार्ड क्रेम्सफोर्ड साहेब महाराणी साहेबांस भेटण्याकरितां आफ्रिकेंतून विलायतेस लंडन शहरीं जाऊन दाखल झाले. त्यांचा मोठा आदर झाला व महाराणी साहेबांनीं त्यांची भेट घेतली.

मुंबई इलाख्यांत शेतकीची विद्या सुरू करण्याविषयीं गेल्या मार्च महिन्यांत हिंदुस्थान सरकारानें सेक्रेटरी आफ स्टेट यांस लिहिलें होतें; परंतु त्यानंतर खर्च कमी करण्याविषयीं ठराव झाल्यावरून तूर्त हें काम तकूब

ठेवावें व मद्रास एथें स्थापन केलेल्या शाळेपासून काय उपयोग होतो आणि त्या शाळेंत शिकलेले लोक शेतकीचा धंदा कसा काय चालवितात हें पाहावें असा सेक्रेटरी आफ स्टेट यांचा अभिप्राय आहे.

पायांच्या आजारानें दुखणाईत झालेल्या गाईचें दूध विकल्याबद्दल एक गवळी व त्याचे चाकरास मि. सी. पी. कूपर मुंबईचे माजिस्त्रेट यांणी २५ रुपये दंड केला.

भावलपुरचे नवाब हे आणखी नऊ महिन्यांनीं वयांत येतील त्यावेळीं त्यांस गादीवर बसविण्याचे संबंधानें मोठा समारंभ होणार आहे.

बंगाल्यांतील लोकांनीं सार्वजनिक कामाकडे आपखुषीनें गेल्या सालांत सुमारें अडीच लक्ष रुपये दिल्याचें समजतें.

कलकत्त हायकोर्टात एक नेटिव जज्ज आहे परंतु आणखी नेटिव जज्जाची कलकत्ता हायकोर्टांत नेमणूक होणार व मि. अमीर अल्ली आफिसिएटिंग चीफ माजिस्त्रेट यांस ती जागा मिळेल अशी कलकत्ता एथें वदंता असल्याविषयीं न्याशनल पेपर नांवाच्या वर्तमानपत्रांत लिहिलें आहे-

ब्रह्म देशच्या राज्यांतील अंदाधुंदीच्या अलीकडे वारंवार बातम्या येत आहेत व त्या सर्व खऱ्या आहेत असें मानून त्या राजाचे कामांत आमचे सरकारानें हात घालावा अशा सूचना इंग्रजी पत्रांतून वाचण्यांत येतात. ब्रह्म देशच्या राजाचें दुर्दैव जवळ येत चाललें आहे असें वाटतें. हल्लींची बातमी एका मद्राशी गृहस्थाचे कांहीं आरोपावरून मंडाले एथील पोलिसानें फार हाल केल्यामुळें तो मेला अशी आहे.

हिंदुस्थान व काबूल यांजमध्यें तारायंत्र स्थापन करण्याचें काम बहुतेक आटपत आलें असें समजतें.

चिनांत पर्जन्य नीट नसल्यामुळें दुष्काळाची भीति उप्तन्न झाली आहे. आठ दिवसांत पर्जन्य पडला नाहीं तर तांदुळाचें उप्तन्न बुडाल्याखेरीज राहणार नाहीं

फ्रान्स देशीं आपलें सैन्य थोडें थोडें वाढवीत असून त्याची संख्या हल्लीं इंग्लंडापेक्षां जास्त झाली आहे· फ्रान्स व प्रशिआचे लढाईपासून फ्रान्स देशाचे मनांतून जर्मनीचा सूड उगवावयाचा आहे व हें धुमसत असलेलें प्रकरण केव्हां तरी पेट घेतल्याखेरीज राहात नाहीं असा बरेच युरोपियन लोकांचा ग्रह आहे. ने० ओ

दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयीं चा कायदा [सन १८७७ चा आक्ट १०] सुधारण्याविषयीं इंडियन कौन्सीलमध्यें जें बिल होतें तें तारीख २९ जुलै सन १८७९ रोजीं पसार होऊन त्याजवर सन १८७९ चा आक्ट १२ असा नंबर पडला. या आक्टानें बजावणीचे कामांत अक्टोबर सन १८७७ पूर्वी जीं कामें सुरू होतीं, त्यांची सुरवात झाली. बजावणीचे ठरावावर अपील नव्हतें तें सुरूं झालें. दि. का. चा. री. वि. कायद्याचीं कलमें २२३ तागाईत २२९ स्मालकाज कोर्टांस लागूं नव्हतीं, तीं लागूं झालीं. ज्या कोर्टास स्मालकाज कोर्टाचा अधिकार आहे त्यास दि. का. चा. री· वि. कायद्याचें कलम ५ अन्वयें काम चालविण्याचा अधिकार दिला. दि. का. चा. री. वि. कायद्याचें कलम २३० यांत वरील सुधारणा झाली आहे. फिर्यादीवर, कैफियतीवर प्रतिज्ञा घेण्यास पक्षकार व साक्षीदार यांस हजर रहाणें भाग होतें, तें बंद झालें. कलेक्टर मार्फत विक्री होण्याचे संबंधानें जीं ३२० तागाईत ३२६ दि. का. चा री. वि. कायद्याचीं कलमें, त्यांत नवीन सुधारणा केल्या आहेत. त्याप्रमाणेंच दुसऱ्या अशाच अनेक सुधारणा करण्यांत आल्या आहेत. याचा तर्जुमा लवकरच प्रसिद्ध होईल. आतां यावरून हें बिल लोकांस बरेंच हितप्रद आहे असें अनुमान करितां येतें तथापि या संबंधानें आह्मी आपलें मत सवडी प्रमाणें कळवूं. न्या. धिं.

पोस्टाकडील दर तीन पैच्या कार्डावर वीस रूपयांवरील रकमेची पावती देणें झाल्यास त्याजवर पावतीचें टिकिट लावून देण्यास हरकत नाहीं. अशाविषयीं हिंदुस्थानचे पोस्ट मास्तर जनरल साहेब यांजकडून लिहून आल्याचें समजतें.

वासुदेव बळवंत फडके याची जबानी घेण्याकरितां गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं पुणें जिल्ह्याचे फर्स्ट असिस्टंट कलेक्टर मि० किसर साहेब हे पुणें एथील तुरुंगांत गेले होते अशी पुण्यास दाट वदंता आहे.

रशियाचे बादशहा बरोबर लढाई करण्याची तयारी चीनचे बादशहानीं चालविली आहे ह्मणून जी खबर पसरली होती ती सर्व थैव खोटी आहे. ज्ञा. प्र.

सर्व हिंदुस्थानांत मिळून एकंदर स्टेट रेलवे ह्मणजे सरकारी आगगाडीचा रस्ता ३,१३४ ½ मैल आहे.

रशिया व तुर्कस्थान यांजमधील लढाईंत रशियन लोकांचा गेल्या जानेवारीपर्यंत दीडशें कोटि रुपये खर्च झाला आणि दोनपासून तीन लक्ष पर्यंत लोक मेले.

कलकत्ता एथें वर्षास तीन हजार रुपये पगारावर दोन नेटिवांच्या हायकोर्टाच्या जज्जाच्या जाग्यावर नेमणुका होणार आहेत अशी वदंता आहे.

नवीन वेळ समजण्याचा दिवा— पारीस शहरामध्यें एक नवीन दिवा वेळ समजण्याकरितां तयार केला आहे. त्यांत मध्यें नळींत तेल घालून त्याचा संबंध खालीं वातीशी ठेविला आहे आणि त्या नळीवर आंकडे घातले आहेत. एका तासांत वेतानें अमुकच तेल जळावयाचें अशी योजना केली आहे यामुळें वेळ बरोबर समजतें.

भोपाळच्या बेगम साहेब आपल्या राजधानी पर्यंत ५३ मैलांच्या आगगाडीचा रस्ता बांधण्या करितां ५० लक्ष रुपये कर्जाऊ देण्यास तयार आहेत असें समजतें.

इटलींतील प्रसिद्ध स्वदेशाभिमानी पुरुष व लष्करी सरदार गारिबाल्डी हे फार आजारी आहेत असें कळतें.

स्वामी नारायण पंथाचे मुख्य गुरू आचार्य भगवत प्रसादजी हे तारीख १२ रोजीं वडताळ एथें समाधिस्त झाले.

अमेरिकेच्या कापडाचा व्यापार विशेष झपाट्यानें वाढत चालला आहे. सन १८७९ च्या पहिल्या सहा महिन्यांत दहा कोटि यार्ड कापड बाहेरच्या प्रदेशास गेलें. हल्लीं दर आठवड्यास पांच हजार गठ्ठे परदेशांत जातात त्यांजपैकीं तीन हजार इंग्लंडास जातात. याजवरून इंग्लंडच्या व्यापारास मोठा धक्का बसेलसें दिसतें. सु. प.

जाहिरात.

विठोबा वल्लद परशराम देशमुख मयत वारस पुत्र गुलाबराय अज्ञान पालन करणार मातुश्री सावित्री बाई देशमुख मौजे एरडे तालुके अकोलें आह्मी सर्व लोकांस जाहिर करितो कीं, सदाशिव वल्लद अमरसिंग देशमुख मौजे गऊलखेडें तालुके अकोट यांस कुलमुखत्यार पत्र दिलें होतें तें आज तारखे पासून रद्द समजावें. त्यानें आमचें काम बरोबर केलें नाहीं. व पैशाची अफरातफर केली सबब त्याजवर अलाहिदा तजवीज करणेही आहे. हल्लीं या जाहिरातीवरून त्याचे कुलमुखत्यार पत्र आह्मी रद्द केलें आहे ते सर्वांस जाहिर व्हावें. कळावें तारीख २७ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

(सही) पालन करणार मातुश्री सावित्री बाई जवजे विठोबा देशमुख निशाणीं बांगडी.

शाळाखात्याकडील जाहिरात.

सरकारी नौकरीकरितां लायकीचें सर्टिफिकिट मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवारांची परीक्षा तारीख ३ माहे नोवेंबर सन १८७९ इसवी रोजीं अकोलें व उमरावती एथें हाय स्कुलांत होईल. पहिल्या प्रतीच्या सर्टिफिकिटाकरितां ६ व्या इयत्तेंत (इंग्रजी खेरीजकरून) परीक्षा होईल. उमेदवारांनीं आपले अर्ज हाय स्कूलच्या हेड मास्ताराकडे तारीख २० माहे आक्टोबरचे आंत पाठवावे.

अकोलें, ता. २० आगष्ट १८७९ इ.

Narayen B. Dandeker.
डैरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मुलुक अमानी हैदराबाद.

सुईण.

किंवा प्रसूति आणि तत्संबंधी अनर्थकारक परिपाठ.

ह्या विषयावर गेल्या मे महिन्यांत मी मुंबईंत व्याख्यान दिलें. त्यांत गर्भीण प्रसूत होण्याचा दिवस ठरविण्याचे नियम व बारा महिन्यांचीं बारा कोष्टकें, प्रसूतीस लागणारे पदार्थ, प्रसूतीचीं पूर्वसूचक चिन्हें, प्रसूतीच्या अवस्था, प्रसूत होण्याचा क्रम चालू असतां कांपरे, वांव, उमासें इत्यादि होणारे विकार, स्त्री प्रसूत झाल्यावर तिची व बाळकाची व्यवस्था इत्यादि विषयीं सांगून नंतर गर्भिण लवकर प्रसूत व्हावी ह्मणून अज्ञान लोकांचे तिची ओढा ताण करणें, भलते भलते औषधोपचार चालविणें, मंत्र तंत्र योजणें, बार ओढणें, वगैरे अनर्थकारक प्रकारांचें वर्णन केलें आहे. हे व्याख्यान येत्या महिन्याच्या अखेरीस छापून प्रसिद्ध होईल. हें उत्कृष्ट ठशांनीं छापलें जाऊन याचीं रायल षोडश पत्री सांच्याचीं सुमार पन्नास पृष्ठें होतील. किंमत येत्या महिन्याच्या १५ व्या तारखेच्या आंत भरणारांस चार आणे पडेल बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपालहाशील व प्याकिंगबद्दल एक आणा जास्त पडेल. पत्रें तिकिटें लावून माझ्या नावें मुंबईंत अपर डंकन रोड घर नंबर १ एथें किंवा "वऱ्हाडसमाचार" आफिसांत अकोल्यास पाठवावीं.

ता. १२ आगष्ट १८७९ इ० (मिसेस रेबेका सिमियन ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण.

जाहिरात.

सर्व लोकांस जाहीर केलें जातें कीं मि० बमनजी फिरोजशा एम. ए. एल. एल. एम- मुंबई हाय कोर्टांतील सालिसिटर व अटर्नी हे अकोलें एथें सुमार दोन महिने झाले, आले आहेत. हे आल्यापासून बरींच कामें यांकडे येत आहेत. ज्यांजला फिर्यादी, अपिलें, व स्पेशियल अपिलें यांकडे देणें असतील किंवा हरएक कामासंबंधी सला मसलत घेणें असेल त्यांणीं त्यांस स्वतः अगर तुकाराम गणेश यास भेटावें, ह्मणजे त्यांचीं कामें घेतलीं जातील. प्रथमचे बोलण्याची अगर कागद पहाण्याची त्यांजपासून फी घेतली जाणार नाहीं. कामासंबंधी पैशाचा ठराव समक्ष केला नाईल. हे गृहस्थ अकोलें एथें तूर्त मि० के. कावुस एम. टाटा हेड क्लार्क आफ करन्सी आफिस सदर स्टेशन अकोलें यांचे बिऱ्हाडीं डिपुटी कमिशनर कचेरीनजीक रहात आहेत. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १८७९ इसवी.

NOTICE.

SPECIALLY PREPARED.

A KEY

To

LAMB'S TALES

SHAKSPEARE.

REDY FOR SALE ON THE 15th of August 1879.

—ते

VERY CHEAP.—10 as. in advance, 12 as. in arrears; postage Extra.

——

GREAT pains have been taken in making the book an easy book of reference, and the publisher hopes the publication will supply a long felt want. The Key contains all deficult words from the tales with equivalent words both in Marathi and English. All the dificult phrases have been fully explained in English. Dificult words have been traced and explained. Historical or other allusions are explained where necessary. Shades in the meanings of synonymous terms clearly brought out. An alphabetical index for words and phrases is given at the end. The numerous questions that form the apendix will specially enlighten the student as to the nature of examination questions. In fact no pains have been spared to make the Key useful to students for the subordinate Public serviee examination and teachers. Names of intending subscribers registered at the office of the Deccan Star. Subscription in advance to be paid before the end of this month.

THE PUBLISHER.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.